सोलापूर तरुण भारत

# आसमंत



# कडक शासन हवे!

लक्ष्यवेध
प्रतिनिधी

**देशात लैंगिक शोषणाच्या वाढत्या घटना या चिंतित करणाऱ्या अशाच आहेत. 'निर्भया' प्रकरणानंतर अशा घटनांसाठी कायदे अधिक कठोर केले गेले. तथापि, त्यांची अंमलबजावणी प्रभावीपणे होते का, हाच खरा प्रश्न. आता दोषींना कठोरात कठोर, कडक शासन झाले, तर आणि तरच अशा घटनांना आळा बसेल.**

ठाणे जिल्ह्यातील बदलापूर येथे तीन आणि चार वर्षांच्या बालवाडीत शिकणाऱ्या दोन चिमुरड्यांवर शाळेतील सफाई कर्मचाऱ्याने लैंगिक शोषण केल्याची घटना उघड झाल्याने, संपूर्ण महाराष्ट्र सुन्न झाला. तेथील नागरिक संतप्त होणे हे अत्यंत स्वाभाविकच. त्यामुळे शाळेची तोडफोड आणि निदर्शनांतून त्यांच्या भावनांचा, आक्रोषाचा उद्रेक झाला. शाळेच्या स्वच्छतागृहात या दोन चिमुरड्यांवर अत्याचार झाले. १२ तारखेला हे अमानवी कृत्य घडले. पण, यानिमित्ताने गेल्या काही दिवसांत उघड झालेल्या घटना विचार करायला भाग पाडणाऱ्या अशाच आहेत. कोलकाता येथील निवासी डॉक्टरला अशाच अमानवी अत्याचाराला सामोरे जावे लागले. काही दिवसांपूर्वीच चेन्नई येथील अन्य एका घटनेत एका अल्पवयीन मुलीवर ती एनसीसी कॅम्पसाठी गेली असता, अत्याचार झाले. डेहराडून येथील एका अल्पवयीन मुलीवरही सामूहिक अत्याचार झाले. कोलकाता येथे अद्यापही नेमके काय झाले, याचा खुलासा झालेला नाही. तेथील पोलिसांनी त्वरेने उपाययोजना न राबवल्यानेच, त्याचा तपास सीबीआयकडे सोपवण्याचे आदेश कोलकाता उच्च न्यायालयाने दिले होते. आता सर्वोच्च न्यायालयाने त्याची सुनावणी स्वतःकडे घेतली.

कोलकाता येथील आरजी कार मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटलमध्ये निवासी डॉक्टरवर झालेल्या अत्याचारांची आपणहून दखल घेत, सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी राष्ट्रीय स्तरावर 'टास्क फोर्स' स्थापन करण्याची सूचना केली. तसेच सुनावणीदरम्यान, त्यांनी पश्चिम बंगाल सरकारवर प्रश्न उपस्थित केले. डॉक्टरांच्या सुरक्षेशी संबंधित हा मोठा मुद्दा असल्याने आम्ही स्वतःहून याची दखल घेतली, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. ९ ऑगस्ट रोजी सेमिनार हॉलमध्ये प्रशिक्षणार्थी डॉक्टरचा मृतदेह आढळून आला होता. सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड म्हणाले की, सकाळी गुन्हा उघडकीस आल्यानंतर ही आत्महत्या भासवण्याचा प्रयत्न केला आणि पीडितेच्या पालकांनाही मृतदेह पाहू दिला नाही. तसेच घटना उजेडात आल्यानंतर रात्री उशिरापर्यंत 'एफआयआर' नोंदवण्यात आला नव्हता. 'एफआयआर' नोंदवण्यास झालेला उशीर आणि घटनास्थळी नासधूस केल्याबद्दल न्यायालयाने पश्चिम बंगाल सरकारला खडे बोल सुनावले. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी तेथील सरकारने आवश्यक ती उपाययोजना राबवण्याची गरज न्यायालयाने विशद केली. पश्चिम बंगाल सरकार हे का करू शकले नाही, हे आम्हाला समजत नसल्याचे मत सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी व्यक्त केले.

ममता बॅनर्जी यांच्या पश्चिम बंगालमध्ये घडलेला हा प्रकार माणुसकीला काळिमा फासणारा असाच आहे. पीडितेवर जे अत्याचार झाले, त्याचा शवविच्छेदन अहवाल हा सुन्न करणारा असाच. म्हणूनच, पीडितेला न्याय मिळावा तसेच देशभरातील डॉक्टरांना संरक्षण मिळावे, यासाठी आंदोलने करण्यात येत आहेत. तथापि, पश्चिम बंगाल सरकारने त्याकडे दुर्लक्ष केले आहे. आरोपींचा शोध घेण्याऐवजी, हे प्रकरण माध्यमांवर मांडणाऱ्यांविरोधात तेथील पोलीस नोटिसा बजावत आहेत, ही खेदाची बाब. ममता बॅनर्जी या स्वतः महिला असूनही, त्यांनी महिलेला न्याय मिळावा, यासाठी काहीही ठोस उपाय केले नाहीत, हे अनाकलनीय असेच आहे. आरोपींना पाठीशी घालण्याची त्यांची मोठी परंपरा आहे. संदेशखालीतील महिलांनी त्याचा अनुभव घेतलेला आहे. ती ममता यांची राजकीय अगतिकता असल्याचे एकवेळ मान्य करता येईल. तथापि, कोलकाता येथील प्रकरणातील त्यांनी पाळलेले मौन अस्वस्थ करणारे आहे.

अशा घटना नैतिकता आणि कायदे यांची परिभाषा नव्याने करण्याची गरज अधोरेखित करतात. नैतिकता आणि कायदे या दोन वेगवेगळ्या, पण परस्पर संबंधित संकल्पना आहेत. नैतिकता म्हणजे काय योग्य आणि काय अयोग्य, याबद्दलचे मानवी मूल्य, नियम आणि आचारधर्म यांची केलेली व्याख्या. हे नियम समाजाच्या, धर्माच्या, संस्कृतीच्या किंवा व्यक्तीच्या आचारधर्मावर आधारित असतात. नैतिकता ही सहसा मानवी आचरणाच्या आदर्शावर आधारित असते, जिथे एक व्यक्ती काय करणे आवश्यक आहे आणि तिच्या कृतीमुळे इतरांवर काय परिणाम होईल, यावर विचार केला जातो. नैतिकता व्यक्तीची किंवा समाजाची आंतरिक भावना असते, जी अनौपचारिक नियमांवर आधारित असते. त्याचवेळी कायदे हे समाजात सुव्यवस्था राखण्यासाठी, न्याय मिळविण्यासाठी आणि समाजातील सर्व व्यक्तींना काही नियमांचे पालन करणे आवश्यक असल्याचे सुनिश्चित करण्यासाठी सरकार किंवा प्राधिकरणाद्वारे बनविलेले औपचारिक नियम असतात. कायद्यांचे पालन करणे सर्वांना बंधनकारक असते आणि त्यांचे उल्लंघन केल्यास शिक्षाही होऊ शकते. कायदे सहसा समाजातील सर्व घटकांसाठी समान असतात आणि त्यांचा हेतू आहे न्याय, सुव्यवस्था आणि सुरक्षा राखणे. नैतिकता व्यक्तीच्या किंवा समाजाच्या आंतरिक मूल्यांवर आधारित असते, तर कायदे हे सरकार किंवा प्राधिकरणाद्वारे ठरविलेले औपचारिक नियम असतात. नैतिकतेचा अभ्यास आचारधर्माशी संबंधित आहे, तर कायद्यांचा अभ्यास न्यायशास्त्राशी आहे.

'निर्भया' प्रकरण घडल्यानंतर, कायदे अधिक कठोर केले गेले, असे म्हटले जात असले, तरी त्यांची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्यामुळेच, बदलापूर किंवा कोलकाता किंवा चेन्नईसारख्या विदारक घटना घडतात. समाजात मूल्यव्यवस्था रुजवण्याचे आव्हान देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर, ७८ वर्षांनंतरही कायम असेल, तर ही अंतर्मुख होऊन विचार करायला भाग पाडणारी बाब आहे. 'निर्भया'ने दिलेला धडा आपण शिकलो नाही, म्हणूनच कोलकाताची घटना घडली, असे खेदाने म्हणावे लागेल. म्हणूनच, हे कायदे पुन्हा एकदा नव्याने लिहायची गरज आहे का, याचा विचार धोरणकर्त्यांनी करावा. पोलिसांनी अशा घटनांप्रति अधिक संवेदनशील होण्याची गरज बदलापूर घटनेने तीव्र केली आहे. गुन्हा उघडकीस आल्यानंतरही, आरोपीवर त्वरेने कारवाई होत नसेल, तर यंत्रणेतील अशा अधिकाऱ्यांना दूर करणेच योग्य ठरेल. त्यातून एक स्पष्ट संदेश जाईल. पश्चिम बंगाल येथे ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसचे सरकार आहे. त्या विरोधकांच्या 'इंडी आघाडी'च्या सदस्य आहेत. असे असतानाही, देशातील एकाही भाजप नेत्याने, कोलकाता घटनेनंतर ममता यांचा राजीनामा मागण्याचे पाप केले नाही. मात्र, बदलापूर घटनेनंतर राज्यातील ज्येष्ठ राजकारणी शरद पवार आणि त्यांची सुकन्या सुप्रिया सुळे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांनी राजीनामा द्यावा, अशी केलेली मागणी, त्यांची स्वार्थी राजकारणी वृत्ती दाखवणारी ठरली आहे. कोलकाताप्रकरणी याच शरद पवार आणि त्यांच्या कन्येने अवाक्षरही उच्चारलेले नाही.

(पान ४ वर)




# ब्रिटनमध्ये वर्णद्वेषाचा वणवा पेट घेतोय!

वेधक
अनय जोगळेकर

**ब्रिटनमध्ये २०११ सालानंतर दंगे झाले नव्हते. ऑगस्टच्या सुरुवातीपासून पेटलेले दंगे आता शांत झाले असले, तरी समाजात अत्यंत स्फोटक परिस्थिती आहे. ब्रिटनची अर्थव्यवस्था, सार्वजनिक आरोग्यव्यवस्था, शिक्षण तसेच सार्वजनिक वाहतूकव्यवस्था ढासळत आहे. हुजूर पक्षाच्या पराभवामुळे अतिउजव्या विचारसरणीचे पक्ष आणि संघटनांची लोकप्रियता वाढत आहे.**

संसदीय निवडणुकांना एक महिना उलटत नाही, तो तिथे मोठ्या प्रमाणावर दंगे उसळले. ४ जुलैला झालेल्या निवडणुकांत डाव्या उदारमतवादी मजूर पक्षाला ४११ जागा मिळाल्या. २०१९ सालच्या निवडणुकांच्या तुलनेत त्यांच्या तब्बल २०९ जागा वाढल्या. दुसरीकडे उजव्या विचारसरणीच्या हुजूर पक्षाच्या २४४ जागा कमी होऊन त्यांना अवघ्या १२१ जागांवर समाधान मानावे लागले. 'हाऊस ऑफ कॉमन्स'मध्ये दोन तृतीयांश जागा जिंकूनही मजूर पक्षाला ३३.७ टक्के मतं मिळाली. याचाच अर्थ हुजूर पक्षाच्या अनेक मतदारांनी कंटाळून आणखी उजव्या विचारसरणीच्या पक्षांना मतदान केले. सध्या अनेक प्रकारच्या संकटांमध्ये सापडलेल्या ब्रिटनला कीर स्टार्मर यांच्या प्रचंड बहुमताच्या सरकारमुळे स्थैर्य प्राप्त होईल, ही अपेक्षा फोल ठरली.

२९ जुलै २०२४ रोजी साऊथ पोर्ट येथे १७ वर्षांच्या ॲक्सेल रुडाकुबाना याने एका नृत्य प्रशिक्षण केंद्रात शिरून तेथील मुलांवर चाकूने हल्ला केला. या हल्ल्यात सहा, सात आणि नऊ वर्षांच्या तीन मुली मारल्या गेला. आठ मुलं आणि दोन माणसं जखमी झाली. हल्लेखोर ब्रिटिश नागरिक होता. त्याचे आईवडील रवांडा या देशातून शरणार्थी म्हणून आले होते. ते धर्माने ख्रिस्ती होते. ॲक्सेलने मानसिक तणावाखाली हे कृत्य केले. तो सज्ञान नसल्यामुळे तपास यंत्रणांनी त्याचे नाव जाहीर केले नाही. हा हल्ला मुस्लीम धर्मीय शरणार्थ्याने केला, अशी अफवा समाजमाध्यमांत पसरली. समाजमाध्यमांमध्ये प्रक्षोभक संदेश फिरू लागले. अल्पावधीतच व्हॉट्सॲपवर 'इंग्लिश डिफेन्स लीग', 'पॅट्रिऑटिक अल्टरनेटिव्ह', 'ब्रिटन फर्स्ट' आणि 'नॅशनल फ्रंट' यासारखे समूह तयार झाले. अनेक समूहांमध्ये लाखांवर लोक सहभागी झाले. वीसहून अधिक शहरांमध्ये मोर्चे निघाले. त्यातील अनेक मोर्चांना हिंसक वळण लागले. लोकांनी मुस्लीम धर्मीयांच्या दुकानांच्या काचा फोडल्या, गाड्या जाळल्या तसेच कृष्णवर्णीय लोकांना आणि पोलिसांनाही मारहाण केली. हिंसक जमावाने केलेल्या हल्ल्यांमध्ये मशिदी तसेच शरणार्थ्यांना ठेवले आहे, असा संशय असलेल्या हॉटेलचाही समावेश होता. या हल्ल्यांमध्ये तब्बल १३० हून अधिक पोलीस अधिकारी जखमी झाले. पोलिसांनी एक हजारांहून अधिक दंगेखोरांना अटक केली. एवढ्या लोकांना ठेवायला तुरुंगात जागा नव्हती. त्यामुळे जुन्या कैद्यांना सोडण्यात आले. समाजमाध्यमांवर पोस्ट केलेल्या लोकांना हिंसा भडकावल्याचे आरोप ठेवून जलदगती न्यायालयात दोन ते तीन वर्षांची शिक्षा ठोठावण्यात आली. त्यामुळे संपूर्ण समाज ढवळून निघाला आहे. गेल्या अनेक वर्षांपासून बाहेरून येणाऱ्यांचे लोंढे हा ब्रिटनच्या राजकारणातील कळीचा मुद्दा झाला आहे.

१९७३ मध्ये ब्रिटन युरोपीय आर्थिक संघामध्ये आणि कालांतराने युरोपीय महासंघामध्ये सामील झाल्यामुळे तेथील अर्थव्यवस्था तसेच सामाजिक सलोख्यावर अनेक परिणाम झाले. इंग्रजी भाषा, जागतिक बँका आणि वित्तीय संस्थांची मुख्यालयं आणि विकसित झालेले सेवा क्षेत्र यामुळे युरोपातील अनेक बँका तसेच सेवा क्षेत्रातील बहुराष्ट्रीय कंपन्यांनी आपली कार्यालयं लंडन परिसरात हलवली. त्यामुळे ब्रिटनच्या अर्थव्यवस्थेला बळकटी आली. लाखो रोजगारांची निर्मिती झाली. 'फिन-टेक' म्हणजेच 'फायनान्शिअल टेक्नोलॉजी' क्षेत्रात आज लंडन ही जागतिक राजधानी म्हणून समोर आली.

दुसरीकडे सामायिक बाजारपेठेचा ब्रिटनमधील पारंपरिक म्हणजेच कृषी, खाणकाम आणि उत्पादन क्षेत्राला मोठा फटका बसला. एकीकडे ब्रिटनमधील औद्योगिक क्षेत्र चीन आणि युरोपच्या घशाखाली जात असताना पूर्व युरोपातून प्रचंड संख्येने आलेल्या लोकांमुळे ब्रिटिश लोकांच्या नोकऱ्यांवर गंडांतर येऊ लागले. त्याचा परिणाम म्हणून ब्रिटन युरोपीय महासंघातून बाहेर पडला. पण, या प्रक्रियेत ब्रिटनमध्ये हुजूर पक्षाच्या सरकारमध्ये पाच पंतप्रधान बदलले. आता युरोपीय महासंघाशी काडीमोड झाला असला, तरी दक्षिण आशिया आणि आफ्रिकेतून बेकायदेशीरपणे येणाऱ्या लोकांची संख्या वाढतच चालली आहे. सामान्य लोकांची हलकी कामं करण्याची इच्छा नसल्यामुळे हे बेकायदेशीररित्या आलेले लोक व्यवस्थेला चुकवून समाजाच्या गरजा भागवतात. पकडले गेल्यास आपल्या मायदेशात आपला धार्मिक किंवा राजकीय कारणांसाठी छळ होत असल्यामुळे आपण शरणार्थी म्हणून येऊ इच्छितो, असा अर्ज करतात. त्या व्यक्तीला शरणार्थी म्हणून घ्यायचे का नाही, हे ठरवायची कायदेशीर प्रक्रिया वेळखाऊ असून हजारो प्रकरणं पुरेशा न्यायाधीशांच्या अभावी ताटकळत आहेत.

(पान ४ वर)

# वाचाळवीरांची सेना

**राज्यातील सत्ता हस्तगत करण्यासाठी महाविकास आघाडीतील घटकपक्ष अगदी आतुर झालेले दिसतात. कोणता मुद्दा उपस्थित केला म्हणजे प्रसिद्धी मिळेल आणि जनतेमध्ये आपणच उठून दिसू, यासाठी रात्रंदिवस मविआतील नेत्यांचा आटापिटा सुरू आहे. कधी संजय राऊत, तर कधी जयंत पाटील सरकारवर बिनबुडाचे आरोप करतात. ते थांबले की, मग उद्धव ठाकरे आणि शरद पवार फुसके बार उडवण्याचा प्रयत्न करून थकतात. पण, यांना कोण सांगणार की, जनता यांच्या भूलथापांना बळी पडणार नाही.**

सत्ताकारण
विराम गांगुर्डे

समाजमनात कवडीचीही किंमत नसतानाही या वाचाळवीरांच्या सेनेतले अजून एक शिलेदार अनिल देशमुख यांनीसुद्धा एक आपटी बार उडवून बघितला. ते म्हणाले की, नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर येथे जो दोन गटांत वाद झाला, तो घडवण्यामागे महायुती सरकारचा हात आहे. देशमुख एवढ्यावरच थांबले नाही, तर महायुती सरकार निवडणुकीच्या तोंडावर केव्हाही दंगली घडवू शकते, अशी मुक्ताफळेही त्यांनी उधळली. या घटनांमुळे कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला असल्याचा फुसका बार उडवण्याचा प्रयत्न त्यांनी केला.

आता ज्यांचे हात भ्रष्टाचाराने बरबटलेले आहेत, अशा लोकांना सरकारवर टीका करण्याचा नैतिक अधिकार आहे का, हा प्रश्न आधी स्वतःला विचारायला हवा. परंतु, याची जाणीव नसली की, मग अनिल देशमुखांसारख्या नेत्यांची फजिती होते. तसे बघायला गेले तर तीन दिवसांपूर्वी घडलेल्या दोन्ही घटनांचे उगमस्थान म्हणजे नाशिक. एक नाशिक शहरातील तर दुसरी घटना सिन्नर तालुक्यातील पांचाळे येथे घडली. प्रवचनादरम्यान रामगिरी महाराज यांनी मांडलेल्या भूमिकेचे पडसाद छत्रपती संभाजीनगर येथे उमटले. तेथील कायदा-सुव्यवस्था तेथील काही समाजविघातक शक्तींनी बिघडवण्याचे काम केले. पण, यामध्ये राज्य सरकारचा हात असल्याचा जावईशोध अनिल देशमुख यांनी कोठून लावला, हे त्यांचे त्यानांच ठावूक. पण, एक मात्र खरे आहे की, एकामागोमाग एक लोककल्याणकारी योजना महायुती सरकारने आणल्याने मविआच्या पायाखालची जमीन सरकल्यानेच अशी वाचाळवीरांची सेना उभी करण्यात आली आहे. त्यामुळे या वाचाळवीरांच्या अपप्रचाराला महायुतीकडूनही तितकेच जोरदार प्रत्युत्तर मिळेल, यात शंका नाही. एकेकाळी वाडे आणि धार्मिक संस्कृतीचा वारसा जोपासणारे म्हणून नाशिक शहर आणि त्यातल्या त्यात 'जुन्या नाशिक'ची विशेष ओळख होती. गोदाकाठी वसलेले नाशिक गोदेच्या पाण्याइतकेच निर्मळ.

(पान ४ वर)



राष्ट्ररक्षा


ब्रि. हेमंत महाजन

भ्र. ९०९६७०१२५३


# बांगलादेशमधील हिंदूविरोधात झालेल्या हिंसाचारामध्ये जमात-ए-इस्लामी कट्टरपंथी संघटनेचा सर्वांत मोठा वाटा

बांगलादेशात नुकतेच मोहम्मद युनूस यांचे अंतरिम सरकार स्थापन झाले. बांगलादेशातील हिंदू विद्यार्थी आणि नेत्यांसोबत मोहम्मद युनूस यांची बैठक झाली. सत्तांतरानंतर हिंदूंवर झालेल्या हल्ल्यासंदर्भात हे पाऊल उचलण्यात आले आहे. बैठकीत हिंदूंच्या सुरक्षेबाबत चर्चा केली जात आहे. ५२ जिल्ह्यांत हिंदूंवर झालेल्या हल्ल्यासंदर्भात २०० हून अधिक घटना घडल्या आहेत.

बांगलादेशातील नवनिर्वाचित सरकार मोहम्मद युनूस यांच्या सरकारने हिंदूंवर झालेल्या हिंसेबाबत चिंता व्यक्त केली. बांगलादेशी हिंदूंनी यासंदर्भात आठ मागण्या केल्या आहेत; ज्यामध्ये हिंदू अल्पसंख्यकांची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी नवा कायदा अंमलात आणावा, ही त्यांची प्रमुख मागणी आहे. पाकिस्तानच्या आयएसआयने हसीना यांच्यावर दबाव आणण्यासाठी विद्यार्थ्यांचा वापर केला. यामागे पाकिस्तानचा भारतविरोधी सरकार स्थापन करण्याचा उद्देश होता. हसीना यांच्या विरोधात आयएसआयचे स्लीपर सेल सक्रिय केले गेले असल्याची माहिती आहे. आयएसआय ढाक्यातील परिस्थिती आणखी बिघडविण्यासाठी जमात-ए-इस्लामी आणि त्यांची विद्यार्थी संघटना छात्र शिबिरचा वापर करत आहे. जमात-एइस्लामी ही संघटना पाकिस्तानच्या अत्यंत जवळची मानली जाते. त्यांना वेळोवेळी गुप्त निधी दिला जात आहे. त्यांना ढाक्यातील पाकिस्तानी अधिकाऱ्यांकडून नियमित माहिती/सूचना मिळतात.

चीनच्या राज्य आणि सुरक्षा मंत्रालयाने या आंदोलनाला पाठबळ दिले आहे. हसीना यांनी भारत आणि चीन यांच्यात कराराबाबत असो किंवा इतर काही प्रकल्पांबाबत, कायम समतोल साधण्याचा प्रयत्न केला. परंतु, चीनने भारताच्या आजूबाजूच्या देशांवर आपले नियंत्रण ठेवले आहे. बांगलादेशात लष्कराच्या पाठिंब्याने सरकार स्थापन झाल्यास चीनशी जवळीक वाढेल, हा त्या मागील हेतू आहे. बांगलादेश सरकारने माफी मागितली अंतरिम सरकारच्या गृह विभागाचे सल्लागार एम. शेखावत हुसैन यांनी अल्पसंख्यकांच्या सुरक्षेत झालेली चूक ही एक मोठी चूक आहे, असे ते म्हणाले. ते म्हणाले की, ही चूक केवळ सरकारची नाहीतर अवघ्या कट्टरपंथींची आहे. दोन्हीही आपले कर्तव्य बजावण्यास असक्षम ठरले आहेत. बांगलादेशात हिंदूंवर झालेला हल्ल्याबाबत बांगलादेशच्या सरकारने माफी मागितली आहे. बांगलादेशातील हिंदू आपल्या सुरक्षेविषयी अत्यंत घाबरले आहेत. याचबरोबर भारतीय सीमेवर काहींनी पलायन केले आहे.

### जमात-ए-इस्लामीची स्थापना

जमात-ए-इस्लामी ही एक धार्मिक व राजकीय संघटना आहे, ज्याचा प्रभाव दक्षिण आशियात विशेषतः पाकिस्तान, भारत आणि बांगलादेशात दिसून येतो. या संघटनेचा इतिहास वादग्रस्त असून अनेक विवाद आणि हिंसाचाराच्या घटनांमध्ये या संघटनेचा सहभाग आहे. विशेषतः बांगलादेशातील अशांतता आणि तेथील राजकीय घटनांमध्ये या संघटनेची महत्त्वाची भूमिका असल्याचे दिसते. जमात-ए-इस्लामीची स्थापना १९४१ साली मौलाना अबुल आला मौदुदी यांनी लाहोर येथे केली होती. संघटनेचे मुख्य ध्येय इस्लामिक राज्याची स्थापना करणे होते. त्यांनी इस्लामी कायद्याच्या आधारे समाज व शासन चालविण्याचे विचार मांडले. या संघटनेची सुरुवात धार्मिक विचारप्रणाली आणि राजकीय दृष्टिकोनाच्या आधारावर झाली.



एका बाजूला काही कट्टपंथीयांनी त्यांची क्रूर हत्या केली. त्यानंतर बांगलादेशच्या काही म हिलांवर अत्याचार केला.

हिंसाचारामध्ये जमात-ए-इस्लामी संघटनेचा सर्वात मोठा वाटा हिंदूंमध्ये झालेल्या हिंदू विरोधात झालेल्या हिंसाचारामध्ये बांगलादेशम धील जमात-ए-इस्लामी या कट्टरपंथी संघटनेचा सर्वात मोठा वाटा होता; याशिवाय अनेक युवक या हिंसाचारात सामील झाले, ज्यांचे मुख्य काम होते, हिंदूंच्या घरातून सामान पळवायचे, त्यांच्या बायकांवर अत्याचार करायचा आणि सध्या उद्‌भवलेल्या हिंसाचारामध्ये आपला स्वतःचा फायदा करून घ्यायचा. मात्र, जमात-ए-इस्लामी हिंदू विरोधातील हिंसाचार हा अत्यंत जुना आहे. याची सुरुवात होते १९७१ साली झाली, ज्या वेळेला पाकिस्तानी सैन्याने जमातीच्या मदतीने १९७१ च्या युद्धापूर्वी ४० लाख त्यावेळीच्या ईस्ट पाकिस्तानी नागरिकांना मारले; ज्यामध्ये ३० लाख हे ईस्ट पाकिस्तानमधले हिंदू होते आणि १० लाख हे तिथे असलेले तिथे अवामी लीग या पक्षाचे समर्थक होते.

१९७१ नंतर अनेक वेळा बांगलादेशमध्ये वेगवेगळ्या कारणाने हिंसाचार झाला. त्यामध्ये सर्वात जास्त टार्गेट केले गेले ते तिथे असलेल्या हिंदूंना. बांगलादेशमध्ये हिंदूंची संख्या १९५० साली २४ टक्के एवढी होती; ती आता २०२४ मध्ये कमी होऊन आठ टक्के एवढी झाली आहे. गेलेले १६ टक्के हिंदू गेले कुठे? ते मारले गेले किंवा त्यांनी धर्म परिवर्तन केले किंवा काही भारतामध्ये पळून आले. आपण जमात-एइस्लामीच्या इतिहासावर थोडी चर्चा करूया.

जमात-ए-इस्लामीचा वादग्रस्त इतिहास जमात-ए-इस्लामीचा इतिहास वादग्रस्त आणि विवादित घटनांनी भरलेला आहे. १९७१ साली बांगलादेशाच्या स्वातंत्र्य संग्रामादरम्यान जम ात-ए-इस्लामीने पाकिस्तानच्या बाजूने भूमिका घेतली आणि त्याचा परिणाम बांगलादेशाच्या स्वातंत्र्यलढ्यात मोठ्या प्रमाणात हिंसाचारात झाला. बांगलादेशातील अनेक व्यक्तींनी या संघटनेवर मानवाधिकारांच्या उल्लंघनाचे आरोप केले आहेत. बांगलादेशमधील अशांततेत जमात-ए-इस्लामीचा सहभाग बांगलादेशातील अशांततेत जमात-ए-इस्लामी आणि तिच्या विद्यार्थी संघटनेचा, छात्र शिबिराचा महत्त्वाचा सहभाग राहिला आहे. विशेषतः २०१३ साली झालेल्या घटनांमध्ये जेव्हा या संघटनेच्या नेत्यांच्या विरोधात युद्धगुन्हे सिद्ध झाले, त्यावेळी बांगलादेशात मोठ्या प्रमाणावर हिंसाचार झाला. या हिंसाचारात जमात-ए-इस्लामीच्या कार्यकर्त्यांचा सहभाग असल्याचे अनेक माध्यमांनी दाखवले आहे. जमात-ए-इस्लामीला सरकारने कसा प्रतिसाद दिला? बांगलादेशातील हसिना सरकारने जमात-ए- इस्लामीच्या विरोधात कठोर पावले उचलली. अनेक नेत्यांना युद्धगुन्ह्यांमध्ये दोषी ठरवण्यात आले असून त्यांना फाशीची शिक्षा देण्यात आली. २०१३ साली बांगलादेशातील न्यायालयाने जमात-एइस्लामीला राजकीय पक्ष म्हणून बेकायदेशीर ठरवले, ज्यामुळे या संघटनेच्या राजकीय कारवायांवर मर्यादा आल्या. जमात-ए-इस्लामीबाबत हसीना यांची भूमिका बांगलादेशाच्या पंतप्रधान शेख हसीना यांनी जमात-एइस्लामीच्या विरोधात कठोर भूमिका घेतली आहे. त्यांनी या संघटनेच्या हिंसक आणि विवादास्पद कारवायांच्या विरोधात कटाक्षाने पावले उचलली आहेत.

हसीना यांच्या नेतृत्वाखालील सरकारने जम ात-ए-इस्लामीच्या अनेक नेत्यांना न्यायालयाच्या माध्यमातून न्यायालयीन कारवाईत अडकवले. जमात-एइस्लामीचे बांगलादेशातील पतन २०१० पासून सुरू झाले आहे. न्यायालयीन निर्णय, नेत्यांची फाशी आणि संघटनेच्या विरोधातील जनआंदोलन यामुळे संघटनेचा प्रभाव कमी झाला आहे. त्याचबरोबर सरकारने जमात-ए-इस्लामीच्या विविध शाखांना बंद करण्याचे आदेश दिले आहेत. जमात-ए-इस्लामीचा राजकीय प्रभाव जमात-ए-इस्लामीचा राजकीय प्रभाव १९७१ च्या स्वातंत्र्यलढ्यानंतर कमी झाला आहे. परंतु, काही काळासाठी त्यांनी आपल्या राजकीय अस्तित्वाला जपले होते. त्यानंतर, न्यायालयीन निर्णय आणि सरकारच्या कठोर धोरणांमुळे त्यांच्या राजकीय कारवायांवर मर्यादा आल्या आहेत.

#### जमात-ए-इस्लामीचा जागतिक प्रभाव

जमात-ए-इस्लामीचा जागतिक प्रभाव त्याच्या धार्मिक विचारधारांमुळे असून त्याचे विचार पाकिस्तान, भारत आणि इतर मुस्लिम राष्ट्रांमध्ये लोकप्रिय आहेत. तथापि, त्यांच्या हिंसक कारवायांमुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांच्या विचारधारेवर टीका होत आहे. निष्कर्ष जमात-ए-इस्लामी ही एक वादग्रस्त आणि विवादास्पद संघटना आहे. तिच्या इतिहासात अनेक हिंसक घटना आणि विवाद आहेत. बांगलादेशातील तिच्या भूमिकेवर आधारित, हा संघटना आता राजकीय दृष्टिकोनातून आणि जागतिक स्तरावर मागे पडली आहे. सरकारच्या कठोर धोरणांमुळे तिच्या राजकीय कारवायांवर मर्यादा आल्या असून तिचा प्रभाव कमी झाला आहे.

जमात-ए-इस्लामी ही संघटना तिच्या इतिहासातील वादग्रस्त भूमिकेमुळे विशेषतः बांगलादेशमध्ये खूपच विवादित ठरली आहे. स्वतंत्र बांगलादेशाच्या स्थापनेनंतर या संघटनेला त्याच्या युद्धगुन्ह्यांसाठी कठोर प्रतिसाद मिळाला, बांगलादेशमध्ये सरकारविरोधात चालू असलेल्या हिंसक आंदोलनांमध्ये त्यांच्या मोठा वाटा होता. मात्र आता येणाऱ्या काळामध्ये आणि येणाऱ्या सरकारमध्ये त्यांच्या राजकीय प्रभाव हा अत्यंत महत्त्वाचा असेल. कारण हसीनाच्या विरोधात असलेली बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टी पूर्णपणे जमात-ए-इस्लामीच्या प्रभावाखाली आहे. यामुळे असे मानले जाते की, येणाऱ्या काळामध्ये बांगलादेशमधील हिंदूंचे भवितव्य अतिशय कठीण होणार आहे.

भारत सरकारने बांगलादेशमधील परिस्थितीवर लक्ष ठेवून तिथल्या अल्पसंख्यक हिंदूंचे रक्षण करायला पाहिजे. नाहीतर येणाऱ्या पाच वर्षांमध्ये बांगलादेशी हिंदूंची संख्या ही सध्याच्या आठ टक्क्यांवरून शून्य टक्क्यांवर येईल. (लेखक संरक्षणविषयक तज्ज्ञ आहेत.)

---

संत प्रबोधन


प्रा. डॉ. हरिदास आखरे


# प्रार्थना : एक आदर्श भारतीय जीवनमूल्य

प्रार्थना म्हणजे काय? प्रार्थना हे एक आदर्श भारतीय जीवनमूल्य आहे. भारतीय संस्कृतीत कोणत्याही लहान-मोठ्या उत्सवकार्याची सुरुवात प्रार्थनेने करण्याचा आदर्श शिष्टाचार आहे. प्रार्थना हे धार्मिक, आध्यात्मिक व सामाजिक जीवनाचे अविभाज्य अंग आहे. प्रार्थना म्हणजे श्रेष्ठांजवळ केलेली मागणी आहे. संत साहित्यातील प्रत्येक कार्याची सुरुवात विशिष्ट आराध्य प्रार्थनेने केलेली आढळते. श्री संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीच्या प्रथम अध्यायारंभी केलेली प्रार्थना अशी- **श्री गणेशाय नमः।। ओम नमोजी आद्या। वेदप्रतिपाद्या । जय जय स्वसंवेद्या । आत्मरूपा।।१।।** (ज्ञानेश्वरी अध्याय १ ओ.

१) कोणत्याही मंगल कार्यारंभी श्रीगणेशाची प्रार्थना करतात. शालेय कामकाजाची सुरुवात 'राष्ट्रगीत' या राष्ट्रीय प्रार्थनेने होते. कोणत्याही मंगलप्रसंगी सुरुवातीलाच इष्ट देवतेची प्रार्थना करण्याचा प्रघात आहे. श्री संत एकनाथांनी आपल्या भागवताच्या प्रथम अध्यायारंभी इष्ट देवतांची आळवणी केलेली आहे.



संत तुकारामांनी विश्वनियंत्या परमेश्वराची विनवणीच्या रूपात आळवणी करून आपल्याला संसाराच्या भवबंधनातून मुक्त करण्याची प्रार्थना केली आहे. वारकऱ्यांच्या प्रस्थानत्रयीत संत ज्ञानेश्वरांची 'ज्ञानेश्वरी', संत एकनाथांचे 'भागवत' व संत तुकाराम ांची 'अभंगगाथा' या असामान्य ग्रंथांचा समावेश होतो. या तिन्ही ग्रंथांत प्रार्थना केलेल्या आढळतात. ते आपण आरंभी पाहिलेच. श्रीमद्‌भागवतामध्ये वर्णन केलेल्या प्रार्थनेमध्ये सर्व प्राणिमात्रांच्या सुख व कल्याणाचा भाव प्रकट झालेला आहे. या प्रार्थनेतून विश्वाचे कल्याण व्हावे, दुष्टांची वृत्ती चांगली व्हावी, भूतमात्रांनी एकमेकांचे शुभ चिंतावे, सर्वांचे मन मंगलाच्या प्राप्तीकडे प्रवृत्त व्हावे व बुद्धी भगवान श्रीहरीच्या स्वरूपात प्रवेश करावी, असा भाव प्रकट झाला आहे.

प्रार्थना म्हणजे त्या सर्वशक्तिमान परमेश्वराला साक्षी मानून, म नाला एकाग्र करून स्वतःच्या व जगाच्या कल्याणाकरिता ईशचिंतन करणे होय. त्यामध्ये थोड्या वेळासाठी सर्व जगाला विसरून परम ात्म्याशी एकरूप होता येते. मनाची ही अवस्था म्हणजे आपण ज्या कोण्या परमेश्वराला मानत असू, पूजत असू त्या परमेश्वराशी थेट संवाद साधणे होय. या संवादामध्ये आपल्या मनातील सर्व इच्छा, आकांक्षा व्यक्त होत असतात. प्रार्थनेने जे बळ प्राप्त होते त्याला जगामध्ये कुठेही तोड नाही. म्हणूनच जागतिक स्तरावर पाहिल्यास विविध धर्मांमध्ये विविध धार्मिक प्रार्थना होताना दिसतात. प्रत्येक प्रार्थनेला प्रत्येक धर्मामध्ये विशिष्ट स्थान आहे. प्रार्थनेविषयी प्रत्येकाचा सकारात्मक दृष्टिकोन पाहावयास मिळतो. प्रार्थना हे धार्मिक वा आध्यात्मिक जीवनाचे एक अविभाज्य अंग आहे. साधा नमस्कार केला तरी त्यानंतरअन्यथा **शरणं नास्ति त्वमेव मम । तस्मात कारुण्यभावेन रक्ष रक्ष परमेश्वर ।।६ ।।** अशी प्रार्थना असते. पूजेच्या शेवटी प्रार्थना असते, कीर्तनाच्या शेवटी प्रार्थना असते, यज्ञाच्या समाप्तीनंतरही प्रार्थना होते.

कोणतीही भक्ती केली तरी, शेवटी प्रार्थना केली जाते. **ओम असतो मा सद्‌मय । तमसो मा ज्योतिर्गमय । मृत्योर्मा अमृतं गमय ओम शांती ओम शांती ओम शांती ।।७।। ओम भद्र कर्णेभिः श्रुणुयाम देवाः भद्र पश्चिमाश्वः भीर्यजत्रा।।** या वेदकालापासून चालत आलेल्या प्रार्थना आहेत. प्रार्थनेचे अनेक प्रकार आहेत. ऐहिक भोगप्राप्तीसाठी, मोक्षासाठी, भक्ती मिळावी म्हणून, त्याचप्रमाणे स्वतःसाठी, दुसऱ्यासाठी व सर्वांकरिता असे प्रार्थनेचे प्रकार म्हणता येतील. प्रार्थना कुणापाशी केली आहे. श्रीम ान-गृहस्थ किंवा सत्ताधीश, इंद्र-चंद्र किंवा शिव-विष्णू यावरूनही प्रार्थनेचे स्वरूप ठरत असते. प्रार्थना करणाऱ्याच्या अंतःकरणात अगतिकत्वाचा भाव व ज्याच्याजवळ प्रार्थना करावयाची असते त्याच्याविषयी पूज्यबुद्धी असावी लागते, असा जरी सर्वसामान्य नियम असला तरी त्याला अपवाद आहेतच. गीतेचे अनुकरण करून आपणास **असे म्हणता येईल की, मानवी बुद्धीचे-** १) सात्त्विक २) राजस ३) तामस हे प्रकार आहेत. प्रार्थनेचेही तसेच तीन प्रकार होऊ शकतात. त्यातील राजस आणि तामस प्रार्थना या स्वार्थी, दिखाऊ आणि कित्येकदा तर स्वतःच्या कल्याणापेक्षा इतरांच्या अकल्याणासंबंधी असतात. सामान्य माणसांच्या प्रार्थना या बहुधा वासना आणि द्वेष, मत्सरातून उद्‌भवलेल्या असल्यामुळे त्या राजस व तामस या वर्गात मोडणाऱ्या असतात. अशा प्रार्थना करणारी माणसे केवळ लौकिक सुखाची अपेक्षा किंवा क्षुद्र वासनांची पूर्ती यासाठी लाचार असतात आणि ज्याच्याजवळ आपण प्रार्थना करीत आहोत, त्याच्या सामर्थ्याचादेखील ती विचार करीत नाहीत.

१) अकल्याणाची प्रार्थना - भूतप्रेतांची उपासना करून अघोरी मार्गाने काहीतरी मिळवू पाहणाऱ्या लोकांची प्रार्थना ही त्यांच्या विनाशाला कारणीभूत होते. हे लोक स्वपीडा आणि परपीडारूपी बीज तामस मनोवृत्तीच्या शेतात पेरतात आणि मग त्यांना पुढे त्याप्रमाणेच फळ मिळते. याचे वर्णन ज्ञानेश्वर महाराजांनी समर्पक शब्दात केले आहे. धन, पुत्र, पौत्र, सत्ता, प्रत्येक वेळी स्वतःलाही सुखाचे होतील, अशी शाश्वतीही नसते.

२) सात्त्विक प्रार्थना - सात्त्विक प्रार्थना यापेक्षा वेगळी असते. ही केवळ लौकिक अशाश्वत विषय सुखाची मागणी करणारी नसते. असे मागितलेच तर ते केवळ स्वतःपुरते राहत नाही. तर, ती मागणी अधिक व्यापक भूमिकेतून मागितलेली असते. **काले वर्षतु पर्जन्यः पृथ्वी सस्यशालिनी।। या प्रार्थनेप्रमाणे उदार असते.**

३) संत तुकारामांनी संत संग लाभण्यासाठी केलेली प्रार्थना 'भवबंधनी सोडवावे' अशी प्रार्थना किंवा भक्तिसुखाची मागणी करणारी प्रसिद्ध विनवणी अशी- **हेचि दान देगा देवा । तुझा विसर न व्हावा ।। न लगे मुक्ती धनसंपदा । संत संग देई सदा।।** शंकराचार्यांच्या अनेक स्तोत्रांतून केलेली मोक्षासंबंधीची मागणी, ही सात्त्विक प्रार्थनेची उदाहरणे होत.


(पान ६ वर)


---

क्षिनेजगत


देवेंद्र प्रभुणे


## 'हमारे बाद मैफिल में अफसाने बयां होंगे'

# संगीतातील शापित राजपुत्र मदन मोहन

कितीही नाकारायचे म्हटले तरीही भारतीय चित्ररसिकांच्या लेखी संगीत हे चित्रपटाचे प्रधान अंग आहे. गायक, गायिका व संगीतकार हे आपल्या दृष्टीने स्वर्गलोकीचे गंधर्व! व्यावसायिक यश मिळविण्यासाठी संधी, सातत्य व नशिबाची साथ लागते. हिंदी चित्रपट संगीताचा इतिहास अवलोकित असता केवळ नशिबाची साथ नसल्यामुळे प्रतिभेला साजेसे यश प्राप्त न करू शकलेल्या एका गुणाढ्य संगीतकाराची आपसूक आठवण येते. वर्ष २०२४ हे मोहंमद रफीसाहेब व तलत मेहमूद यांचे जन्मशताब्दी वर्ष आहे.



उंच छतावर मंदपणे तेवत असलेल्या स्निग्ध प्रकाशाच्या झुंबराकडे मात्र कोणाचेही फारसे लक्ष गेले नाही. मदन मोहन यांचे दुर्दैवाचे दशावतार त्यांच्या जन्मशताब्दी वर्षातही त्यांचा पाठपुरावा करतायेत! एका धनाढ्य व उच्चभ्रू घराण्यात त्यांचा २५ जून १९२४ रोजी इराकची राजधानी बगदाद येथे जन्म झाला. त्यांचे पिताश्री रायबहादूर चूनीलाल कोहली यांच्या कंपनीला इराकमध्ये वेगवेगळी बांधकामे करण्याचे कंत्राट मिळाले होते. त्यामुळे मदन मोहन यांचे बालपण व प्रारंभिक शिक्षण बहुसांस्कृतिक, बहुराष्ट्रीय वातावरणात सुरू झाले. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील हा दृश्य ब्रिटिश ठसा शेवटपर्यंत कायम राहिला. १९३२ साली आपल्या परिवारासोबत ते चकवाल, पंजाब येथे स्थायिक झाले. त्यांचे शिक्षण लाहोर येथे सुरू असतानाच करतारसिंह नामक एका संगीत शिक्षकाकडे त्यांनी अल्पावधीसाठी संगीताचे पाठ गिरवले. १९३४ साली ते मुंबईला स्थायिक झाले. १९३५ सालापासून नभोवाणी केंद्रावरील कार्यक्रम ात ते बालगायक म्हणून सहभागी होऊ लागले. त्यांचे पिताश्री रायबहादुर चूनीलाल हे मुंबईच्या चित्रपटसृष्टीत मातब्बर निर्माते म्हणून प्रस्थापित होऊ लागले. मदन मोहन यांना धनार्जनाची फारशी गरज नव्हती; पण संगीत त्यांच्या मनीमानसी रुजले होते. १९४३ साली अचानक त्यांनी सेनादलकडे आपला मोर्चा वळवला व दोन वर्षे तेथे जीवनाचे रखरखीत वास्तव बघून आपल्या कलासक्त जीवनात पुनःप्रवेश केला. हा दैवी संकेत म्हणावा लागेल की लखनौ आकाशवाणीवर संगीत विभागात नोकरी करताना त्यांची सोबत बेगम अख्तर, तलत मेहमूद, जयदेव, उस्ताद फैयाज खान व उस्ताद अली अकबरखान या संगीतातील महानुभावांशी झाली व त्यामुळे त्यांच्या संगीतविषयक जाणिवा समृद्ध झाल्या.

१९४७ मध्ये त्यांना बेहजाद लखनवी यांनी रचलेल्या दोन गझल गायची संधी मिळाली तसेच 'शहीद' चित्रपटासाठी लता मंगेशकर यांच्यासमवेत त्यांनी 'पिंजरे मे बुलबुल बोले' हे युगल गीत ध्वनिमुद्रित केले. पण शशधर मुखर्जी यांनी त्यांचा आवाज नापसंत केला. दरम्यान, ते सचिन देवबर्मन व श्याम सुंदर यांचे सहायक म्हणून कार्यरत होते. १९५० साली त्यांना 'आँखे' हा चित्रपट स्वतंत्र संगीत दिग्दर्शन करण्यासाठी मिळाला. 'मेरे अटरिया पे कागा बोले' व 'प्रीत लगा के मैने यह फल पाया' ही गीते गाजली. पण विशेष उल्लेख करण्यासारखे त्यात काहीही नव्हते. १९५० च्या दशकात मात्र अदा, निर्मोही, मदहोश, आशियाना असे दर्जेदार संगीताने नटलेले चित्रपट त्यांनी दिले. लता मंगेशकर व तलत मेहमूद हे गायक आपले सर्वोत्कृष्ट योगदान देण्यासाठी सज्ज होते. फक्त मदन मोहन यांचे चित्रपट तिकीटबारीवर चालतच नव्हते. कुठल्या विशिष्ट नायकाशी त्यांचे पडद्यावर साहचर्य नव्हते तसेच त्यांना आपली संगीतातील विशिष्ट शैली गवसली नव्हती. 'रेल्वे प्लॅटफॉर्म' चित्रपटात त्यांनी लोकोत्तर अशी 'चांद मध्यम है' व 'बस्ती बस्ती परबत परबत' ही दोन गीते दिली. पण चित्रपट दणकून आपटला.

मदन मोहन यांचे संगीत जनसामान्यांना रिझविण्यास कुठेतरी कमी पडत होते. १९५६ सालचा 'भाई भाई' हा मात्र एक ठसठशीत अपवाद! 'ये दिल मुझे बता दे' व 'कदर जाने ना' ही गीते अफाट लोकप्रिय झाली. अदालत, पॉकेटमार, देख कबिरा रोया, गेटवे ऑफ इंडिया, जेलर, संजोग या चित्रपटांमध्ये स्तरीय संगीत होते, पण त्यास जनसामान्यांच्या दृष्टीने फारसे काही नव्हते. मदन मोहन यांनी आपला बाज व शैली बदलली ती १९६० च्या दशकात! उस्ताद रईस खान यांनी वाजवलेल्या अद्‌भुत सतारवादनाने एक खास व्यक्तित्व मदन मोहन यांच्या संगीतास बहाल केले. अनपढ, मनमौजी, आपकी परछाईया, गजल, जहाआरा, हकीकत, शराबी, सुहागन हे संगीत माधुर्यप्रधान होते, पण त्यात समकालीन तत्त्व नव्हते. वो कौन थी, मेरा साया, रिश्ते नाते, नौनिहाल, दस्तक, चिराग, दुल्हन एक रात की या चित्रपटांवर, विशेषतः संगीतावर भरभरून लिहिण्यासारखे आहे, तूर्तास एवढेच.

१९७० च्या दशकात नव्या संगीत मनुनी आपले स्थान बळकट केले. महाराजा, परवाना, बावर्ची, कोशिश, हसते जखम, हिंदुस्तान की कसम असे मोजके चित्रपट मदन मोहन साहेबांना मिळाले. हीर रांझा, दस्तक, मौसम व दिल की राहे या चित्रपटांनी लोकप्रियता मिळवली; पण ती अपवाद स्वरूप! चौकीदार, साहेब बहादुर, जलन, इन्स्पेक्टर ईगल हे तद्दन फालतू चित्रपट होते. मदन मोहन यांच्या मृत्युपश्चात 'लैला मजनू' चित्रपटाच्या संगीताने धूम मचवली, पण त्याचा दर्जा निम्न होता. 'तेरे बगैर' हा त्यांच्या अप्रदर्शित गीतांचा संग्रह २००० च्या दशकात प्रदर्शित झाला. तीच बाब ध्वनिमुद्रित करून ठेवलेल्या धुनांवर आधुनिक वाद्यमेळातील 'वीर जारा' चित्रपटांच्या गाण्यांची! यामध्ये फारसे माधुर्य नव्हतेच. दोनदा 'सूरसिंगार' तर एकदा 'दस्तक' चित्रपटासाठी राष्ट्रीय पुरस्कार हे लखलखीत अपवाद! तडजोड न करण्याचा बाणेदार स्वभाव, अतिशय उच्चभ्रू राहणी आणि सर्वसामान्य साच्यात न बसणारे संगीत हे मदन मोहन यांच्या मर्यादा होत्या. नैराश्य, मदिराप्राशन व एकटेपणाने मदन मोहन ५१ व्या वर्षीच मृत्युमुखी पडले. कशी नशिबानं थट्टा मांडली, हेच शेवटी खरे! (लेखक सिनेमाचे अभ्यासक आहेत.)


# शक्ती ॐकाराची, मंत्र विज्ञानाची!

यशासाठी
डॉ. नितीन विघ्ने
भ्र. ९८२२४६२९६८

१. ते तान्हं बाळ रडत होतं. त्याच्या आईने त्याला दूध दिलं, थोपटलं, फिरवलं तरी ते रडायचं थांबत नव्हतं. मग तिला वाटलं, याला कुठे दुखत असेल. डॉक्टरकडे घेऊन जाऊ. तसं तिने बाळाच्या वडिलांना सांगितलं. तेवढ्यात बाळाच्या आजीने म्हटलं, 'थांब, त्याला मांडीवर घे आणि आपण सगळे ॐकार करूया.' मग बाळाची आजी-आजोबा, आई-वडील या चौघांनी दीर्घ श्वास घेऊन शांत स्वरात ॐकार करणे सुरू केले. 'ओ'चा स्वर कमी वेळ व 'म'चा स्वर दीर्घ वेळ केला आणि जादूची कांडी फिरावी तसे बाळ रडायचा थांबला. मग त्यांनी अजून पाच मिनिटे ओंकार जप केला आणि बाळ शांतपणे झोपी गेला.

२. अहमदनगर येथील डॉ. जयंत करंदीकर हे मेडिकल प्रॅक्टिस करीत असतानाच त्यांनी गायनाचादेखील छंद जोपासला होता. त्यांच्या 'संजीवन समाधी ज्ञानेशाची' या संगीत कार्यक्रमाचे रेकॉर्डिंग होते आणि अचानक त्यांना गाताना आवाजात खर येऊ लागला. त्यांनी कसेबसे ते रेकॉर्डिंग आटोपले. नंतर वेगवेगळे उपचार करूनही त्यांना आराम पडत नव्हता. त्याच दरम्यान अमेरिकेतील आवाजशास्त्राची तज्ज्ञ व सुप्रसिद्ध गायिका डेबी नार्दिन यांची डॉक्टरांची भेट झाली. त्यांच्याशी चर्चा करताना आवाजशास्त्राविषयी त्यांना महत्त्वाची माहिती मिळाली. आवाजात रजिस्टर्सची नीट जडण-घडण नाही. स्वरयंत्राचा नीट उपयोग केला नाही तसेच त्यांची आदर्श श्वसनक्रिया घडत नाही हे त्यांना कळले. दोष कळला, पण उपाय मिळत नव्हता. त्यांनी त्या काळात ज्ञानेश्वरीतील निवडक ओव्यांवर आधारित 'ज्ञानेश्वरी अमृतगंगा' हा संगीत कार्यक्रम बसवला होता. त्यासाठी ज्ञानेश्वरीतील ॐकाराचा महिमा सांगणाऱ्या अनेक ओव्या वाचून डॉ. करंदीकर भारावून गेले होते तसेच ॐकार शास्त्राचे गाढे अभ्यासक व ॐकार किमया भाग १ व २ चे लेखक कै. स. कृ. देवधर यांच्या पुस्तकातील वर्णन वाचून त्यांच्या आवाजातील खरखर काढण्यासाठी डॉक्टरांनी ॐकार चिकित्सेचा उपयोग करण्याचे ठरवले. शिवाय ॐकारचे आवाजशास्त्रानुसार सर्व परिमाणे वापरून परीक्षण केले असता ॐकार ध्वनी हा अगदी १०० टक्के परिपूर्ण आवाज आहे, हे स्पष्ट झाले. म्हणूनच ॐकाराला वेदोपनिषदांनी व ऋषिमुनींनी ब्रह्मनाद, तस्य वाचकः प्रणवः, ॐकार इति इदं सर्वं... अशा विशेषणांनी गौरविले आहे.


डॉक्टरांना ज्ञानेश्वरीतील ज्या ओव्या वाचून त्याची चिकित्सा म्हणून प्रयोग करण्याची इच्छा झाली त्या खाली दिल्या आहेत. अगदी सुरुवातीलाच 'ॐ नमोजी आद्या' म्हणजे ॐकारालाच गणपतीचे रूप म्हणून वंदन केले आहे. ॐकाराचे गुणगान करताना ज्ञानदेव म्हणतात- कष्टले संसारशिणे। जे देवो येती गाऱ्हाणे।। तया ओ दे नावे जेणे। तो संकेतु हा।।१७।।३३१।। म्हणजे या विश्वातील जीव कोणत्याही कारणाने कष्टले, भागलेले व शिणलेले असतील, तेव्हा त्यांच्या हाकेला जो ओ देतो तो हा 'ॐकार' होय. ॐकार नियमित करणाऱ्यांचा देह तेज:पुंज व वायूसारखा हलका होतो. शरीरातील पृथ्वी व जलाचे अंश कमी होतात. असाच परिणाम साधकाच्या आवाजावर होऊन आवाजही निष्कलंक होतो. हे सर्व वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या डॉ. जयंत करंदीकर यांना जाणवल्यावर त्यांनी नियमित ॐकार साधना करून त्यांचा आवाज निष्कलंक केला. मग त्यांचा उत्साह इतका वाढला की, त्यांनी २२ वर्षांहून जास्त काळ 'ॐकार साधना' हेच आपले ब्रीद स्वीकारून, त्यांच्या ३ डिसेंबर २०१७ रोजी झालेल्या मृत्यूपर्यंत डॉ. जयंत करंदीकर यांनी ॐकारावर संशोधन केले व ६४ विविध ॐकार उच्चारण करण्याच्या पद्धती विकसित केल्या. २००६ मध्ये 'ॐ शक्ती शब्दस्वरसाधना' हे त्यांचे पुस्तक प्रकाशित झाले. त्यांनी सतत ॐकारचा उच्चार करताना उदरस्थ श्वसनाचा पुरस्कार केला. म्हणजे उत्तम परिणाम प्राप्त करण्यासाठी ॐ म्हणण्यापूर्वी पोट फुगवून श्वास घ्यावा, असे सांगितले. जसा आपला चेहरा आपल्या व्यक्तिमत्त्वाचा महत्त्वाचा भाग आहे तसेच आपला आवाज तेवढाच महत्त्वाचा आहे. म्हणूनच आपला आवाज सुधारण्यासाठी सर्वांनी ॐकारसाधना करायला हवी, असे ते म्हणत. त्यांच्या या संशोधनाचा हजारो गायक, शिक्षक व बोलण्यासंबंधी व्यवसाय करणाऱ्यांना खूप फायदा झाला. आता डॉ. जयंत सरांच्या पत्नी स्त्री-रोग तज्ज्ञ डॉ. गीता करंदीकर, मुलगा डॉ. नीरज- सायकियाट्रिस्ट व सायकोलॉजिस्ट सून त्यांचा वसा पुढे चालवत आहेत.




**३. ॐकाराचा बाळाच्या मेंदूविकासावर सुपरिणाम:** 'क्रिएटिंग अ जिनिअस' या आमच्या उत्तम मेंदूविकासप्रकल्पामध्ये गरोदरपणातील पाचव्या महिन्यांपासून तर जन्मानंतर वयाच्या १८ वर्षापर्यंत एकूण १५ टप्पे आखलेले आहेत. यातच 'मायनस फाईव्ह टु प्लस फाईव्ह' हा आमचा विशेष उपक्रम असतो. गरोदरपणाच्या पाचव्या महिन्यापासून तर बाळाच्या जन्मानंतर पाच वर्षांपर्यंत मेंदूच्या नैसर्गिक विकासाचा खूपच महत्त्वाचा काळ असतो. हा काळ आपल्या जीवनाची दिशा बदलवू शकतो. वयाच्या १८ वर्षांनंतर जशी आपली उंची वाढत नाही, त्याचप्रमाणे वयाच्या पाच वर्षापर्यंतच मेंदूचा स्थापत्य-विकास होतो; नंतर नाही. या अतिम हत्त्वाच्या काळात मेंदूमध्ये आपल्या प्रत्येक ज्ञानेंद्रियासाठी वेगळा विभाग असतो. शब्द (ऐकणे म्हणजे कान), स्पर्श किंवा तापमान (कातडी), रूप (दृष्टी म्हणजे डोळे), रस (चव) म्हणजे जीभ आणि गंध म्हणजे नाक या सगळ्या जाणिवा समजण्यासाठी वेगळा विभाग असतो तसेच प्रत्येक भाषेसाठी वेगळा विभाग असतो. आमच्या या संशोधनासाठी विविध प्रयोग करत असताना आम्ही खास ॐकाराचे विशेष प्रयोग केले असता खूपच उत्साहवर्धक परिणाम मिळालेत. त्यात बाळाच्या आईला गरोदरपणाच्या पाचव्या महिन्यापासूनच एक विशिष्ट पद्धतीने ॐकाराचा अभ्यास प्रत्येक वेळी पाच मिनिटे असा दिवसातून तीन वेळा करावयास लावला. किती वेळपर्यंत आणि नेमका केव्हा ॐकार करायचा यासाठी तेथील त्यावेळेचे तापमान, बाळाच्या आईचे वजन व उंची, स्वभाव या सगळ्या गोष्टी विचारात घ्याव्या लागतात. सोबतच्या फोटोतील बाळाचे वय फक्त २ महिने असूनदेखील बाळाच्या आईने नियमित ॐकार केल्यामुळे जबरदस्त परिणाम मिळालेत ते लगेच कळते.

**४. ॐकारशास्त्र आणि विज्ञान:** शास्त्रीय दृष्टिकोनातून जेव्हा भारतीय शास्त्रांचे अध्ययन केले तर हे लक्षात येईल की वैदिक, सनातन किवा भारतीय प्राचीन संस्कृतीमध्ये अनेक विषय आणि शास्त्रे आहेत. त्यात प्रत्यक्ष प्रयोगाने सिद्ध केलेल्या शास्त्रांमध्ये मुख्यत्वे करून आयुर्वेद, योगशास्त्र, ज्योतिषशास्त्र आणि मंत्रशास्त्र यांचा समावेश होतो. भाषाशास्त्रानुसार संस्कृत भाषा सगळ्यात जास्त शुद्ध व प्रभावी भाषा असल्यामुळे सगळे मंत्र संस्कृतमध्ये आहेत. आपले ऋषिमुनी हे जुन्या काळातील वैज्ञानिकच होते. त्यांनी सांगितले की, या जगाची उत्पत्ती ही नादातून म्हणजे आवाजातून झाली आहे आणि तो मूळ नाद म्हणजे ॐकार आहे. आघात करून विविध स्वर उत्पन्न होतात, परंतु 'ओम' हा अनाहत नाद आहे म्हणजे ॐ या स्वराची उत्पत्ती कुठलाही आघात करून झालेली नाही. ईश्वराचं नावच ॐकार आहे. शरीरातील शक्तिकेंद्रे म्हणजे सात चक्रांमध्ये प्रत्येक चक्राचा विशिष्ट नाद आहे. प्रत्येक चक्राचा प्रभाव शरीरातील विविध अवयवांशी निगडित असल्यामुळेच स्वरांच्या व ॐकाराच्या माध्यमातून व्यक्तिविकास व रोगोपचार करता येतो. कारण ॐकार म्हणजे फक्त आवाज नाही तर एनर्जी म्हणजे शक्ती आहे.

व्यक्ती, वातावरण या दोन्हींमध्ये ॐकार किंवा गायत्री मंत्राचा परिणाम करून शुद्धता करता येते. प्रदूषण दूर करता येऊ शकेल. मानसिक दुर्बलता दूर करण्यासाठी ॐकाराचा जप उत्तम परिणाम साधतो. संशोधनात असे लक्षात आले आहे की, प्रदूषणामुळे पॉझिटिव्ह आयन्स वाढतात व निगेटिव्ह आयन्स कमी होतात. पण जेव्हा ओंकाराचा आणि गायत्री मंत्राचा जप केला तेव्हा तिथल्या वातावरणात निगेटिव्ह आयन्स वाढून हवा शुद्ध झाली, असे लक्षात आले. प्रत्येक क्षणाला पेशी मरतात व जन्माला येतात, दर ५ मिनिटात ९० कोटी पेशी जन्म घेतात. त्यामुळे शास्त्रज्ञ म्हणतात तुम्ही जर फक्त पाच मिनिटे ॐकाराचा जप केला तर त्या पाच मिनिटात तुमच्या ९० पेशी जास्त सतेज व शुद्ध तयार होतील. याच हिशेबाने हळूहळू तीन महिन्यात शरीरातील पूर्ण पेशी सतेज व शुद्ध तयार होऊन, शरीरातील रोगी पेशींची जागा घेतील व तुम्ही पूर्ण निरोगी व तेजस्वी जीवन जगू शकाल. एका शास्त्रज्ञाने तर हेही शोधून काढले की, प्रणवमंत्र म्हणजेच ॐकाराचा जप केल्यास आपण वृद्ध होण्याचा वेग हळूहळू कमी होत जाऊन पूर्ण थांबवता येतो. मंत्राची पहिली शक्ती ही प्रामाण्य शक्ती आहे. म्हणजे अनेक मंत्रांपैकी कुठलाही एकच मंत्र साधनेचे प्रमाण म्हणून स्वीकार करा. दुसरी शक्ती म्हणजे फलनी शक्ती म्हणजे जप कराल तर फळ मिळणारच. हा कर्मविपाक सिद्धांत आहे. केलेल्या प्रत्येक कर्माचं फळ मिळणारच. तिसरी मंत्राची शक्ती म्हणजे बहुनी शक्ती. यामुळे जसा एका ज्वारीच्या दाण्यातून हजार दाणे मिळतात तसेच एक चांगले कार्य केले तर त्याच्या अनेकपट चांगले फळ मिळते. मंत्राची चौथी शक्ती म्हणजे अंतरग्राही शक्ती! मंत्राचा जप करताना जप करण्यासाठी कायम एक मंत्र, एक वेळ, एक स्थान आणि एक जप संख्या पक्की करा. त्यामुळे त्या मंत्राला, स्थानाला व व्यक्तीला तिन्ही गोष्टींना सामर्थ्य प्राप्त होतं. याच पद्धतीने भारतात अनेक ऋषींनी तपश्चर्या करून अनेक स्थानं सामर्थ्यवान करून ठेवलीत. अमरावतीहून जवळ असलेल्या मध्यप्रदेशातील मुक्तागिरी या ठिकाणी मला असाच अनुभव आला. ते स्थान अनेक जैन साधूंनी तप करून सामर्थ्यवान केलंय. मंत्रांचे प्रकार आहेत. १ ते १० अक्षरी मंत्र हे बीज मंत्र आहेत. १० ते २० अक्षरांचे कर्तरी मंत्र, माला मंत्र, ज्ञानेश्वरी, दासबोध हेसुद्धा माला मंत्रच आहेत. मुलांना लहान वयापासून 'रामरक्षा' म्हणायची सवय लावली तर त्याचे उत्तम रक्षण होईल. बुद्धी विकास करायला 'भीमरूपी स्तोत्र' म्हणून घ्या. मंत्र शास्त्र ही अंधश्रद्धा नाही, प्रयोगक्षम शास्त्र आहे. यावर विश्वास असो व नसो. स्वतः अनुभव घ्या आणि मग ठरवा. (लेखक सायकॉलॉजिस्ट, करीअर कौन्सेलर व सॉफ्ट स्किल्स ट्रेनर आहेत)



## शब्द झाला श्वास । अभंगात ।।

नश्वर देहाचा । नको कळवळा ।।
दाटू दे उमाळा । तुजसाठी ।।१।।

मी तुझे तान्हुले । तु माझी माऊली ।।
घास मुखी घाली । सात्विकाचा ।।२।।

आणिकांचा नको । देऊ सहवास ।।
सज्जनांचा वास । अंतरात ।।३।।

जन्म जावा सारा । तुझ्या भजनात ।।
आत्मचिंतनात । पांडुरंगा ।।४।।

तुझ्या कृपे झालो । संतांचा मी दास ।।
शब्द झाला श्वास । अभंगात ।।५।।

प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
९४०३०२९१७८

## श्रावण

रिमझिमणारा ! श्रावण कोवळा !!
इंदिवर निळा ! घननिल !!
हिरव्या पानात ! फुलांची वरात !!
अलवार गात ! कुमारिका !!
माहेरवाशीण ! ऊन पावसात !!
हरखून जात ! येता मूळ !!
सृष्टीचा विभ्रम ! साजिरागोजिरा !!
अलख बावरा ! सरी नाद !!
कर्पूर मेघांचा ! अप्रूप सोहळा !!
बिल्वपत्र कळा ! शिवालयी !!
सावळ्या प्रभेत ! स्वस्तिक रेखून !!
शोभे इंद्रधनू ! लाघवाने !!

जयश्री दाणी

## ओलं आभाळ

श्रावण महिना आला की
ऊन-पावसाचा खेळ बघतांना
दिसतं तिला त्यात आपलंच प्रतिबिंब !
क्षणातच दाटून येतात तिच्याही मनात अलवार
आठवणींचे तेच गच्चं ओले ढग..!
अन् धो धो बरसायला लागतो
तिच्या डोळ्यांतून तोच वेडा पाऊस!
आणि एकदा का वाहून गेलं
मनात साठलेलं सगळं मळभ
की मग स्वच्छ उन्हासारखं पारदर्शी
होऊन जातं तिचं आरस्पानी मन
पावसात न्हाऊन तृप्त झालेल्या सृष्टी सारखं !
म्हणून तर ती सदैव जिवंत ठेवते
श्रावणातल्या त्या लहरी ऊन-पावसाला
अन् बाराही महिने जपत राहते मनात
तेच चिंब करणारं गच्चं ओलं आभाळ..!

मधुमती वऱ्हाडपांडे

# दिलासा डाळींचा, 'म्युच्युअल' वाढीचा

अर्थोद्योग
महेश देशपांडे

सरत्या आठवड्यामध्ये सामान्यजनांना दिलासा देणाऱ्या बातम्यांबरोबरच ग्राहकोपयोगी वस्तूंच्या दरवाढीवर भाष्य करणाऱ्या बातम्या समोर आल्या. पहिली बातमी म्हणजे देशभरात डाळींच्या वाढत्या दराला लगाम बसण्याची शक्यता वर्तवण्यात आली. दरम्यान, म्युच्युअल फंडातील गुंतवणुकीचा नवा विक्रम तपशिलासह समोर आला. याच सुमारास ग्राहकोपयोगी वस्तू खिसा रिकामा करण्याची शक्यताही चर्चेत आली.

सरत्या आठवड्यामध्ये सामान्यजनांना दिलासा देणाऱ्या बातम्यांबरोबरच ग्राहकोपयोगी वस्तूंच्या दरवाढीवर भाष्य करणाऱ्या बातम्या समोर आल्या. पहिली चांगली बातमी म्हणजे देशभरात डाळींच्या वाढत्या दराला लगाम बसण्याची शक्यता वर्तवण्यात आली. दरम्यान, म्युच्युअल फंडातील गुंतवणुकीचा नवा विक्रम तपशिलासह समोर आला. मात्र याच सुमारास ग्राहकोपयोगी वस्तू खिसा रिकामा करण्याची शक्यता बोलून दाखवण्यात आली. डाळींच्या दरात सातत्याने वाढ होत होती; परंतु सरकारच्या नवीन धोरणामुळे सध्या डाळीच्या दरात घसरण होत आहे.

एका वर्षाहून अधिक काळापासून डाळींचा महागाई दर १० टक्क्यांच्या वर आहे. किमती नरमल्याने आता महागाईचा दरही कमी होईल, अशी आशा सरकारला आहे. खाद्यपदार्थांच्या गगनाला भिडलेल्या किमतींमुळे हैराण झालेल्या सर्वसामान्यांसाठी एक आनंदाची बातमी आहे. जवळपास वर्षभराच्या त्रासानंतर आता डाळींचे भाव उतरू लागले आहेत. येत्या काही महिन्यांमध्ये किमती आणखी कमी होण्याची अपेक्षा आहे. गेल्या एक महिन्यापासून देशातील विविध बाजारपेठांमध्ये डाळींच्या किमती घसरत आहेत.

अहवालानुसार हरभरा, तूर आणि उडीद या डाळींच्या किमती कमी झाल्या आहेत. ही बाब सर्वसामान्यांना दिलासा देणारी आहे. कारण गेल्या एक वर्षाहून अधिक काळ डाळींचे भाव वाढत होते. डाळींचा किरकोळ महागाईचा दर जानेवारीमध्ये १९.५४ टक्के होता. तो जूनमध्ये १६.०७ टक्क्यांवर आला आहे. ग्राहक मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, तूर डाळीच्या किरकोळ किमती १६० रुपये प्रतिकिलोपर्यंत खाली आल्या आहेत. महिनाभरापूर्वीच्या तुलनेत ही घट ५.८ टक्के आहे. प्रमुख बाजारपेठांमध्ये हरभरा, तूर आणि उडीद डाळीच्या किमती गेल्या एका महिन्यात चार टक्क्यांनी कमी झाल्या आहेत. येत्या काही महिन्यात डाळींच्या किमती आणखी कमी होण्याची अपेक्षा आहे. सरकारच्या प्रयत्नांमुळे आयातीत झालेली वाढ हे किमती कमी होण्यामागील मुख्य कारण आहे. डाळींच्या किमतींवर नियंत्रण ठेवण्यासाठी सरकारने तूर, उडीद आणि मसूर डाळ यांच्या शुल्कमुक्त आयातीला ३१ मार्च २०२५ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे डाळींची आयात वाढत आहे. गेल्या आर्थिक वर्षात भारताने ४.७३ दशलक्ष टन डाळींची आयात केली होती. २०२२-२३ या आर्थिक वर्षाच्या तुलनेत ९० टक्के अधिक आहे. तूर आणि हरभरा डाळीवर सरकारने ३० सप्टेंबरपर्यंत साठा मर्यादा घालण्यात आली आहे. यामुळे उपलब्धता सुधारण्यासही मदत होत आहे. दुसरीकडे, चांगला पाऊस झाल्याने डाळवर्गीय पिकांच्या पेरण्या वाढत आहेत. २ ऑगस्टपर्यंत ११.०६ दशलक्ष हेक्टरवर कडधान्यांची पेरणी झाली होती. जी एका वर्षापूर्वीच्या तुलनेत सुमारे ११ टक्के अधिक आहे. दरम्यान, इक्विटी म्युच्युअल फंड (एमएफ) मधील गुंतवणुकीमध्ये जुलै महिन्यामध्ये नऊ टक्क्यांनी घट झाली आहे तर एसआयपीमध्ये १० टक्क्यांची वाढ झाली आहे आणि हा आकडा २३ हजार कोटी रुपयांच्या पुढे जाण्याची ही पहिलीच वेळ आहे. ताज्या आकडेवारीनुसार, एसआयपीमधील गुंतवणूक जूनमधील २१ हजार २६२ कोटी रुपयांवरून जुलैमध्ये २३ हजार ३३२ कोटी रुपयांपर्यंत वाढली आहे. म्युच्युअल फंडांचे एकूण एआययू जूनमधील ६०.८९ लाख कोटींच्या तुलनेत जुलैमध्ये सहा टक्क्यांनी वाढून ६४.६९ लाख कोटी रुपये झाले आहे. इक्विटी फंडामध्ये निव्वळ गुंतवणुकीमध्ये नऊ टक्क्यांनी घट झाली आहे तर डेट एमएफमधील गुंतवणूक जुलैमध्ये वाढली आहे. जुलैमध्ये त्यात १८ टक्के घट झाली. या श्रेणीतील गुंतवणूक जूनमध्ये २२,३५१ कोटी रुपयांच्या तुलनेत जुलैमध्ये १८,३८६ कोटी रुपये राहिली. जुलैमध्ये १६ डेट म्युच्युअल फंड श्रेणींपैकी १२ मध्ये गुंतवणूक आली. गुंतवणुकीमध्ये घट झालेल्या चार श्रेणींमध्ये मिड-कॅप फंड, क्रेडिट रिस्क फंड, बँकिंग आणि पीएसयू फंड आणि १० वर्षांची स्थिर परिपक्वता असलेले गिल्ट फंड यांचा समावेश आहे. जुलैमध्ये लिक्विड फंडांमध्ये सर्वाधिक ७० हजार ६० कोटी रुपयांची गुंतवणूक झाली. २८,७३८ कोटी रुपयांच्या गुंतवणुकीसह मनी मार्केट फंड दुसऱ्या स्थानावर आहे. याउलट, क्रेडिट रिस्क फंडातील गुंतवणूक सर्वात कमी झाली. दुसरीकडे बँकांची पत वाढत असली तरी ठेवींमध्ये मोठी घट होत आहे. आता गुंतवणूकदार बँकेत ठेवीची गुंतवणूक करण्याऐवजी म्युच्युअल फंड आणि स्टॉक मार्केटमध्ये गुंतवणूक करण्यास प्राधान्य देत आहेत. अलिकडे गुंतवणूकदारांनी म्युच्युअल फंडामध्ये २१ हजार कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक केली आहे. या गुंतवणुकीचा वाढीचा दरही जास्त आहे. असे असताना देशातील बँकांच्या ठेवींच्या वाढीमध्ये मात्र सातत्याने घट होत आहे.





एकीकडे अशा दिलासादायक बातम्या असताना महागाईचा वाढता दर आणि वस्तूंच्या किमतीतील चढउतार यांचा हवाला देत ग्राहकोपयोगी क्षेत्रातील कंपन्यांनी किमतीत वाढ होण्याची शक्यता वर्तवली आहे. या कंपन्या किमती चार ते दहा टक्क्यांनी वाढविवण्याचा विचार करत आहेत. किरकोळ महागाई दरामध्ये खाद्यपदार्थांच्या महागाईला ४६ टक्के महत्त्व मिळत आहे. मे आणि जूनमध्ये किरकोळ महागाई दरात अन्नधान्य महागाईचा वाटा ७५ टक्के होता. 'ब्रिटानिया इंडस्ट्रीज'च्या सूत्रांनुसार किमती किंचित वाढवाव्या लागतील. येत्या काही महिन्यांमध्ये महागाईचा दर चार ते पाच टक्क्यांच्या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. 'डाबर'ने चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीमध्ये हेल्थकेअर उत्पादनांच्या किमती सहा टक्क्यांनी वाढवल्या होत्या तर गृह आणि वैयक्तिक श्रेणीतील किमती १.५ टक्क्यांनी वाढल्या आहेत. पार्ले प्रॉडक्ट्सचे उपाध्यक्ष मयंक शहा यांनीही साखर आणि कोकोच्या किमती वाढल्यामुळे आपली उत्पादने महाग करावी लागणार असल्याची कबुली दिली आहे. कंपनीने आपल्या काही ब्रँडचे दर आधीच वाढवले आहेत. साखर, मैदा आणि कोको हे घटक कंपनीसाठी मुख्य कच्चा माल असून वाढत्या महागाईमुळे दरवाढीचा मार्ग स्वीकारावा लागणार आहे.

'हिंदुस्तान युनिलिव्हर'च्या म्हणण्यानुसार चहाची पाने वगळता बहुतांश वस्तूंच्या किमती स्थिर राहतील. 'मोंडेलेझ इंडिया फूड्स प्रायव्हेट लिमिटेड'चे ग्लोबल चेअरमन आणि 'सीईओ' डर्क व्हॅन डी पूट यांनी सांगितले की, अन्न महागाईचा परिणाम निम्न आणि मध्यमवर्गीय कुटुंबांच्या घरगुती खर्चावर दिसून येईल. 'मॉंडेलेझ इंडिया' कॅडबरी डेअरी मिल्क आणि टोब्लेरोनसारख्या लोकप्रिय चॉकलेट ब्रँडसाठी प्रसिद्ध आहे. पॅकेज्ड फूड कंपन्यांच्या पिठाच्या किमती दोन वर्षांमध्ये २० टक्क्यांनी वाढल्या आहेत. दोन वर्षांमध्ये साखरेचे दर ४० टक्क्यांनी वाढले आहेत. 'एफएमसीजी' उद्योगाला मागणीच्या कमतरतेचा सामना करावा लागल्याने उच्च इनपुट खर्चाची भरपाई करण्यासाठी कोविडनंतरच्या दोन वर्षांमध्ये किमती जवळपास एक चतुर्थांश वाढल्या. 'क्रिसिल'च्या ताज्या अहवालानुसार, भारतातील एफएमसीजी क्षेत्र या आर्थिक वर्षात ७-९ टक्के दराने विकास साधेल. ४ जून रोजी भारतीय शेअर बाजार कोसळला असताना फक्त एफएमसीजी क्षेत्र वाढत होते. एकंदरीत, शहरी मागणी कायम राहिल्याने आणि ग्रामीण मागणीला गती मिळाल्याने वाढीचा वेग कायम राहील. (लेखक आर्थिक घडामोडींचे अभ्यासक आहेत.)

# 'बहुरूपी' नाट्यकलावंताच्या आयुष्यातील शैक्षणिक संदर्भ


**चिंतामण गणेश कोल्हटकर यांचा जन्म १२ मार्च १८९१ रोजी सातारा ह्या गावात झाला. चिंतामणरावांनी लिहिलेल्या आणि १९५७ मध्ये प्रकाशित झालेल्या, 'बहुरुपी' या आत्मचरित्राला १९५८ सालचा साहित्य अकादमी पुरस्कार देण्यात आला. नाटक आणि चित्रपटसृष्टीमध्ये अभिनय क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या चिंतामण कोल्हटकर यांचा साहित्यातील हा वावर सुखावह होता. बहुरूपी हा चिंतामण गणेश कोल्हटकर यांनी लिहिलेला एक महत्त्वाचा ग्रंथ आहे. या ग्रंथामध्ये नाट्यविश्वात चिंतामण कोल्हटकर यांचा वावर कसा होता? त्यांच्या भूमिका कशा रंगत गेल्या. या संदर्भातील अनुभवासह विविध नाटककारांसोबत प्रत्यक्ष सहवासात त्यांना त्यांचे नाटककार कसे भेटले? त्यांचे परस्पर संबंध कसे होते इत्यादी बाबींचे वर्णन आलेले दिसते.**

साहित्य शिक्षण
किरण डोंगरदिवे
भ्र. ७५८८५६५५७६

नाटक्या सर्वसंगे आणू शकतो, पण एरवी विद्वानाचे सोंग त्याला जमणार नाही. असे म्हणणारे कोल्हटकर विद्वानांचा आदर करणारे होते हे प्रथम समजून घ्यावे लागते. बहुरूपी ग्रंथाच्या पहिल्या भागाला स्वगत असे म्हणून कोल्हटकर यांनी त्यात स्वतःच्या जीवनातील काही घडामोडींचा आढावा घेतला आहे. त्या अनुषंगाने त्यांच्या चरित्रात येणाऱ्या शैक्षणिक संदर्भांचा विचार करता येतो. चिंतामणरावांचे आजोबा नारायण हे गोविंद भटांच्या पाच मुलांपैकी द्वितीय असले तरी त्या काळानुसार व्यवहार उपयोगी शिक्षण असल्यामुळे कुटुंबाचा भार त्यांच्यावर पडला असे लेखक म्हणतात. त्यांचे धाकटे बंधू महादेव हे बुद्धिमान तरतरीत व हुशार असल्यामुळे वैदिक शिक्षण त्यांनी अल्पवयातच पार पडले. पुढे पुणे पाठशाळेत ज्योतिष्य व व्याकरण या शास्त्राचा अभ्यास करून कँडीसाहेबांच्या आग्रहावरून त्यांनी इंग्रजी भाषेचे ज्ञान आत्मसात केले व शिक्षणाधिकारी म्हणून लौकिक मिळवला. या वर्णनातून चिंतामण कोल्हटकर यांच्या कुटुंबात सुरुवातीपासून शैक्षणिक वातावरण असे हे आपल्या लक्षात येते.

लेखकाचे वडील गणेश नारायण कोल्हटकर यांनी फलटण येथे मास्तरकी व पुढे काही दिवस ऑफिसमध्ये नोकरी केली. पुढे पुणे येथे शिक्षक म्हणून काम करत असताना इंदुप्रकाश या वर्तमानपत्राच्या प्रमुख लेखकांपैकी एक म्हणून मान्यता मिळवली. त्यानंतर अमरावती येथे वऱ्हाड समाचार नावाचे वर्तमानपत्र सुरू केले. १८६७ मध्ये स्वतःचा छापखाना आणि महाराष्ट्र मित्र नावाचे वर्तमानपत्र त्यांनी सुरू केले. यावरून प्रसिद्धी माध्यमे आणि शिक्षण ह्या गोष्टी लेखकाच्या घरात पूर्वीपासून नांदत होत्या, हे लक्षात येते. चिंतामणरावाच्या पिढीमध्ये नारायणरावांनी आपल्या मोठ्या मुलींचे लग्न वकिलीची परीक्षा पास झालेल्या तरुणाशी करून दिला. चिंतामणरावाचे मोठे बंधू महादेवअप्पा यांनी इंग्रजी सातवीत शाळा सोडली. व वर्तमानपत्राच्या संपादकीय शिक्षणाचे धडे घेऊ लागले. लेखकाचे दुसरे दोन बंधू यशवंत आणि हरी हे सुद्धा शाळकरी विद्यार्थी होते असे लेखक म्हणतात. यावरून औपचारिक शिक्षणापेक्षा आपल्या व्यवसायाला उपयोगी पडणाऱ्या व्यवसायिक आणि अनौपचारिक शिक्षणाला त्या काळात जास्त महत्त्व होते हे लक्षात घ्यावे लागते.

जबलपूर येथे वामनराव कोल्हटकर यांच्याकडे गेल्यावर लेखकाला श्रीपाद कृष्ण कोल्हटकर हे वामनराव कोल्हटकर यांचे पुतणे बी. ए. पास झालेले होते हे आवर्जून सांगाव असे वाटते. त्यामागे त्या काळात कोल्हटकर कुटुंबातील ते एकमेव बी.ए. झालेले तरुण होते. जबलपूर, नागपूर अकोला आणि पुन्हा सातारा अशा भटकंतीनंतर त्यांचे कुटुंब साताऱ्च्या गोसावीपुऱ्यातील त्यांच्या घरात आले. दुसरीपासून पाचवीपर्यंतचा त्यांचा शैक्षणिक प्रवास कसा झाला हे लेखकाला सांगता येत नाही. मोडी वाचन, लेखन गणित असे बऱ्यापैकी कठीण विषय त्यांना अभ्यासाला होते. मोडी येत नसले तरी मला हिंदी येते हे समाधान त्यांना जास्त होते. मराठी शाळेतून इंग्रजी शाळेत आल्यावर वेगवेगळ्या




विषयाला वेगवेगळे शिक्षक असत, त्या गोष्टीचे वर्णन आहे. लेखकाने अतिशय सकारात्मकदृष्टीने केले आहे. मात्र, मराठी शाळा असो की इंग्रजी शाळा असो त्यात चिंतामण कोल्हटकर रमू शकले नाही. अभ्यासाचे आणि त्यांचे विशेषत जुळलेच नाही असे आपल्या लक्षात येते. विद्यार्थी दशेतच चिंतामण कोल्हटकर यांना नाटकामध्ये भूमिका करण्याची आवड निर्माण झाली. देश पारतंत्र्यात असताना देशात होणाऱ्या स्वातंत्र्य लढ्याची चर्चा शाळेत किंवा शाळेच्या बाहेर विद्यार्थी अतिशय तळमळीने चर्चा करत असा तो काळ होता. पारतंत्र्याची चीड शाळकरी विद्यार्थ्यांच्या मनातही निर्माण झाली होती. सातारा न्यू इंग्लिश स्कूलमध्ये झुंजारराव नावाचे नाटक करताना माझे विद्यार्थी म्हणून चिंतामण कोल्हटकर यांचे नाव झुंजाररावांचे पात्र करण्यासाठी सुचविले गेले आणि ते त्यांनी ते केले. ध्वनीशास्त्र म्हणजे एखादा दूरचा आवाज ऐकल्यावर तो कोणत्या दिशेने आला असावा, त्याचे अंतर किती असावे? नुसत्या गोफणगुंड्याने त्या ठिकाणावर नेम धरून फेक मारणे शक्य होईल का? वगैरे गोष्टीचा सराव लेखकाने आपल्या सवंगड्यांसोबत स्वातंत्र्य लढ्यात सहभागी होणाऱ्या क्रांतीविराप्रमाणे केला होता.

अच्युतराव कोल्हटकर दोन अडीच वर्षाच्या कारावर्षानंतर सुटून आल्यावर देशसेवेचे कार्य केले म्हणून काळोशीच्या शेतकऱ्यांनी त्यांचा जो सत्कार केला तो पाहून लेखक म्हणतात, हे सुसंस्कृत माणुसकीच्या जाणकारांचे पाठ त्यांनी कुठल्या विद्यालयात जाऊन घेतले होते? या वाक्यात पुन्हा विद्यालयात जाण्याची आवश्यकता नसते तर मनाने निर्मळ आणि प्रामाणिक असली की सुसंस्कृतपणा आपोआप येतो असे लेखकाला सुचवायचे आहे. एकंदरीत बहुरूपीच्या 'स्वगत' या भागामध्ये चिंतामण कोल्हटकर यांच्या आयुष्यातील घटनांसोबत त्यांच्या औपचारिक आणि अनौपचारिक शिक्षणाबाबत विवेचन वाचायला मिळते.

बहुरूपीच्या दुसऱ्या भागात म्हणजे माझे नाटककार या भागात चिंतामण गणेश कोल्हटकर यांनी त्यांच्यासोबत आणि त्यांनी त्यांच्यासोबत काम केलेले आहे अशा नाट्य क्षेत्रातील महत्त्वाच्या ३३ नाटककारा सोबतचे अनुभव नमूद केले आहेत. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांच्यावरील लेखात एके ठिकाणी लेखक म्हणतात, गणपतराव जोशींचे वैशिष्ट्य सोडले तर एक महाराष्ट्र नाटक मंडळी हीच त्याकाळी सुशिक्षितांची लोकप्रिय अशी एकमेव गद्य नाट्य संस्था समजली जाई. 'राम गणेश गडकरी' यांच्यावरील लेखात सुद्धा राम गणेश गडकरी पदवीधर नसल्यामुळे आणि किर्लोस्कर मंडळीत नाटक मास्तर किंवा डोअर कीपर असल्यामुळे माझ्या प्रतिष्ठित मंडळीच्या मते नाटक मंडळीच्या मास्तरने लिहिलेले नाटक सुशिक्षित म्हणून समजल्या जाणाऱ्या महाराष्ट्र नाटक मंडळींनी बसवणे ही गोष्ट सहज साध्य नव्हती, असा उल्लेख येतो. यावरून कलेच्या प्रांतातही शिक्षणाला महत्त्व होतेच असे म्हणावे लागेल. याच लेखामध्ये तालीम मास्तर म्हणून इर्षने आणि महत्त्वाकांक्षेने जबाबदारी स्वीकारली तरी ती पार पाडण्यासाठी चिंतामणरावांनाही भरपूर पूर्वतयारी करावी लागली. माझी शिक्षकाची भूमिका यशस्वी ठरावी म्हणून शिष्यवरांत इर्षा यावी अशी चिंतामणी प्रथम द्यावी लागली असेही ते म्हणतात.

एकंदरीत क्षेत्र कोणतेही असो शिक्षकाच्या भूमिकेमध्ये पूर्वतयारी आणि पूर्वज्ञान अत्यंत आवश्यक आहे असे लेखक सुचवतात. कृष्णाची प्रभाकर यांनी लेखकाला गाणे शिकण्यासाठी प्रवृत्त केले. आपण जो पेशा करत असतो त्याचा अभ्यास आपण केला पाहिजे, अशी कृष्णाजी प्रभाकर यांची शिकवण होती. आपल्याकडे नाटकाचा अभ्यासक्रम पुस्तकरूपाने तयार नसला तरी होतकरू अभ्यासू नटाला अभ्यासायला नाटयाचार्य खाडीलकर यांची पुस्तके उपयुक्त असत. यातून नाटक हा एक व्यवसाय असला तरी त्या संदर्भात कोणताही अभ्यासक्रम त्याकाळी ही नसायचा आणि आजही नसतो हे प्रकर्षाने अधोरेखित होते. नरसिंह चिंतामण केळकर यांच्यावरील लेखात दादासाहेब खापर्डे यांनी परदेशातील नाट्य कलावंत आरशात पाहून नाटकाचा अभ्यास आणि सराव करतात. त्यामुळे प्रत्यक्ष भूमिका करताना त्यांचे डोळे बोलत नाहीत कारण सरावाच्या दरम्यान त्यांचे डोळे आरशात स्वतःच्या अभिनयाचे निरीक्षण करण्यासाठी गुंतलेले असतात. इतके सूक्ष्म निरीक्षण दादासाहेब खापर्डे नोंदवतात. त्यामुळेच त्यांना ते एक तज्ञ नाट्यशिक्षक होते हे लेखकाचे वाक्य पुरेपूर लागू पडते.

बोलपटातील कलावंत, नाटक करताना तालमीला येत नसत ते सांगताना लेखक म्हणतात. त्यांचा बिचारा नाट्यदिग्दर्शक गर्भश्रीमंत मुलाची शिकवणी करणाऱ्या गरजू गुरुजीप्रमाणे हो ना हो ठोकून देतो. हे सांगत असताना श्रीमंत मुलांना शिकवण्यासाठी गरजू शिक्षक त्यांच्या घरी जात. त्यांच्या हो ला हो करत हे सांगत असताना नाट्यकलेच्या क्षेत्रात असूनही लेखकाचे सामाजिक शैक्षणिक बाबींकडे कसे लक्ष होते, ते दिसून येते. (पान ६ वर)

पान १ वरून

## कडक शासन हवे!

या वृत्तीचा निषेधच करावा लागेल. महिला सुरक्षेप्रति समाज आणि आस्थापनांनी अधिक सजगता दाखवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. यासाठी काही ठोस उपाय आणि बदल आवश्यक आहेत. महिलांच्या सुरक्षिततेसाठी समाजामध्ये लिंगभेदविरहित शिक्षण देणे महत्त्वाचे आहे. जनजागृती कार्यक्रमांद्वारे महिला सशक्तीकरणावर भर द्यावा, ज्यामध्ये महिलांचे हक्क, कायदे आणि सुरक्षेच्या बाबतीत माहिती दिली जावी. कायद्यांचे कठोर अंमलबजावणी करणे नितांत गरजेचे बनले आहे. महिलांविरोधी गुन्ह्यांच्या बाबतीत कडक कायद्यांची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. तसेच न्यायव्यवस्था आणि तक्रार निवारण प्रणाली कार्यक्षम करावी लागेल. महिलांकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन बदलण्याची आवश्यकता आहे. त्यांना आदर, समानता आणि स्वातंत्र्य देणे हे प्रत्येक व्यक्तीचे कर्तव्य आहे. लैंगिक असमानता दूर करण्यासाठी पुरुषांनाही त्यांच्या विचारांमध्ये आणि कृतींमध्ये बदल घडवावे लागतील.त्याचवेळी कामाच्या ठिकाणी महिलांसाठी सुरक्षित वातावरण निर्माण करणे, हे आस्थापनांचे कर्तव्य राहील. यासाठी आवश्यक सुरक्षा उपाययोजना राबवणे आवश्यक आहे. आस्थापनांनी लैंगिक छळाविरोधी कठोर धोरणे लागू करावीत. तक्रारींची त्वरित आणि पारदर्शी चौकशी करून आरोपींवर कठोर कारवाई केली, तर अशा घटनांना काहीअंशी चाप बसेल. महिलांच्या प्रगतीसाठी विशेष प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे, त्यांचे नेतृत्व विकासासाठी प्रोत्साहन देणे आणि त्यांना कारकिर्दीत पुढे जाण्याची संधी प्रदान करावी लागेल. अशा काही ठोस उपाययोजना राबवल्या, तरच महिलांच्या सुरक्षेसाठी आवश्यक ती सजगता वाढू शकते. यामुळे महिलांना एक सुरक्षित आणि सन्मानजनक जीवन जगता येईल.

## ब्रिटनमध्ये वर्णद्वेषाचा वणवा पेट घेतोय!

बेकायदेशीररित्या आलेल्या लोकांमुळे गुन्ह्यांमध्येही मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे. गेल्या काही वर्षांमध्ये ब्रिटनमध्ये मुस्लीम धर्मीयांची संख्या दोन टक्क्यांपासून वाढून ६.६ टक्के झाली आहे. त्यात बेकायदेशीररित्या आलेल्या लोकांची भर पडत आहे. संपूर्ण मुस्लीम समाजाला दोष देणे योग्य नसले तरी त्यातील एका मोठ्या घटकाचा ब्रिटिश संस्कृतीशी एकरुप व्हायला नकार, देशापेक्षा धर्मभावनेला प्राधान्य देणे, मूलतत्त्ववादी विचारसरणी, गुन्हेगारीचे मोठे प्रमाण तसेच मुस्लीमबहुल भागात इस्लामी नियम लावण्याचे प्रयत्न यामुळे ब्रिटनमधील कनिष्ठ मध्यमवर्गीयांमध्ये असंतोष वाढत होता. गाझातील युद्धाविरोधात ब्रिटनमध्ये लाखोंच्या संख्येने लोक रस्त्यावर उतरले.

ज्या देशांमध्ये लोकशाही नाही, मानवाधिकार नाहीत तेथून हे लोक ब्रिटनमध्ये येतात. आम्हालाच लोकशाही व्यवस्थेतील हक्क शिकवतात, या भावनेत वाढ होत आहे. उजव्या हुजूर पक्षाचा मोठा पराभव झाल्यामुळे ब्रिटनमध्ये राजकीय पोकळी निर्माण झाली. कीर स्टार्मर पंतप्रधान झाले, तेव्हा त्यांच्याबद्दल एका प्रकारची आश्वासकता निर्माण झाली होती. कारण, ते खऱ्या अर्थाने ब्रिटनमधील कनिष्ठ मध्यमवर्गाचे, कष्टकऱ्यांचे प्रतिनिधित्व करतात. पण, या दंग्यांमध्ये सरकारने जे कडक धोरण अंगीकारले, ते पाहून या देशात दोन प्रकारची पोलीस व्यवस्था आहे का, असा प्रश्न विचारला जाऊ लागला. एकीकडे बेकायदेशीररित्या येणाऱ्या लोकांवर नियंत्रण आणण्यात, तसेच त्यांच्याकडून होणाऱ्या गुन्ह्यांची संख्या कमी करण्यात सरकारला अपयश येते; पण ज्यांच्या अनेक पिढ्या ब्रिटनमध्ये नांदल्या आहेत, त्यांनी रागाच्या भरात हिंसाचार केला, तर त्यांना दहशतवाद्यांसारखी वागणूक दिली जाते, ही गोष्ट पचवणे ब्रिटनमधील श्वेतवर्णीय कनिष्ठ मध्यमवर्गीय लोकांना अवघड जात आहे.

ब्रिटनमध्ये २०११ सालानंतर दंगे झाले नव्हते. ऑगस्टच्या सुरुवातीपासून पेटलेले दंगे आता शांत झाले असले, तरी समाजात अत्यंत स्फोटक परिस्थिती आहे. ब्रिटनची अर्थव्यवस्था, सार्वजनिक आरोग्यव्यवस्था, शिक्षण तसेच सार्वजनिक वाहतूकव्यवस्था ढासळत आहे. हुजूर पक्षाच्या पराभवामुळे अतिउजव्या विचारसरणीचे पक्ष आणि संघटनांची लोकप्रियता वाढत आहे. दुसरीकडे या लोकांच्या वर्णभेदी वागणुकीविरोधातही मोठ्या संख्येने लोक रस्त्यावर उतरले. त्यांना असे वाटते की, सरकार दंगेखोर लोकांवर जरब बसवण्यात अपयशी ठरले. दुसरीकडे उजव्या विचारसरणीच्या लोकांना वाटते की, सरकार मुस्लीम, कृष्णवर्णीय आणि बेकायदेशीर लोकांना मूळच्या ब्रिटिश लोकांपेक्षा चांगली वागणूक देत आहे. सध्या परिस्थिती पूर्वपदावर येऊ लागली असली तरी भविष्यात कधीही या असंतोषाची ठिणगी पडून दंगे पेटू शकतात.

## वाचाळवीरांची सेना

इथली हवा आणि माणसं इतकी तरल की कुणीही यावं आणि यांच्या प्रेमात पडावं. त्यामुळेच काळारामही इथं अगदी सहज वसला. पंचवटी, भद्रकाली आणि गोदेकाठचा काही परिसर इतकेच काय ते पूर्वीचे नाशिक शहर होते. परंतु, जसजशी भिन्न स्वभावाची माणसे शहरात दाखल व्हायला लागली, तशी या शहरवाढीबरोबरच अपप्रवृत्तीदेखील डेरेदाखल झाल्या.

आज या जुन्या नाशिकमधले वाडे जसे माना टाकत आहेत, अगदी तसाच या जुन्या नाशिकने आपल्या अंगाखांद्यावर मिरवलेला धार्मिक आणि सांस्कृतिक वारसा इथे काही अपप्रवृत्ती दडपू पाहत आहे. आता शहरात कुठेही काही अनुचित घटना घडली की, जुन्या नाशिकमधील दूधबाजार, भद्रकाली, बडी दर्गा, शालिमार आणि मेन रोड या भागांत त्याचे पडसाद उमटतात. घडलेली घटना अगदी ताजी आहे.

बांगलादेशात सुरू असलेल्या अराजकतेचा नाहक त्रास तेथे वास्तव्यास असलेल्या हिंदूंना भोगावा लागत आहे. याकडे सरकारचे लक्ष वेधले जावे आणि या नरकयातनेतून हिंदूंची सुटका व्हावी, या इतक्या साध्या मागणीसाठी सकल हिंदू समाजाकडून 'नाशिक बंद'ची हाक देण्यात आली. याला संपूर्ण शहराने पाठिंबा दर्शवत कडकडीत बंदही पाळला.

सगळे सुरळीत राहणे जुन्या नाशिक परिसरात राहणाऱ्या काही नतद्रष्टांच्या पोटात दुखले. सकल हिंदू समाजाच्या कार्यकर्त्यांनी आपली दुकाने बंद करण्याची विनंती स्थानिक दुकानदारांना केली. त्याचा इतका राग या समाजाला आला की, ते सर्व या कार्यकर्त्यांवरच तुटून पडले. हातात जे येईल ते भिरकवायला या समाजाकडून सुरुवात केली गेली. याचे स्वरूप इतके वाढले की, पोलिसांना हस्तक्षेप करावा लागला.

नाशिकला मोठा राजकीय, ऐतिहासिक, धार्मिक आणि सांस्कृतिक वारसा लाभला आहे. तो तसाच जपून पुढच्या पिढीकडे सुपूर्द करण्याची जबाबदारी इथे राहणाऱ्या प्रत्येकाचीच आहे. या जबाबदारीचे भान जसे हिंदूंना आहे, तसेच ते भान अन्य समाजानेही राखावे, तरच 'फुलांचे शहर' म्हणून प्रसिद्ध 'गुलशनाबाद' फुलासारखेच कोमल राहील.

गौरव
शरद चव्हाण

## वनमाला ठमाताई....

ओरसा मधील हलधर नाग यांची कथा आपल्या सर्वांना माहितीच आहे. जेव्हा त्यांना पद्मश्री पुरस्कार जाहीर झाला. त्या वेळेस त्यांनी सांगितले होते की, साहेब पुरस्कार घेण्यासाठी प्रवासाचे पैसे नाहीत. त्यामुळे दिल्लीला येऊ शकत नाही. कृपया पोस्टाने पुरस्कार पाठवावा. यामध्ये नेमका कोणता पुरस्कार मिळालेला आहे ह्याची त्यांना जाणीव नव्हती. परंतु तत्कालीन राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्या हस्ते विविध क्षेत्रात कर्तृत्व गाजवणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यासाठी दिला जाणारा राष्ट्रपती पुरस्कार स्वीकारण्यासाठी, जाण्या-येण्याचे विमान तिकीट दिलेले असतानाही केवळ आपल्या सोबत ज्या काम करत आहेत. त्या आपल्या ताईला मिळणारा पुरस्कार सोहळा पाहता यावा, ह्या अपेक्षेसाठी म्हणून व्यक्तिगत विमानाचे तिकीट नाकारून रेल्वेच्या स्लीपर क्लासने प्रवास करणाऱ्या वनवासी समाजाच्या ठमा अनंत पवार यांचा जीवनपट अनेक दृष्टीने अलौकिक आहे.

ठमा अनंत पवारपासून आज सर्वदूर ठमाताई पवार, एक थोर सामजिक कार्यकर्त्या, वनवासी क्षेत्रात भरीव काम करणाऱ्या वनवासी कल्याण आश्रमाच्या सन्माननीय पदाधिकारी ते प्रांत अध्यक्षां पर्यंतचा त्यांचा प्रवास हा थक्क करणारा आहे. वयाच्या आठव्या वर्षी लग्न होऊन गोरकामत गावात आलेल्या ठमाताईंचे कर्तृत्व व व्यक्तित्व इथेच आकारास आले विशेष बाब म्हणजे नावारूपाला येऊनही ठमाताई आजही आपल्या कुड्या मातीच्या चंद्रमौळी झोपडीत आनंदाने राहत समाजाचे कार्य करीत आहेत. कर्जतच्या पायथ्याला असलेल्या जांभिवली येथील वनवासी कल्याण आश्रमाच्या केंद्राचे नव्वदच्या दशकात प्रमुख असलेले चिंतक व लेखक विवेक घळसासी यांच्या संपर्कात प्रथम त्या आल्या ते केंद्रामध्ये असलेल्या मुलांसाठी भाकरी व पोळ्या लाटण्यासाठी म्हणून. घळसासींनंतर केंद्राचे प्रमुख म्हणून डॉ. कुंटे व सौ. कुंटे हे वनवासी बांधवांची सेवा करण्यासाठी रुजू झाले. ठमाताईंचा मुलांना भाकरी व पोळ्या करून देण्याचा क्रम सुरूच होता. केंद्रात नव्याने आलेल्या डॉ. कुंटे व कुंटे काकुंच्या प्रदीर्घ सहवासाने ठमाताईंच्या जीवनाला एक वेगळीच कलाटणी मिळाली. खरंतर पंढरपूरच्या विठाईचा रंग ल्यालेल्या ठमाताई या भारतातील ज्या काही अदिम जनजाती म्हणून नोंदवल्या गेलेल्या आहेत. त्यापैकी एक असलेल्या कातकरी समाजात जन्मलेल्या मात्र नाकी डोळी नीट, भव्य शरीरयष्टी, उंच पुऱ्या भारदस्त अगदी शंभरात सहज उठून दिसतील अशा होत्या.

आई लहानपणीच वारलेली. वडिलांनी दुसरे लग्न केलेले, तरणोपाय नाही म्हणून अजाणत्या वयात लग्न झालेले. त्यातल्या त्यात समाधानाची बाब म्हणजे सासूबाई आणि आई यांच माहेर एकच असल्याने सासूबाईंनी आपल्या मुली सोबतच लहान वयातील ठमाची काळजी सून म्हणून न घेता मुलीप्रमाणे घेतली ती शेवटपर्यंत. त्यामुळे लहानपणापासून सासूबाईंचा सहवास आणि काम करताना त्यांच्याकडून ऐकलेली भजने वसतिगृहात पीठ मळताना, भाकरी करताना, चालताना पैंजणाच्या संगतीने आपोआप गुणगुणली जाऊ लागली.

काका व काकूंच्या स्वरमयी गळ्याशी व कानाशी ठमाताईंच्या पहाडी आवाजाची फ्रिक्वेन्सी मॅच झाली. झाले सासूबाईनंतर काकू त्यांच्या संगीत गुरु झाल्या. मग अनेक भजने, वनवासी व संघ गीत, आरत्या यांचा शिकवण्याचा परिपाठ सुरू झाला. उठ सूट मैफिली झडू लागल्या. केंद्रातील रोज सायंकाळी होणाऱ्या आरतीचा बाज हा उंचावत जावू लागला. काकूंच्या लक्षात आलं की आपल्यापेक्षाही ठमाताईंचा आवाज हा अधिक तरल व सुरेल आहे. शास्त्रोक्त पद्धतीने काही गीत तिने शिकली पाहिजेत म्हणून परिचयातील संगीत शिक्षकांनाही त्यांनी ठमाताईंना शिकवण्यासाठी केंद्रावर बोलावण्यास सुरुवात केली. मुळात अनेक गोष्टी ग्रहण करण्याची क्षमता असलेल्या ठमाताईंनी आवश्यक ते संगीत शिक्षण घेवून केंद्रात व पाड्यांवर भजन म्हण्यास सुरुवात केली. बघता बघता ठमाताई व काकूंचं जांबिवली परिसरातील नावाजलेले भजनी मंडळ तयार झाले.

ठमाताई केंद्रात आल्यानंतर काकू त्यांच्यासोबत आणि काकू वस्तीमध्ये आल्या की ठमाताई त्यांच्यासोबत हे समीकरण सुरू झाले. पुढे काकूंच्या प्रत्येक गोष्टीतली पहिली शिष्या ह्या ठमाताई झाल्या. संस्कार केंद्र काकूंनी सुरू केलं. त्याचे उत्तर दायित्व ठमाताईंनी स्वीकारले. परंतु लिहिता वाचता येत नव्हतं पण भजनाच्या माध्यमातून, जे काही वसतिगृहात मुलांना शिकवलं जायचं ते एकूण एकूण त्याचे संदर्भ देत बरोबरीने काकूंनी रामायण, महाभारत, पोथ्या ह्यांची पारायणे ठमाताईच्या घरापासून सुरू केली



त्यामुळे त्यातले ऐकलेले दृष्टांत, दाखले ठमाताई संस्कार वर्गातून मुलांना सांगू लागल्या. संस्कार वर्गातून रोज रोज चांगल्या गोष्टी सांगता सांगता त्या कळत नकळत आत्मसात होत गेल्या. चांगले वागण्याचा प्रयत्न सुरू झाला. केवळ आपणच चांगले झाले पाहिजे असं नाही तर आपलं घर, समाज बांधव ही सुसंस्कृत झाले पाहिजे हा एक ध्यास निर्माण झाला आणि त्यातून पुढील चळवळ सुरू झाली ती व्यसन मुक्तीची.

आदिवासी समाजाला पिढ्यानपिढ्या लागलेली व्यसनाधीनतेची जटील सवय. सहजतेने जाणारी नव्हती कारण ती वाईट प्रथा असली तरी त्याला रुढीपरंपरेचे, अंधश्रध्देचे भक्कम असे कवच लाभलेलं होतं आणि एका बाई माणसाने त्यात उतरून त्यावर काम करणं हे अत्यंत कठीण असं होतं आणि त्यावर विजय मिळवणं तर कदापि शक्य नव्हतं कारण याची सुरुवात प्रत्यक्ष ठमाताईंना आपल्या घरापासून म्हणजेच पती अनंत पवारांपासून करावी लागणार होती. म्हणतात ना च्यारीटी बिगिन्स एट होम तसा प्रयत्न सुरू केला. घरामध्ये, वाडीमध्ये आपल्या पत्नीद्वारेच सुरू असलेल्या प्रबोधनाचा परिणाम झिरपत झिरपत का होईना परंतु पतीवर होऊ लागला आणि कोणत्या एका क्षणी एका बुवांच्या उपस्थितीत मंदिरामध्ये तल्लीनतेने ठमाताई भजन म्हणत असताना दारूच्या नशेत बुवांच्या पुढे उभे ठाकलेल्या पतीनी बुवाच्या हातून तुळशीची माळ स्वीकारली त्यानंतर आजपर्यंत दारूला स्पर्श केला नाही. घरामध्ये मिळवलेल्या या विजयामुळे ठमाताईंनी मग मोर्चा आपल्या वाडीतील अन्य लोकांकडे वळवला.

दुसऱ्या दिवशी सकाळी होश आल्यानंतर लक्षात यायचे की मुलांना आपण रात्रभर उपाशी ठेवलेले आहे. हे दृश्य अनेक घरात सातत्याने पाहायला मिळत होते. संस्कार केंद्राच्या निमित्ताने ठमाताईंना मुलांचा आक्रोश दिसायचा परंतु स्वतःची पण परिस्थिती इतकी सधन नव्हती की मुलांचे रोज पालनपोषण केलं जावं. यावर उपाय म्हणून पहिल्यांदा महिलांचे दारू पिणे हे थांबवले पाहिजे हे त्यांच्या लक्षात आले हळूहळू भजनाच्या निमित्ताने व संस्कार वर्गामुळे आपल्या मुलां मध्ये होणारे सकारात्मक बदल पाहून स्वतःमध्ये परिवर्तन व्हावे असे वाटणाऱ्या महिलांचे येण्याचे प्रमाण वाढत चालले. ठमाताईंच्या पुढाकाराने वनवासी कल्याण आश्रमाच्या माध्यमातून पाड्यापाड्यांवर कुटीर उद्योग सुरू झाले त्यातून महिलांना घरबसल्या रोजगार मिळू लागला. किमान सणा सुदीला दारू पिऊ नये.. मग सलग नवरात्रीत उपवास सुरू झाले. मातेचे जागरण करण्यासाठी १५ किलोमिटर (पान ६ वर)

समर्थांचे साहित्य म्हणजे भव्य आणि उत्कट विचारसौदर्याचा आविष्कार आहे. रामकथा ब्रह्मांड भेदून पैलाड नेण्याच्या मुख्य उद्देशाने समर्थ साहित्याची निर्मिती झालेली आहे. अनेक प्रकारे रामकथा लिहून सुद्धा पुन्हा त्यांनी आत्माराम व मनाच्या श्लोकांमध्येही ते रामकथा सांगतात. राम राम सर्व म्हणतात पण आत्माराम कोणी जाणत नाहीत अशी खंत व्यक्त करतात. समर्थकृत 'हरे राम' मंत्राद्वारे आपण आत्माराम जाणून मनुष्य जीवन धन्य करू शकतो. हीच या लेखांची अपेक्षा आहे.

लेखांक ३४

# संत रामदासस्वामींचा रघुवीर समर्थ

(भाग पाच)

...रघुनंदन
विद्याधर ताठे
भ्र.९८८१९०९७७५



**'आत्माराम'मधील निर्गुण राम:-**

दासबोध आणि आत्माराम हे ग्रंथ समर्थांचे वाङ्मयरूप आहे. 'आत्माराम' ही केवळ पाच समासांची छोटेखानी रचना आहे. दासबोधातील राम हा सगुण आहे तर आत्माराम मधील श्रीराम निर्गुण आहे. भारतामध्ये जे अनेक भक्तीसंप्रदाय आहेत त्यात 'सगुणभक्ती पंथ' आणि 'निर्गुणी भक्तीपंथ' असे दोन स्वतंत्र पंथ आहेत. परंतु महाराष्ट्रातील वारकरी, समर्थ संप्रदाय हे सगुण निर्गुण समन्वयवादी, ऐक्यवादी आहेत. दासबोधामधील सगुण रामाचे दर्शनानंतर साधकाची चित्तवृत्ती शांत व स्थिर होते आणि त्यांचा रामाच्या सगुण रूपाकडून, भक्तीकडून निर्गुणाकडे वाटचाल सुरू होते. साधक-उपासक दासबोधाकडून 'आत्मारामा'कडे वळतो. समर्थ म्हणतात-

**सगुण उछेदावे। आणि निर्गुण प्रतिपादावे।**
**परी ते निर्गुण चि स्वभावे सगुण होते।।**

भक्तांसाठी निर्गुण ब्रह्म सगुणात प्रगट होते हे खरे असले तरी परमात्म्याचे, ब्रह्माचे, श्रीरामाचे मूळ निर्गुणच आहे. ब्रह्म रूप होऊन ब्रह्म अनुभवावे तसेच राम होऊन आत्मारामाची प्रचिती, प्रत्यय अनुभवावा. मीपणा जाऊन रामरूप होणे म्हणजेच अभेदभक्ती, सायुज्य मुक्ती होय. समर्थांचा 'आत्माराम' म्हणजे संत ज्ञानदेवांच्या 'अमृतानुभवा' सारखा प्रचितीचा ग्रंथ आहे. यात समर्थांची 'विश्वंभर झालो', 'सकळ देही विस्तारलो' हे जे बोल आहेत ते तुकोबांच्या 'अणुरणीया थोकडा तुका आकाशा एवढा' या प्रचिती सदृश आहेत. अंतरंगाने सर्व संत एकरूप असतात हेच यावरून सिद्ध होते. आत्माराम ग्रंथाचा प्रारंभ समर्थ रामाचे ध्यान, रामाला नमस्कार करूनच करतात.

**आता नमस्कारीन रामा। जो योग्याचे निजधाम।**
**विश्रांतीचा निजविश्राम। जये ठायी।।१।।**
**ऐसा सर्वात्मा श्रीराम। सगुण निर्गुण पूर्णकाम।**
**उपमाचि नाही निरूपम। रूप जयाचे ।।१५।।**

समर्थांच्या 'आत्माराम' ग्रंथाची नामयोगी ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांनीही स्तुती केलेली आहे. गोंदवलेकर महाराज म्हणतात, 'केवळ बध्दांनीच नव्हे तर सिद्धांनी सुद्धा समर्थांच्या आत्मारामातील परमार्थ शिकायला हवा.'

**'मनाचे श्लोक' रामदर्शन:-**

प्रभाते मनी राम चिंतित जावा। राष्ट्रसंत समर्थ रामदास स्वामी यांच्या प्रबोधक-प्रासादिक वाङ्मयातील 'मनाचे श्लोक', समस्त मराठी माणसांना परिचित आहेत. 'मनाचे श्लोक' म्हणत अवघ्या मराठी माणसांच्या काही पिढ्या संस्कारीत झालेल्या आहेत.

सहज, सरळ, सोप्या पण रोखठोक शब्दात उपदेश करणारे हे 'मनाचे श्लोक' म्हणजे समर्थ रामदास स्वामींच्या समग्र वाङ्मयाचे नवनीत आहे. मनाचे श्लोक हा समर्थ रामदासांचा समाजसंवाद, लोकसंवाद आहे; एवढेच नव्हे तर हे श्लोक नीतीशास्त्राची मूळाक्षरे आहेत असे स्वामी वरदानंदभारती म्हणतात.

मनाच्या श्लोकामध्ये श्रीरामाचा उल्लेख वारंवार येतो. '**सदा सर्वदा प्रिती रामी धरावी।**', '**मना राघवाविण आशा नको रे**', '**करी रे 'सदा सर्वदा प्रिती रामी धरावी।**', '**मना राघवाविण आशा नको रे**', '**करी रे 'सदा सर्वदा प्रिती रामी धरावी।**', '**मना राघवाविण आशा नको रे**', '**करी रे मना भक्ती या राघवाची**', '**दीनानाथ हा राम कोदंडधारी।**' अशा वेगवेगळ्या अर्थाने, वेगवेगळ्या पद्धतीने मनाच्या श्लोकांमध्ये रामदर्शन घडते.

एवढेच नव्हे तर '**नुपेक्षी कदा राम दासाभिमानी।**' असा (२८ ते ३७) या १० श्लोकात येतो, तसेच 'मना सज्जना राघवी वस्ती कीजे।' असा चरण (३८ ते ४७) पाच वेळा आढळतो. '**प्रभाते मनी राम चिंतीत जावा।**' हा चरण (६७ ते ७६) दहा वेळा समर्थ वापरतात. याशिवायही काही चरणांमध्ये राघवाचा उल्लेख आहे. यावरून समर्थांचे जीवन, दृष्टी आणि उपदेश कसा राममय झाला होता हे दिसून येते.

**समर्थांच्या अभंगगाथेतील राम तोचि विठ्ठल:-**

समर्थांची दृष्टी सांप्रदायिक संकुचितपणाची नव्हती. विविध देवतांच्या नाम व रूपा मागील ऐक्यभाव समर्थ जाणून होते. समर्थ जेव्हा पंढरपुराला गेले तेव्हा विठ्ठल मूर्तीतच त्यांना रामाचे दर्शन झाले.

राम, कृष्ण आणि विठ्ठल ऐक्यभावाचे दर्शन घडविणारा समर्थांचा हा अभंग पहा-

**राम अयोध्येचा वासी। तोचि नांदे द्वारकेसी।।१।।**
**आता भक्तांचियासाठी। उभा चंद्रभागे तटी।।५।।**
**राम तोचि विठ्ठल जाला। रामदासासी भेटला।।६।।**
**एथ उभा का श्रीरामा। मनमोहन मेघश्यामा ।।१।।**
**काय केले धनुष्यबाण। कर कटावरी ठेवून ।।२।।**
**रामदासी जैसा भाव। तैसा झाला पंढरीराव ।।७।।**

**समर्थांनी एका अभंगात 'विठोबा तू आमुचे कुलदैवत।', 'विठोबा हे आमुची जननी। भीमातीर निवासिनी। '** असे विठ्ठलाला आई-कुलदैवत म्हटले आहे.

**समर्थकृत 'राममंत्र' : हरे राम**

सर्व देवकथांमध्ये श्रीराम कथा सर्वश्रेष्ठ आहे. 'म्हणोनी कथा थोर या राघवाची।' हा समर्थांचा दृढभाव भक्तीचा आदर्श आहे. समर्थांचा राम एकच असला तरी त्या रामाची कथा त्यांनी अनेकदा, अनेक प्रकारे कथन केलेली आहे. त्यामुळे एका रामावर अनेक प्रकारे रामकथा लिहिणारे समर्थ हे एकमेव संतकवी आहेत. (पंडित कवी मोरोपंत पराडकर यांनी १०८ रामायणे लिहिली. अपवाद) समर्थांनी ज्या प्रकारे ज्या जोरकसपणे रामकथा निरूपित केली ती संतसाहित्यातील वीररसाचे व उत्कट भक्तीचे विलोभनीय वैशिष्ट्यपूर्ण दर्शन आहे.

समर्थांच्या राममय साहित्यामध्ये 'राममंत्र' नावाची ४९ श्लोकांची उत्कट, प्रभावी आणि प्रासादिक काव्यरचना आहे. उपासना काळात रामदासस्वामींनी टाकळी येथील गोदावरीच्या प्रवाहात उभे राहून राम नाम जपाचे पुरश्चरण केले. त्या पुरश्चरणाची फलश्रुती म्हणजे समर्थांची ही ४९ श्लोकांची 'राममंत्र' काव्य रचना होय; असे अभ्यासक म्हणतात. रामोपासनेमध्ये या राममंत्राचे स्थान अनन्य आहे.

**या राममंत्रातील काही श्लोक पाहू -**
**नको शास्त्र अभ्यास वित्पत्ति मोठी।**
**जडे गर्व ताठा अभिमान पोटी।**
**कसा कोणता नेणवे आजपा रे।**
**हरे राम हा मंत्र सोपा जपा रे।।१।।**

दासबोध, आत्माराम, मनाचे श्लोक व समर्थकृत अनेक रामायणे अभ्यासता आली तर उत्तमच पण ज्यांना ते जमणार नाही त्यांनी समर्थांच्या 'हरे राम', 'हरे राम' मंत्रांचा जप उपासना करून आपले जीवन धन्य करून घ्यावे.

जय जय रघुवीर समर्थ!!


# रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

थोडं मनातलं
विश्वास देशपांडे
भ्र. ९४०३७४९९३२

(भाग ११)

मागील दहा भागात आपण रवींद्रनाथांच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण कशी होत गेली ते आणि त्यांच्या शिक्षणविषयक कल्पना त्यांनी शांतिनिकेतनमध्ये प्रत्यक्षात कशा आणल्या, त्याबद्दल सविस्तर चर्चा केली. यापुढील काही भागात आपण टागोरांच्या साहित्याविषयी जाणून घेण्याचा प्रयत्न करणार आहोत. त्याआधी रवींद्रनाथांच्या जीवनात ज्या एका घटनेचा महत्वाचा संबंध आहे, ती घटना जाणून घेणार आहोत. या गोष्टीचा संबंध आपल्या महाराष्ट्राशी आहे. दुसऱ्या शब्दात सांगायचं तर हीच गोष्ट महाराष्ट्र आणि प. बंगालमधील एक दुवा आहे. टागोरांना महाराष्ट्राशी जोडणारी ही एक सुंदर आणि हळवी कहाणी. काहीशी हुरहूर लावून जाणारी.

शाळेत रवींद्रनाथांचं लक्ष लागत नव्हतं. इतर विद्यार्थी आणि हा जन्मजात प्रतिभेचं देणं घेऊन आलेला विद्यार्थी यांच्यामध्ये जमीनअस्मानाचं अंतर होतं. शिक्षणाच्या तत्कालीन पारंपरिक चौकटीत बसणारं हे व्यक्तिमत्व नव्हतं. पण रवींद्रनाथांचा कौटुंबिक वारसा अतिशय उज्वल आणि संपन्न होता हे आपण मागील काही भागात पाहिले आहे. आईवडील, भाऊबहीण, काका, आजोबा आदी सगळीच मंडळी पुरोगामी विचारांची होती. या वाडीमध्ये कुटुंबातील ६०-७० सदस्य गुण्यागोविंदाने राहत होते. प्रत्येकाजवळ कलेचा कुठलातरी वारसा होता, कौशल्य होते. अगदी घरातील नोकरचाकर मंडळी सुद्धा याला अपवाद नव्हता. विशेष म्हणजे या मंडळींचे हे पुरोगामी विचार केवळ सांगण्यापुरते नव्हते. त्याप्रमाणे त्यांच्या आचरणात या गोष्टी प्रतिबिंबित होत होत्या. म्हणूनच जेव्हा लहान असलेल्या रवीला शाळेत जाणे आवडत नव्हते, तेव्हा या कुटुंबातील लोकांनी त्याला मारून मुटकून शाळेत पाठवले नाही. त्याला त्याच्या इच्छेप्रमाणे शिक्षण घेऊ दिले. त्यामुळेच लहान वयापासून कविता करणे, नाटके लिहिणे, ती बसवणे यासारख्या गोष्टीत त्याच्या प्रतिभेची चमक दिसू लागली. उपजीविकेसाठी काहीतरी विशेष शिक्षण तर घ्यायलाच



हवं होतं असं त्यांच्या कुटुंबियांना वाटलं. त्यांनी मग रवींद्रनाथांना वकिलीचं शिक्षण घेण्यासाठी इंग्लंडला पाठवण्याचं ठरवलं. त्यावेळी त्यांचं वय होतं १७/१८ वर्षांचं.

आता इंग्लंडला जायचं तर उत्तम इंग्रजी बोलता यायला हवं, तेथील एटीकेट्स, मॅनर्स माहिती असायला हव्यात यासाठी त्यांना आधी मुंबईला पाठवायचं ठरलं. मुंबईत असणारे डॉ. आत्माराम पांडुरंग तर्खड हे सत्येंद्रनाथांचे मित्र होते. सत्येंद्रनाथ म्हणजे रवींद्रनाथांचे थोरले बंधू. मुंबईतील ग्रॅण्ट मेडिकल कॉलेज सुरु झाल्यानंतर त्यातून डॉ. होऊन बाहेर पडणारे पहिल्याच बॅचचे हुशार विद्यार्थी म्हणजे डॉ. तर्खड किंवा तर्खडकर. टागोरांच्या प्रमाणेच तर्खडकर यांच्याही घरातील सर्व मंडळी प्रगत विचारांची होती. मुंबईतील प्रार्थना समाजाच्या स्थापनेत डॉ आत्माराम पांडुरंग हे संस्थापक सदस्य होते.

आपल्या सर्व मुलांना त्यांनी उत्तम शिक्षण दिले होते. त्यांची मुले इंग्लंडमधून उच्च शिक्षण घेऊन आली होती. त्यांना एक मुलगी होती. तिचे नाव अन्नपूर्णा. ही सुद्धा इंग्लंडहून उच्च शिक्षण घेऊन आली होती. तिचं वय त्यावेळी साधारण १९-२० वर्षांचं असावं. आता ह्या रवींद्रला इंग्रजी शिकवण्याची जबाबदारी तिच्यावर येऊन पडली. त्याकाळात बंगालमध्ये स्त्री पुरुष किंवा मुलं आणि मुली यांच्या संबंधात फारसा मोकळेपणा नव्हता. पण मुंबईत अनाच्या सहवासात आल्यावर तिच्या मनमोकळ्या वागण्यामुळे रवींद्रनाथांचा बुजरेपणा हळूहळू कमी झाला. त्यांच्यात मनमोकळ्या गप्पा होऊ लागल्या. अना ही मूर्तिमंत सौंदर्याचं प्रतीक होती. रवींद्रनाथही अत्यंत देखणे होते. रवींद्रनाथांच्या देखणेपणाची ती तारीफ करत असे. तिचं नाव जरी अन्नपूर्णा असलं तरी रवींद्रांनी आपल्यासाठी खास एखादं नाव ठेवावं असं तिला वाटत होतं. रवींद्रनाथांनी तिच्यासाठी 'नलिनी' या सुंदर नावाची निवड केली. रवींद्रनाथ तिच्याकडे साधारणपणे दोन महिने राहिले. ते तिला आपल्या 'कबिकाहिनी' (कवी कथा) या काव्याचा अनुवाद करून ऐकवीत असत.

मुंबईतील दोन महिन्यांच्या वास्तव्यानंतर रवींद्रनाथ इंग्लंडला निघून गेले. पण तर्खड कुटुंबियांना रवींद्रनाथ आणि अना यांच्या नात्याचा अंदाज आला होता. त्यांनी रवींद्रनाथ आणि अना यांच्या लग्नाचा प्रस्ताव टागोर कुटुंबीयांकडे पाठवला होता. पण अना ही रवींद्रनाथांपेक्षा वयाने मोठी असल्याने टागोर कुटुंबीयांनी या प्रस्तावाला नकार दिला. पुढे अनाचे लग्न बडोदा कॉलेजचे उपप्राचार्य हॅराल्ड लिट्लडेल यांच्याशी झाले. या विवाहाला तिची संमती होती का किंवा तिने हे लग्न कसं स्वीकारलं हे एक गूढच आहे. पुढे त्यांच्यासोबत ती स्कॉटलंडमध्ये स्थायिक झाली. पण तिला तेथील हवामान न मानवल्याने ती आजारी पडली आणि तिचे वयाच्या अवघ्या ३३ व्या वर्षी निधन झाले.

अना आणि रवींद्रनाथ यांच्यातील संबंध केवळ शारीरिक आकर्षण या पातळीवर नव्हते. त्यांच्यातील अस्फुट, अव्यक्त प्रेमसंबंध हे दोघांच्याही जीवनावर कायमस्वरूपी प्रभाव पाडणारे होते. हॅरोल्ड लिट्लडेल यांच्याशी विवाह झाल्यानंतरही अनाने आपले 'नलिनी' हेच नाव कायम ठेवले होते. तर रवींद्रनाथ आपल्या आयुष्याच्या अखेरीपर्यंत अनाला विसरू शकले नाहीत. त्यांच्या काव्यात ती आजही जिवंत आहे.

बंगाली सण, उत्सवात अनेकदा गायिल्या जाणाऱ्या रवींद्र संगीतात प्रेमाचा अप्रतिम संगम आहे. 'भलोभेसे शोखी, निभ्रते जोतोन' (हे प्रिये, तुझ्या आत्म्याच्या मंदिरात प्रेम आणि प्रेमाने माझे नाव लिही.) रवींद्रनाथांचं अनावर असणारं प्रेम शेवटपर्यंत जरी कायम असलं तरी ते दैहिक नव्हतं. त्यांच्या काव्याची ती प्रेरणा जरूर ठरली. पण आपली पत्नी मृणालिनीदेवी यांच्यावर रवींद्रनाथांनी निस्सीम प्रेम केलं. मृणालिनी ही त्यांच्या जगण्याची ओढ होती, त्यांच्या कार्याला प्रेरणा देणारी होती. असंही म्हणता येईल की अना आणि रवींद्रनाथ यांचं नातं नितळ, पारदर्शी होतं. काही नाती अशीही असतात की ज्यांना आपल्या नात्याचं स्पष्टीकरण देण्याची गरज नसते. रवींद्रनाथ आणि अना या दोघांचंही नातं अशाच प्रकारचं पारदर्शी आणि नितळ होतं. ते निभावण्यामागे दोघांच्याही मनाचा मोठेपणा दिसतो. खरोखरीच हेवा वाटावा अशा प्रकारचं हे नातं होतं.

रवींद्रनाथांच्या अनेक कवितांची नलिनी ही प्रेरणा ठरली. त्यांच्या 'शैशवसंगीत' या काव्यसंग्रहातील अनेक कविता तिच्याबद्दलची भावना व्यक्त करणाऱ्या आहेत. त्यांची एक कविता 'शुन नलिनी खोल गो आँखि' (ऐक नलिनी उघड नेत्र), तसेच 'आमि स्वप्ने रयेछि भोर, सखी आमारे जागायो ना' (मी स्वप्नात रमलो आहे, सखी मला जागे करू नकोस) यासारख्या कविता तिच्यावरच आहेत. याशिवाय १८८४ साली रवींद्रनाथांनी 'नलिनी' या नावाचं एक नाटकही लिहिलं होतं. या नाटकाची स्मरणपत्रिका त्यांनी कोरीच ठेवली होती. त्यांना हे नाटक तिला अर्पण करायचं होतं असं सांगितलं जातं. (क्रमशः)

# होऊ नये कोणाच्याही मृत्यूचा विनोद



अमृतकुंभ
प्रा. वसंत गिरी
भ्र. ९०११२२९२३२

आमच्या एका जवळच्या शिक्षक मित्राचा अनुभव. नागपूरपासून साधारणपणे तीस कि. मि. अंतरावर ग्रामीण भागातील माध्यमिक शाळेत तो नोकरी करत होता. दररोज नागपूरवरुन येजा सुरु असल्याने त्याची व सोबतच्या सर्व सहकार्यांची खूप दमछाक व्हायची. बस टाईम अगदी मोजके आणि अवेळी असल्यामुळे वेळेवर जेवण किंवा पुरेशी झोप त्यांना मिळत नव्हती. त्यांचा दामोधर खरे नावाचा एक सहकारी मात्र नोकरीच्या गावी राहत होता. येजा करणाऱ्या आपल्या सहकार्यांचे हाल पाहून आपण किती सुखात आहोत, हा त्याचा आनंद मनात न ठेवता तो अनेकदा बोलून दाखवायचा. अरे, काय जवान माणसं तुम्ही, नुस्ती धावपळ करता. वेळेवर जेवण करत नाही. काही खात पित जा. काय तोंड सुकून गेली तुमची. ऊसाच्या चिप्पाडासारखी. आता हा नेमका काळजी करण्याचा प्रकार आहे का आपल्याला डिवचण्याचा हे नेमके येजा करणाऱ्या शिक्षकांच्या लक्षात येत नव्हते.

एक दिवस शाळा सुटल्यावर नागपूरचे सर्व शिक्षक परतीच्या मार्गावर होते. तसा हा खरे उर्फ दामूअण्णाचा आग्रह सुरु झाला. आज आपल्याकडं जेवण करायचं. मुक्काम पण इथंच करायचा. एकदम जोरदार जेवण करू. अरे, काय तुमची नुस्ती धावपळ. हे आपलं घर, परकं समजायचं नाही. नागपूरला निघणारे सर्व शिक्षक त्यासाठी नकार द्यायला लागले. शेवटची गाडी येणार होती. दामूअण्णाचा आग्रह मात्र काही केल्या संपेना. शेवटी सर्वांनी त्याच्या आग्रहाचा सन्मान करायचा असं ठरवलं आणि दामू अण्णाच्या घराचा रस्ता सर्वांनी धरला. घरी गेल्यावर फक्त पाणी पाजून अण्णानं तासभर अगदी फुकटछाप गप्पा मारल्या. त्यानंतर सौ.ला आवाज दिला, आज ही सगळी मंडळी आपल्याकडं जेवणार आहे. एकदम झक्कास काहीतरी बनवा. तसा त्यांच्या सौ.दामिणीबाईंना शॉक बसला. त्यांनी या पतीदेवांना आत बोलावून घेतलं आणि म्हणाल्या, अहो घरात पिठ नाही, भाजीला काही नाही. जेवण तयार करणार कसं? तसा दामूअण्णाचा आवाज, अरे जे असलं ते बनवा. आपली माणसं आहेत. आनंदान खातील. दामिनीबाईनी सांगितलं, शिळ्या भाकरी आहेत अन् त्यासोबत पिठलं बनवता येईलं. दामू अण्णा लगेच म्हणाले. अरे, मग ते बनवा. बाईंनी पती देवाची ऑर्डर फॉलो केली. सर्वांनी पिठलं भाकर गोड करुन घेतली. नाहीतरी काय करतील? तेही सर्वांना पुरले नाही. कसेबसे ते जेवन सर्वांनी घशाखाली घातले. आता या दामूनं आपली जीभ आवरायला पाहिजे होती पण शेवटी हे महाशय म्हणतात कसे, बरे झाले तुम्ही लोकं जेवायला थांबले. नाहीतर त्या शिळ्या भाकरी अन् ते चार महिण्याअगोदरच हरभऱ्याचं पिठ आम्हाला फेकूनच द्यावं लागलं असतं. आता मात्र कोणालाच राहवले नाही. सर्वांनी मनमुराद हसून घेतले. रात्री तिथे झोपल्यावर सर्वांना पुरेसे अंथरुन पांघरुन नव्हते.

लोड शेडिंगमुळे रात्री लाईन गायब झाली. रात्रभर डासांनी फोडून काढल्यावर ही नागपूरकर मंडळी सकाळी एकमेकांच्या तोंडाकडं पाहू लागली. रात्री झोपण्यापूर्वी हा माणूस आपल्यासोबत होता का? प्रत्येकजण एकमेकांकडे संशयाने पाहू लागला. आरशात पाहिल्या पाहिल्या त्यांना त्यांचाच चेहरा ओळखू येत नव्हता. दामूअण्णा आग्रह करताना म्हणत होता. अरे, काय चेहरे सुकून गेले तुमचे? काही खात पित जा. सर्वांचे चेहरे कसे टवटवीत टमाट्यासारखे झाले होते. आता हा नवा चेहरा घेऊन सर्वांना शाळेत जायचे होते. त्या दिवशी सकाळची शाळा होती. दामूअण्णा या सगळ्याकडं पाहून आभाळ गडगडतं तसं दात काढून हसायला लागला अन् वरुन त्यानं असा शिक्का बी मारला. अहो, तुम्हाला कसे काय एवढे डास चावले. मलं तं एकबी नाही चावला. त्यावर कडी करण्यासाठी लगेच गणपा मास्तर म्हणाला, अहो, अण्णा ते डास आम्हला सांगू लागले. दामू मास्तर आम्हाला चावतोय. मग आम्ही कोणाला चावावं? ते तुम्ही सांगा. तोपर्यंत आम्ही तुम्हाला फोडून खातो. या समयसूचक कोटीवर सगळे खळखळून हसले. पण, यापुढे दामूअण्णापासून खूप सावध वागले पाहिजे. हा धडा सर्वांनी घेतला. दामूअण्णाची सेवाज्येष्ठता लक्षात घेवून त्याला वरकरणी का होईना. सर्वजन सन्मान द्यायचे. त्यामुळं हा अण्णा एवढा काही हरभऱ्याच्या झाडांवर चढून बसायचा. गावात पत्याचे डाव मांडणे, रात्रपाळी देण्यासाठी रात्री गॅसबत्ती घेवून शाळेत जाणे. आता ऐकणाऱ्याला वाटेल, काय प्रेम या शिक्षकाचं आपल्या शाळेवर. रात्रीला शाळेत मुलांना शिकवतो की काय? पण हा तुमचा भ्रम दूर झाला पाहिजे. गावातीलं सर्व पत्तेबहाद्दर एकत्र करुन त्यांचा गेम रात्री केंव्हापर्यंत चालेलं हे ब्रह्मदेवासही सांगणे कठीण होते. एखाद्याला पूर्ण बरबाद केल्याशिवाय या बहाद्दरांना चैन पडायची नाही. पूर्ण खिसा रिकामा करण्याची वेळं अण्णावर अनेकदा आली. दामूअण्णाचं पासबुक सदैव सावकाराच्या ताब्यात असायचं. या सर्व उपदव्यापातून येणारं नैराश्य घालवण्यासाठी दुसऱ्या दिवशी दामिनीबाईला भांडून, प्रसंगी तीला मारुन घरात तो शेर व्हायचा. नैराश्य घालवण्यासाठी देशी, नवसागर, भांग, गांज्या हे सर्व क्षणिक सुखाचे मार्ग दामूअण्णाला जवळचे वाटायचे. मी मुख्यालय सोडून राहत नाही. हा त्यांच्यासाठी खूप अभिमानाचा विषय. त्या एका मुद्यावरुन ते इतर शिक्षक, मुख्याध्यापक व अध्यक्षांचेही तोंड बंद करायचे. मुख्यालयी राहून शाळेची प्रतिष्ठा किती वाढवायचे? हा मात्र एक यक्ष प्रश्न होता. प्रतिष्ठेच्या कल्पना त्याच्याच खोपडीतून निघालेल्या असल्यामुळं त्याला समाजमान्यतेची गरज त्या महावल्लीला कधीही वाटली नाही. याउलट शाळेसाठी फक्त आपणच किती राबतो आणि सगळे कसे कामचुकार आहेत. हा त्याचा स्वतंत्र आणि मोफत व्याख्यानाचा विषय होता. तो सक्तीने त्याने किती लोकांना ऐकवला असेल? याचा हिशोब ठेवण्याची त्याला आवश्यक्ता वाटतं नव्हती. त्याच्या संपूर्ण सेवा कालावधीत दामिनीबाईच्या सततच्या तगाद्यामुळं त्याने एक म्हैस विकत घेतली होती. हा बहाद्दर जेव्हा पत्नीसोबत भांडायचा आणि तिला गुरासारखंच मारायचा तेव्हा ती म्हैस अस्वस्थ व्हायची. डोळे वटारुन पहायची. बांधलेल्या अवस्थेत जागच्या जागी जोरात हालचाल करायची. दोर तोडून गोठ्यातून बाहेर येण्यासाठी जोर काढायची. त्या मुक्या प्राण्याचा आपल्या मालकीनीसोबत कोणता स्नेहबंध होता? त्यामुळे ती तीच्या दुःखाने एवढी अस्वस्थ व्हायची? अनेकांना हा प्रश्न पडत होता. पतीपत्नीच्या वादात कुणीही मध्यस्ती केल्यास गाठ दामूअण्णाशी होती. त्यामुळे मोफत मनस्ताप विकत घ्यायला कुणी तयार होत नव्हते. दमिणीबाईला होणारा त्रास अनेक लोकांना बघवत नव्हता, शिवाय अण्णाच्या विचित्र वागण्याला सर्व गाव कंटाळला होता. त्यामुळं याचं 'रामनाम सत्य....' कधी होतं, असं दामूअण्णांचे हितचिंतक आपसात बोलू लागतं. एकेदिवशी सकाळी त्याच्या मृत्यूची बातमी गावात ऐकायला मिळाली. वरकरणी हळहळ व्यक्त होतं असली तरी सर्वांनी सुटकेचा श्वास सोडला. बरं झालं, गावाची आन् शाळेची पीडा गेली. असे शब्द कानावर पडू लागले. त्याच्या अंत्ययात्रेत त्याच्या म्हशीला शेजाऱ्यांनी सजवून धजवून तिच्या गळ्यात हार टाकून तिची पूजा करुन सहभागी करुन घेतलं. अनेक लोक आणि मोठ्या प्रमाणात महिला हजर होत्या. अण्णाचे शेजारी सांगू लागले. दामू मास्तर दामिनीबाईच्या अंगावर मारण्यास धावला तशी लगेच बदला घेण्यासाठी रात्री ही म्हैस दोर तोडून आली आणि दामूअण्णाला अक्षरशः घोळसून मारलं. त्यामुळे त्या म्हशीचे गावातर्फे एवढे कौतुक सुरु आहे. अशी चर्चा सुरु झाल्याबरोबर बाहेर गावावरुन आलेली एक महिला म्हणाली, मला एक दिवसासाठी ही म्हैस मिळलं का? त्यावर दुसरी एक महिला म्हणाली, मिळलं, पण बरीच वाट पहावी लागलं. ह्या सगळ्या आपल्या बहिणी नवऱ्याला कावूनच इथं आल्यात. त्या म्हशीसाठी नंबर लावाया.

नाहीतर काय त्या दाम्या मास्तराबद्दल कोणाच्या मनात कणभर तरी कणवं होती का? अन् म्हशीनं मारलं नस्त तर तसं मेलं आस्त का ते खत्रूड? करडीलं किडा नाही आनं खत्रूडालं मरण नाही. ती बय्या असं बोलताचं दामूअण्णाच्या मौतीतंपण काही लोकं तोंडाला हात लावून हसायला लागले. ज्यांच्याकडे प्रसंगावधान नाही त्यांना तर तोंडावर हात ठेवण्याची गरजंही वाटली नाही. एखाद्याच्या मरणाचंही असं हसं का व्हावं? यावर विचार करणं ज्यांना शक्य आहे. त्यांनी विचार करायला काय हरकत आहे.

# ग्रहसंकेत

## (रविवार, २५ ऑगस्ट ते शनिवार, ३१ ऑगस्ट २०२४)

नारायण जगन्नाथ कारंजकर, ज्योतिष भास्कर

ज्येष्ठ पत्रकार, फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो.कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र. ९४२३७५८४०१)

✻ **रविवार, २५ ऑगस्ट-** भानुसप्तमी, आदित्य पूजन, दादा महाराज केळकर जयंती सांगली, चिलेमहाराज जयंती पैजारवाडी ✻ **सोमवार, २६ ऑगस्ट-** कालाष्टमी, श्रीकृष्ण जन्माष्टमी उपवास, जयंती योग, शिवपूजन, शिवामूठ जवस, ज्ञानेश्वर महाराज जयंती आपेगाव, पंत महाराज बाळेकुंद्री, बंजारा तीज विसर्जन ✻ **मंगळवार, २७ ऑगस्ट-** गोपाळकाला मंगलागौरी पूजन, हरिमंदिर हत्तरगी महाप्रसाद, भवानीदेवी यात्रा व्हनाळी ✻ **बुधवार, २८ ऑगस्ट-** श्रीकृष्ण सरस्वती महाराज पुण्यतिथी कोल्हापूर, बुध पूजन ✻ **गुरुवार, २९ ऑगस्ट-** अजा एकादशी, राष्ट्रीय क्रीडा दिन, बृहस्पती पूजन ✻ **शुक्रवार, ३० ऑगस्ट-** तिथीवासर (७.५० पर्यंत), पूर्वा रवि (वाहन उंदिर), राष्ट्रीय लघुउद्योग दिन, जरा- जिवंतिका पूजन, संत सेना महाराज पुण्यतिथी, स्वामी स्वरुपानंद पुण्यतिथी पावस, गोरक्षनाथ झोळी खंडेराजुरी ✻ **शनिवार, ३१ ऑगस्ट-** शनिप्रदोष, श्री शनैश्वर शिंगणापूर अभिषेक, अश्वत्थ मारुती पूजन, सावळज यात्रा, पर्युषण पर्वारंभ (चतुर्थ पक्ष), कृष्णात माळी महाराज पुण्यतिथी सांगाव ता.कागल,

**मुहूर्तः-** ✻ **साखरपुडा-** २७, २८ ऑगस्ट (१३ पर्यंत) ✻ **बारसे** -१८ ऑगस्ट (१३ पर्यंत) ✻ **जावळ-** २८ ऑगस्ट (१३ पर्यंत) ✻ **गृहप्रवेश-** २८ ऑगस्ट (१३ पर्यंत)

### मेष :- कार्यक्षेत्रात प्रगती

गर्व हा एक मानसिक आजार आहे. निसर्ग व वेळच त्यावर उपाय करू शकतो. राशी स्वामी मंगळ सोमवारी पराक्रमस्थानी येत आहे. त्यामुळे कार्यक्षेत्रात प्रगती होत जाईल. उत्साह, धडाडीने कामे मार्गी लागतील. आर्थिक प्रगतीचे मार्ग खुले होतील. वाहन, सौख्य लाभेल. नव्या संधींचा लाभ उठवावा. गृहनिर्माण, विधी अशा क्षेत्रात विशेष अनुकूलता राहिल. अपेक्षित घटना घडल्याने समाधान वाटेल. शुभ ता. २८, २९

### वृषभः- सौख्याच्या घटना

ज्यांनी आपल्याला वेळ, सहकार्य, सर्मपण दिले त्यांना सांभाळून ठेवा. सोमवारी मंगळ धनस्थानी येत आहे. त्यामुळे खर्चाचे प्रसंग वाढणार आहेत. अनावश्यक खर्च कसोशीने टाळावेत. कौटुंबिक जीवनात सौख्याच्या घटना घडतील. नव्या कामांना गती मिळेल. यांत्रिक क्षेत्रात विशेष प्रगती साधता येईल. संततीबाबत शुभ घटना घडतील. अडचणींची चिंता नको. शुभ ता. २९

### मिथुनः- उत्साह, धडाडी वाढेल

ज्यांच्याकडे खोटे बोलण्याची कला आहे. ते दुसर्यांना खूश ठेवू शकतात. पण स्वतःस नाही. षष्ठेश, लाभेश मंगळ सोमवारी राशीत येत आहे. त्यामुळे उत्साह, धडाडी वाढेल. कमिशनवर चालणार्या व्यवसायात प्रगती होईल. कार्यक्षेत्रात विचाराने राहवे. धरसोडपणा टाळावा. धार्मिक कार्य घडतील. नव्या संधी विचाराने स्विकाराव्यात. दगदग टाळावी. शुभ ता. २७, २८

### कर्कः- धन चिंता राहिल

विवेकशील व्यक्ती नेहमी वर्तमानात जगतात. भूतकाळाचा पश्चाताप करीत नाही. की भाविष्याची चिंता करीत नाहीत. पंचमेश, दशमेश, मंगळ सोमवारी व्ययस्थानी येत आहे. त्यामुळे शिक्षणावर खर्च होईल. व्यवसाय धनचिंता राहिल. सरकारी कामे होतील. ज्ञानदान, बँक, विमा क्षेत्रात अनुकूलता वाढेल. अपेक्षित संधी लाभतील. विचाराने रहावे. शुभ ता. २८, २९

### सिंहः- समाधानकारक प्रगती

माणूस एक दुकान आहे. बोलणे त्या दुकानाचे कुलुप आहे. कुलुप उघडल्यावरच दुकान सोन्याचे आहे की, कोळश्याचे हे कळते. राशी स्वामी रवि राशीत आहे. त्यामुळे अंगीकृत कार्यात समाधानकारक प्रगती होईल. कार्यक्षेत्रातील चिंता कमी होईल. प्राप्तीचे प्रमाण समाधानकारक राहिल. महत्त्वाचे निर्णय पूर्ण विचाराने घ्यावेत. नवे विचार विचाराने स्विकारावेत. शुभ ता. २८

### कन्याः- धडाडीने रहाल

मोह नसावा पैशाचा, गर्व नसावा सौंदर्यांचा, अहंकार नसावा श्रीमंतीचा, ध्यसा असावा समाधानाचा, तरंच आनंद आहे जीवनाचा. कर्मस्थानी मंगळ येत आहे. त्यामुळे कार्यक्षेत्रात धडाडीने रहाल. घेतलेले निर्णय शुभ फलदायी ठरतील. नवे विचार मार्गी लावता येतील. अनुकूलतेचा लाभ उठवावा. प्रगतीच्या संधी लाभतील. तीर्थयात्रा घडतील. शुभ ता. २७, २९

### तुलाः- अपेक्षीत संधी

शंभर लोकांपेक्षा काहीतरी वेगळं जगायंच असेल तर एकट्याने जगण्याची सवय लावा. मंगळ भाग्यस्थानी येत आहे. त्यामुळे समस्या कमी होतील. सरकारी कामे मनासारखी होतील. हौस, मजेसाठी खर्च कराल. नव्या संधीचे स्वागत करावे. गृहनिर्माण, विधी अशा क्षेत्रात अनुकूलता वाढेल. व्यवसायात प्रगतीचा टप्पा गाठू शकाल. अपेक्षित संधी लाभतील. प्रकृती सांभाळा. शुभ ता. २९

### वृश्चिकः- सावध चित्त रहावे

ज्या वाटांनी कुठंही पोहोचण्याची शक्यता नसते, अशा वाटा बंद करणेच चांगले. राशी स्वामी मंगळ सोमवारी अष्टमात येत आहे. चौथा शनि आहे. त्यामुळे सर्व बाबतीत सावध चित्त रहावे. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे. नव्या योजना विचारपूर्वक स्विकाराव्यात. अडचणींची चिंता नको. मार्ग निघत जाईल. जनसंपर्क वाढेल. अपेक्षित घटना घडतील. शुभ ता. २८

### धनुः- अडचणीतून मार्ग निघेल

अशा माणसांबरोबर रहा, जी वेगवेगळ्या कल्पना आणि ध्येया बद्धल बोलतात. राशी समोर मंगळ येत आहे. त्यामुळे स्वमताग्रह टाळावा. पोटाच्या तक्रारी वाढतील. काळजी घ्यावी. भाग्यवृध्दिंगत करणार्या घटना घडतील. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे. उपजत कला-गुणांचा विकास साधता येईल. अडचणींतून मार्ग निघेल. कला गुणांचा विकास होईल. शुभ ता. २७

### मकरः- अपेक्षित प्रगती

जी माणसे इतरांची निंदा, नालस्ती करतात, त्यांच्याबरोबर कधीही राहू नका. सोमवारी मंगळ षष्ठात येत आहे. त्यामुळे उत्साहवर्धक घटना घडतील. कला-गुणांचा विकास होईल. गृहनिर्माण, विधी क्षेत्रात अपेक्षित प्रगती होईल. नव्या योजना मार्गी लागतील. घेतलेल्या शिक्षणातून प्रगती होईल. अडचणीतून मार्ग निघेल. विचाराने निर्णय घ्यावा. फार चिंता नको. शुभ ता. २७

### कुंभः- ठाम विचाराने रहावे

श्रध्दा व सबुरीमध्ये इतकी ताकद आहे की जी आपल्या हितशत्रूंचा पाया घलवू शकते. मंगळ पाचवा होत आहे. त्यामुळे समस्या कमी होत जातील. चिकाटीने केलेली वाटचाल शुभ फलदायी ठरेल. नव्या कामांना गती मिळेल. प्रगतीच्या संधींचे स्वागत करावे.अपेक्षित घटना घडतील. अनावश्यक खर्च टाळावेत. स्पर्धांमध्ये यश मिळेल. विचाराने रहावे. शुभ ता. २९

### मीनः- दगदग वाढेल

खर्या माणसाचं मौन खोट्या माणसाला मुळासकट उखडून टाकतं. व्ययात शनि तर चौथा मंगळ विनाकारण दगदग वाढविणार आहे. कार्यक्षेत्रात अपेक्षित प्रगती साधता येईल. कौटुंबिक जीवनात विचाराने रहावे. नव्या संधी विचारपूर्वक स्विकाराव्यात. प्रकृतीच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करू नका. नव्या विचारांना चालना मिळेल. चिंता नको. शुभ ता. २९

!! शुभ भवतु !!

पान २ वरून

## प्रार्थना : एक आदर्श भारतीय

पण, शेवटी ही प्रार्थनादेखील स्वतःपुरतीच आहे. अत्यंत उच्च प्रकारची असली, तरी केवळ स्वतःच्या उद्धाराची मागणी करणे हा स्वार्थच म्हणावा लागेल. परमार्थ हाही एक प्रकारे स्वार्थच आहे. पण, हा स्वार्थ परदुःखाला कारणीभूत न होता स्वतःचे शाश्वत कल्याण करणारा आहे. हा स्वार्थ माणसाचे अंतिम साध्य आहे. म्हणून सात्त्विक प्रार्थना माणसाने करावीच.

**४) प्रार्थनेची आवश्यकता-** प्रार्थना ही आदर्शाकडे जाण्याची प्रेरणा जिवंत ठेवते. निष्ठा जागृत ठेवण्याचे कार्य करते. माणसाला आपल्या ध्येयाचे नित्य स्मरण देऊन त्याला खाली घसरू देत नाही. आपल्या ध्येयाचे कधीही विस्मरण होऊ देत नाही. समाजामध्ये सामान्यतः असे आढळते की, लोक हाती घेतलेले काम निर्विघ्नपणे पार पडावे म्हणून प्रार्थना करतात. आदर्श शिष्टाचाराचे पालन त्याद्वारे केले जाते. वाचेचा दोषही त्याव्दारे नष्ट व्हावा. जे कार्य हाती घेतले असेल त्याच्या कर्तृत्वाचा अहंकार स्वतःकडे येऊ नये. नास्तिकतेचा आरोपही आपल्यावर होऊ नये व विनम्रता आपल्या कृती-उक्तीतून प्रकट व्हावी, असे उद्देश प्रामुख्याने प्रार्थना करण्यामागे आढळतात. या सर्वांचे तात्पर्य हेच की, मंगल प्रार्थनेने कार्याची सुरुवात करणे हिच आपल्या भारतीय संस्कृतीची आदर्श परंपरा आहे.

पान ४ वरून

## 'बहुरूपी' नाट्यकलावंताच्या...

'वासुदेवशास्त्री वामनशास्त्री खरे' यांच्यावरील लेखात चिंतामण कोल्हटकर वीरविडंबन या नाटकाबाबत विचार करत असताना, स्त्रीवेश घेतलेला अर्जुन राजकन्या उत्तरेला चुकीचे नृत्य शिक्षण देतो असे दिसणे योग्य नाही म्हणून रंगभूमीवर त्या नर्तकाच्या भूमिका करणाऱ्या कलावंतांनी शास्त्रीय नृत्य शिकावे असा विचार करतात आणि दीनानाथ स्वतःहून तसा अभ्यास करण्याची तयारी दाखवतात. यातून स्त्री वेशातील अर्जुन हा एक शिक्षक आहे आणि त्याने रंगभूमीवर सुद्धा चुकीचे वर्तन करणे योग्य नाही, असा विचार त्या काळातील नाटककार सुद्धा करायचे हे लक्षात येते. चिंतामण गणेश कोल्हटकर यांना स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांनी एका भेटीत तुम्हाला गौतम बुद्धाच्या चरित्रावरचे नाटक चालेल का? असा प्रश्न विचारणे आणि कोल्हटकर यांनी त्याला होकार देणे. हे लक्षात येते. राम गणेश गडकरी यांनी आपले प्रभाकर लतिका हे नाटक फर्ग्युसन कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी रँगलर परांजपे आणि त्या कॉलेजचे प्रिन्सिपल आप्पासाहेब यांच्यावर केलेल्या कोटयांमुळे निर्माण झालेल्या प्रसंगातून लिहिल्याचे वर्णनही 'बहुरूपी'मध्ये सापडते. एकंदरीत चिंतामण गणेश कोल्हटकर यांच्या 'बहुरूपी'तून एका नाट्य कलावंताचे जीवन आणि रंगमंचा संदर्भातील आयुष्य आपल्यासमोर येते.

# झाडाझडती

सत्ताकारण

सोमनाथ देशमाने

भ्र. ९४२१६३६२९१



नरेंद्र दामोदरदास मोदी यांच्यासारखं उत्तुंग नेतृत्व लाभलेला भारतीय जनता पक्ष हा भारतातला सर्वात मोठा राजकीय पक्ष. शंभरीच्या उंबरठ्यावर उभी असलेलली आणि सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रात काम करणारी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही संघटना भारतीय जनता पक्षाची मातृसंस्था. बदनाम काँग्रेस पक्षाचं खुजं नेतृत्व राहुल गांधी प्रतिस्पर्धी. तरीही, प्रचंड मेहनत घेऊनही भारतीय जनता पक्षाला अपेक्षित यश मिळालं नाही आणि स्वप्नातही न अपेक्षीलेलं यश काँग्रेस पक्षाला सहजासहजी मिळालं. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत हे आक्रित कसं काय घडलं? हा प्रश्न सामान्य जनांपासून पट्टीच्या राजकीय विश्लेषकांना पडला आहे. खरं म्हणजे जिथे कारागृहात असलेले, जामिनावर सुटलेले भयंकर कलंकित उमेदवार विकृमी मत्ताधिक्याने निवडून येतात आणि दुसऱ्या टोकाला असलेले उमेदवार चक्क पराभूत होतात, तिथे निवडणूक निकालाचे विश्लेषण ब्रह्मदेवही करु धजावणार नाहीत. तरीही आम्ही पामर वरवरचा वांझोटा प्रयत्न नित्यनेमाने करत असतो. हातात सोटा घेऊन मतदारांची झाडाझडती घ्यायची, त्यांचं प्रबोधन करायची हिंमत ना राजकीय पक्ष करतात ना राजकीय विश्लेषक करतात.

आपल्याकडे मतदारांनी दिलेला कौल शिरसावंद्य मानायचा असतो, तो कौल व्यापक राष्ट्रहितासाठी योग्य आहे की अयोग्य आहे याची शहानिशा करायची नसते. हा अलिखित दंडक मतदार जागृतीतला सर्वात मोठा अडथळा ठरत आहे. भारत, ब्रिटन आणि फ्रान्समध्ये नुकत्याच पार पडलेल्या सार्वत्रिक निवडणूक निकालांमधून याचे भयानक दुष्परिणाम सगळ्या जगाला हादरवून सोडणारे आहेत. लोकशाही व्यवस्थेतून देशाची बरबादीच घडणार असेल तर अशी लोकशाही का नांदवायची? त्यापेक्षा कट्टर राष्ट्रभक्ताची हुकूमशाही परवडली? निदान नाठाळांना तरी वठणीवर आणता येईल? मोदींनी विदेश दौरे बंद करुन जरा देशातही थांबावे, असा अनाहूत सल्ला देणारेही आम्हीच आणि मोदी किंवा मोदींचा कुणी प्रतिनिधी मतं मागायला आमच्या दारात आलाच नाही म्हणून फुगून बसणारेही आम्हीच. माझ्या जिवात जीव असेपर्यंत बाबासाहेबांची घटना कुणाला बदलू देणार नाही, सुरु असलेली आरक्षणं बंद होऊ देणार नाही असं मोदीजी ओरडून सांगत असताना त्यांच्यावर विश्वास न ठेवता दिशाभूल करण्यासाठी धादांत खोटा प्रचार करणाऱ्या राहुल गांधी यांच्यामागे वहावत जाणारेही आम्हीच! मोदीजींच्या मोफत शिधावाटप योजनेमुळे कामाला मजूर मिळत नाहीत म्हणून थयथयाट करणारेही आम्हीच आणि मोदीजींच्या स्वस्त जनऔषधी योजनेमुळे आमच्या दुकानाची पार वाट लागली म्हणून बोटं मोडत शिव्याशाप देणारेही आम्हीच. मोदींनी दिलेल्या घरात बसून मोदींनी दिलेल्या गॅस शेगडीवर मोफत मिळालेला शिधा शिजवत शिजवत महागाई फार वाढली राव म्हणत मोदींच्या नावाने शंख करणारेही आम्हीच! आम्हीच! मोदी आणि गडकरी यांच्यात काही तरी बिनसलय राव म्हणत खमंग चर्चा करणारे सख्खे भाऊ पक्के वैरी आम्हीच. आम्ही दोघं राजाराणी आणि आमचा बबड्या, आमची बबडी या कूपमंडूकवृत्तीचे आम्हीच. हक्क उपभोगणारेही आम्हीच आणि कर्तव्य टाळणारेही आम्हीच. मतदारराजाही आम्हीच! सीमापार जे घडविलं जात आहे त्याची आग आपल्यापर्यंत पोहचायला वेळ लागणार नाही; भारतभर केरोसिन झिडककर रखा हैं, बस एक तिल्ली लगाने की देर हैं। आठवतय? लोकशाहीचं आणि देशाचं भवितव्य ज्या मतदारांच्या हाती आहे त्यांची झाडाझडती घ्यायची कुणी?

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर प्रदीर्घ काळ जितक्या सरकारी योजना आणि त्यांचे लाभ तळागाळापर्यंत पोहचले असतील-नसतील त्यापेक्षा कितीतरी अधिक पटीने मोदी सरकारच्या दहा वर्षाच्या राजवटीत सरकारी योजना आणि त्यांचे लाभ वाड्यावस्त्यांपर्यंत, घराघरांपर्यंत, व्यक्तीव्यक्तींपर्यंत निरंतर पोहचवले गेले आहेत. तरीही २०१४ साली ४४ पर्यंत खाली घसरलेली काँग्रेस २०२४ साली ९९ पर्यंतवर चढली आणि २०१९ साली ३०३ वर पोहचलेला भारतीय जनता पक्ष २०२४ साली बहुमताच्याही खाली २४० पर्यंत घसरला. गेल्या दहा वर्षात विरोधी बाकांवर बसलेल्या काँग्रेसची कामगिरी दैदिप्यमान होती आणि सत्ताधारी बाकांवर बसलेल्या भारतीय जनता पक्षाची कामगिरी कमालीची निकृष्ट होती असेही नाही? अनुभव अगदी याच्या विपरित आहे. लोकशाही व्यवस्थेतला विरोधी पक्ष कसा नसावा याचं उत्तम उदाहरण म्हणजे काँग्रेस पार्टी आणि सत्ताधारी पक्ष कसा असावा याचा अनुकरणीय आदर्श घालून देणारा भारतीय जनता पक्ष. तरीही अशी उलथापालथ का झाली, याची झाडाझडती घेतलीच पाहिजे.

कुलीन घरंदाज स्त्रीच्या वर्तणुकीचं पावलापावलांवर मूल्यांकन केले जाते. अचानक आलेल्या हवेच्या झोतामुळे तिच्या डोक्यावरचा पदर जरा जरी ढळला तरी तिला कठोर शिक्षा भोगावी लागू शकते; याऊलट दारुच्या गुत्त्यातून टाळमृदंगाचे मंगलध्वनी कानी पडावेत अशी अपेक्षा कुणीही करत नाही. नव्वदीपार निघालेल्या उत्तरपत्रिकांचं मूल्यांकन करताना तपासणीस अधिक कडक होतो, हात आखडता घेतो आणि तिशीच्या आत रेंगाळणाऱ्या उत्तरपत्रिकांचं मूल्यांकन करताना तपासणीस हात मोकळा सोडत तिला पस्तीशीपार ढकलायचा प्रयत्न करत असतो. चांगल्यांकडून अधिकाधिक चांगल्याची आणि वाईटांकडून कमीत कमी वाईटाची अपेक्षा करणं हा मानवी स्वभाव आहे. संघ परिवार नेहमी अतिसावध, बचावात्मक का असतो आणि काँग्रेस परिवार मस्तवाल, बेफिकीर का वागत असतो, याचं रहस्य भारतीयांच्या उपरोक्त मानसिकतेत दडलेलं आहे. डोंगराएवढी विकास कामं उभी करत करत भारताच्या सनातन सांस्कृतिक पुनरुत्थानासाठी भारतीय जनता पक्ष आटोकाट प्रयत्न करत असला तरी काही मतदारांच्या काही अवास्तव अपेक्षा पूर्ण झाल्या नसाव्यात, त्याचा फटका बसला असावा.

गांधी हत्येनंतर महाराष्ट्रात 'बामणजाळी' घडवूनही काँग्रेस परिवार पुन्हा पुन्हा सत्तेवर येऊ शकतो, इंदिरा हत्येनंतर सिखनरसंहार घडवूनही काँग्रेस परिवार पुन्हा पुन्हा सत्तेत येऊ शकतो. अयोध्येत रामभक्त कारसेवकांवर अंधाधुंद गोळीबार करुनही मुलायम परिवार पुन्हा पुन्हा सत्तेवर येऊ शकतो. याउलट संघ परिवार स्वप्नातही असला अमंगळ विचार करु शकत नाही, तरीही डोक्यावरचा पदर ढळल्याची एखादी अफवासुध्दा भारतीय जनता पक्षाला जबरदस्त फटका देऊ शकते. २०२४ साली लोकसभा निवडणुकीत नेमकं हेच घडलं-घडविलं गेलं असावं.

संघ परिवार हे सनातन भारताचं शेवटचं आशास्थान, आश्रयस्थान आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही केवळ संघ परिवाराचीच नाही तर समस्त सनातनींची मातृसंस्था आहे आणि म्हणूनच तिची जबाबदारी कितीतरी पटीने अधिक आहे. कुटील, कारस्थानी, दीर्घानूभवी नेहरु-गांधी-काँग्रेस परिवाराशी टक्कर देत सत्तेवर येण्यासाठी भारतीय जनता पक्षाला संघ परिवाराची मदत लागते आणि संघ परिवाराला आपली राष्ट्रसेवाकार्य विना अडथळा निरंतर पार पाडता यावीत यासाठी भारतीय जनता पक्षाची सत्ता आवश्यक असते. संघ परिवारातील विविध सेवाशाखांचा झपाट्याने विस्तार होत असताना त्यांच्यातलं परस्पर सहकार्य, विश्वास, समन्वय-संवाद कमी होत चालला आहे का? त्यांच्यातलं अंतर वाढत चाललं आहे का? 'सवती मत्सर' या मानवी अवगुणाची संघ परिवारालाही लागण झाली आहे का? २०१४ नंतर आवश्यक असेल तिथे कर्मठ संघीजनसंघी तत्वांशी तडजोड करत, मुरड घालत भारतीय जनता पक्षाला सर्वासमावेशक स्वरुप देण्यासाठी जे काही प्रयत्न सुरु आहेत ते कर्मठ राष्ट्रीय स्वयंसेवक संघ परिवाराला स्विकारणे जड जात आहे का? त्यांना ते आवडलेले नाही का? या आणि अशा अन्य प्रश्नांची उत्तरं शोधून त्यावर कायमस्वरुपी उपाययोजना तातडीने अमलात आणाव्या लागतील! यासाठी संघ परिवार, विशेषतः भारतीय जनता पक्षात विविध पातळ्यांवर चिंतन, मंथन, झाडाझडती कधीच सुरु झाली असावी. (पूर्वार्ध)

पान ४ वरून

## वनमाला ठमाताई

दूर असलेल्या देवीच्या दर्शनाला जाण्यासाठी दिंडीची प्रथा सुरू झाली जी आज ही अत्यंत श्रध्देने सुरू आहे. हात कामात आणि मन भक्तीत रमायला लागलं. दारूचे व्यसन सर्व दृष्टीने वाईट आहे याची जाणीव महिलांना होऊ लागली आणि कोणत्या ही दारू बंदी संस्थेची मदत न घेता त्या परिसरामध्ये महिलांचं वसनमुक्ती होऊन त्यांच्या पुढाकाराने पुरुषांमधीलही दारूचे प्रमाण कमी झाले ज्यामुळे मुलांची होणारी आबाळ बंद झाली. वस्तीमध्येही संस्कार केंद्र सुरू होतेच परंतु हळूहळू त्यांच्या लक्षात यायला लागलं की, नवीन स्थानी संस्कार केंद्रामध्ये मुलांना चांगले वागण्याबरोबरीने काहीतरी शिकवलंही गेलं पाहिजे. परंतु स्वतःला काही लिहिता वाचता येत नव्हते. केंद्रावर कुंटेकाका आणि काकूंचा आग्रह असायचा की ठमा किमान अक्षर ओळख तरी झाली पाहिजे तू शिकायला सुरुवात कर. परंतु आता या वयात शिकून काय फायदा असे त्यांना वाटत होते. परंतु वस्तीचा व आपल्या समाजाचा कायापालट करायचा असेल तर किमान आपल्याला शिकले पाहिजे. ही जाणीव आकार घेत आहे. हे दिसताच डॉक्टरांनी एक रामबाण उपाय शोधून काढला. डॉक्टर हे खऱ्या अर्थाने वैद्यकीय सेवेपेक्षा सामाजिक डॉक्टर अधिक होते आणि त्यामुळे औषधाचा डोस बरा होण्यासाठी कशा मार्फत द्यायला पाहिजे, हे त्यांनी ओळखले. केंद्रात मुलांसाठी भाकरी चपाती करण्याचे मासिक मानधन ४५ रुपये होते. कुंटे काकांनी एके दिवशी फर्मान काढले. तू जर सही केली तरच तुला मासिक मानधन मिळेल. इथून प्रवास सुरू झाला तो शिकण्याचा परंतु या वयात पाटी पेन्सिल वर गिरवायला हात काय तयार होत नव्हते.

शिकण्याची निर्माण झालेली जिद्द काकूंनी ओळखली आणि घरगुती उपाय शोधून काढला मग थापलेले पीठ हीच पाटी झाली आणि त्या पिठावर अक्षर गिरवत लिखाणाचा आणि विद्येचा श्री गणेशा सुरू झाला. आणि काकांना एक महिना पगार रोखून धरता आला नाही कारण पुढील महिन्याचे मानधन हे ठमाताईने स्वाक्षरी करून स्वाभिमानाने मिळवले. आपल्या आयुष्यात एखाद्याला गुरु म्हणून स्थान दिले की कळत नकळत शिष्य या नात्याने आपणाला गुरुदक्षिणाही द्यावी लागते.. कारण गुरु ऋण ही ठेवू नये असे म्हणतात. ज्या वनवासी समाजासाठी पुण्यातील आपली वैद्यकीय प्रॅक्टिस सोडून कर्जतसारख्या अतिदुर्गम भागात डॉक्टर कुंटे आपल्या पत्नीसोबत आले त्यावेळेस त्यांचा हेतू उदात्तच होता. भोळ्या भाबड्या समाजाची जमेल तेवढी सेवा करावी. परंतु समाज विघटन करणाऱ्या अनेक लोकांनी सज्जनशक्तीला आणि त्यातल्या त्यात संघाच्या विविध व्यक्तींना त्रास देवून समाजपयोगी प्रकल्प बंद करण्यासाठी वेळप्रसंगी दानवांनाही लाजवेल अशा गोष्टी केलेल्या आहेत.

अशाच एका काळोख्या रात्री अपघाताने अगदी शेवटची घटका मोजणाऱ्या एका रुग्णाला आश्रमातील डॉक्टरांच्या खोलीत काहीजण घेऊन आले. परिस्थिती अत्यंत नाजूक असल्यामुळे वेळ न घालवता डॉक्टरांनी त्यांना कर्जतला किंवा मोठ्या शहरात घेऊन जाण्याचा सल्ला दिला कारण त्या क्षणी त्या माणसाला वाचवण्याची कोणतीही सुविधा डॉक्टरांकडे नव्हती परंतु आलेल्या लोकांनी इथेच उपचार करावा असा आग्रह धरला. डॉक्टरांनी पुन्हा एकदा सर्व परिस्थिती सांगून केवळ मी फक्त इंजेक्शन देऊ शकतो. एवढेच माझ्या हातात आहे. ह्यात वेळ फुकट जात आहे हे लक्षात घेऊन डॉक्टरांनी इंजेक्शन देऊन झाल्यानंतर त्यांना परत विनंती केली की तुम्ही यांना चांगल्या ठिकाणी घेऊन जा.

होय नाही करण्यात बराच वेळ गेल्यानंतर ते निघाले दुर्दैवाने वाटेतच त्याचा मृत्यू झाला. डॉक्टरांनीच रुग्णाला मारलं म्हणून त्या वस्तीतली लोक डॉक्टरांना मारण्यासाठी जमा झाले. रात्रीची वेळ आणि डोळ्यात सुडाने पेटून उठलेला जमाव. इरादा स्पष्ट असलेल्या त्या जमावा पुढे डॉक्टरांनी आणि काकूनी येईल त्या परिस्थितीला सामोरे जाण्याचे ठरवले. परंतु त्याच वेळेस ठमाताईंनी पुढाकार घेऊन वस्तीगृहातील मुलांना गावातील अन्य लोकासोबत घेवून त्या संतप्त जमावासमोर ठामपणे उभ्या राहिल्या. डॉक्टरांच्या बाजूने बचावाची वकिली करत त्या जमावाला डॉक्टरांना व केंद्राला कोणतीही दुखापत न करता परत जायला भाग पाडले. दुसऱ्या दिवशी पुन्हा त्या वस्तीत जावून त्यातील काही लोकांना स्वतः सोबत आणून डॉक्टरांची माफी मागायला लावली. त्यामुळे साक्षर होण्याच्या मार्गावर सुरू झालेला हा श्री गणेशा केवळ त्यांच्या साक्षर होण्यापुरता मर्यादित राहिला नाही तर त्या परिसरामध्ये अनेक लोकांना सर्व दृष्टीने साक्षर आणि सुसंस्कारित करून गेला. आता ठमाताईने सुचवावे आणि वाडी-वस्तीने ते अंमलात आणावे हे ही इतक्या सहजतेने होवू लागले कारण ठमाताईंच्या सांगण्यामध्ये व करण्यामध्ये कोण्या मोठ्या अधिकाराचा भाव नसायचा. ठमाताईंची कार्यकर्ता जोडण्याची कोणते ही कार्य करून घेण्याची सर्वात मोठी पुंजी म्हणजे निरागसता!

समाजाच्या भल्यासाठी तळमळीने, आत्मीयतेने, विद्ववतेचा कोणता ही आव न आणता सांगत राहणं ते ही अत्यंत मृदू भाषेत. सोबत कायमच वनवासी मानबिंदू असलेला पेहराव व बोलीभाषा जणू डोंगरकड्यातून निर्मळ वाहणाऱ्या झऱ्याप्रमाणे त्यांचे अस्तित्व लोकांना जाणवत गेले.कल्याण आश्रमाच्या विविध जबाबदाऱ्या त्यांच्यावर येवून पडू लागल्या. त्यातून संपर्क, प्रवास क्षेत्रात वाढ झाली. नवीन जगाची ओळख सुरू झाली आणि जांभिवली व गोर कामत येथील त्यांचे घर हे आदिवासी, वनवासी समाजाच्या परिवर्तनाचे एक केंद्रबिंदू झालं. कार्यकर्ता नात्याने विविध स्थानी बैठका कार्यक्रमामध्ये विषय मांडण्याची तारेवरची कसरत सुरू झाली. पुन्हा एकदा कुंटे काकूंनी पुढाकार घेऊन विषय मांडणीला शास्त्रोक्त पद्धतीच्या वक्तृत्व, भाषण संवादाची जोड लावली आणि मग फड गाजविणाऱ्या वक्ता म्हणून ही त्या सर्व दूर परिचित झाल्या. याची सुरुवात नातू फाउंडेशनच्या एका कार्यक्रमात ज्यामध्ये स्वतः श्रीमती नातू या उपस्थित असताना कुंटे काकूंनी त्यांच्याकडून स्वागत परिचयाचं भाषण करून घेतलं प्रथम त्यांना लिहून दिलं आणि बाजूला राहून त्यांना चुकल तर मदतीला उभ्या राहिल्या.

पहाडी बुलंद आवाजात केलेल्या प्रयत्नाला सर्वांनी दाद दिली. पहिल्या प्रयत्नातील हात पाय थरथरने केवळ ठमाताईंच्या व काकूंच्याच लक्षात आलं. नंतर प्रमुख कार्यकर्त्यांनी ही ठमाताईंच्या भाषणाच्या प्रगतीमध्ये आपले योगदान देण्यास सुरवात केली त्यात बाळासाहेब दीक्षित यांनी आवर्जून ठमाताईंना सांगितलं. भाषण करताना आपल्यासमोर एकही व्यक्ती नाही किंवा हजारो व्यक्तींच्या समोर आपण बोलतो आहोत अशा अविर्भावात भाषण केले पाहिजे अशा अनेक टिप्स लक्षात घेत ठमाताई हळूहळू बैठकीमध्ये विषय मांडणे, बैठकीचे वृत्त कथन करणे, अध्यक्ष म्हणून बैठक चालवणं अशा कामात तरबेज झाल्या आणि मग पुण्यामध्ये एका क्षेत्र स्तरावरच्या कार्यकर्ता प्रशिक्षणामध्ये सदाशिव देवधरांनी त्यांना त्या प्रशिक्षणाचा समारोप करण्यास सांगितला आणि त्यांच्याकडून आवश्यक ती तयारी करून घेऊन जवळजवळ ३०-४० मिनिटाचा कार्यकर्ता प्रशिक्षणाचा समारोप केला. त्यानंतर एक उत्कृष्ट वक्ता म्हणूनही ठमाताईंना अनेक स्थानी बोलवले जावू लागले. त्यात वनवासी, एकूण समाज, महिलांवर होणारे अन्याय अत्याचार याबाबतीत ठमाताईंनी स्वतःचा अभ्यास विकसित करत अनेकांना विचारशिल बनवले. (क्रमशः)

# जवळीकीची विश्वासार्हता

सकारात्मकतेचे तत्वज्ञान २३०

सकारात्मकतेचे तत्वज्ञान
डॉ. नितीन ह. देशपांडे
deshapandenh@gmail.com



एखाद्या नात्याचे कल्पनाचित्र नजरेसमोर आणून बघा- जेथे परस्परविश्वास झुळझुळू वाहतोय, संवाद एखाद्या मंद झुळकीसारखा कानी गुंजतोय, जोडीमधील दोघांनाही मुक्त, भरभराटीचे आणि आदरयुक्त वागणुकीचे अनुभव भेटताहेत, त्यांच्या आसपास विहरताहेत. त्या जगातील जवळीक सुखद आणि सुरक्षित आहे, भावनिक सुरक्षा सभोवती जाणवतेय, परस्परांबद्दल आदर आहे आणि शाश्वत प्रेमाच्या, व्यक्तिगत वाढीच्या संधी जागोजागी उपलब्ध आहेत. नुसत्या कल्पनेनेही किती सुखद वाटते. आयुष्याची नाव आपण कशी वल्हवतो हे जाणून घेण्यासाठी आपण जवळीकीच्या थेटभेटींमधून कसे सखोल परिणाम अनुभवतो हे महत्वाचं असतं. जवळीक कशी विकसत जाते हे एकदा कळले की नव्या नात्यांना आपण बहर आणू शकतो.

नात्यांचा भूतकाळ म्हणतो, माझ्याकडून काही शिका. नात्यांचा वर्तमान काळ म्हणतो- माझ्याबरोबर राहा आणि नात्यांचा भविष्यकाळ म्हणतो, माझ्याकडून स्फूर्ती घ्या. जवळीक कोणाशी आणि किती ठेवायची याचा निवाडा आपण अवश्य करू शकतो. पण तिच्या बऱ्यावाईट परिणामांपासून सुटका मात्र नसते. जवळीकीची संरचना सोपी नसली तरीही सवयीने ती जमायला लागते. आकर्षण, मैत्री, नातं या पायवाटांनी चालता-चालता कधीतरी घट्ट जवळीक कधी जुळून येते, कळतही नाही.

जॉन बॉवेलबी आणि मेरी आईन्सवर्थ बालकांमधील मैत्रीचे साचे तपासत असताना १९७८ साली त्यांना बालवयातील जवळीक सुरक्षित आणि असुरक्षित अशा संरचनांची असते याचा शोध लागला. याचेच त्यांनी पुढे सिद्धांतात रूपांतर केले. निरामय, संयमित, समतुल्य आणि विश्वासार्ह नाते असेल तर ती जवळीक सुरक्षित मानता येते असे हझन आणि शेवर यांचे १९८७ सालचे संशोधन प्रतिपादन करते. मानवामधील एकुणातच सुरक्षेची भावना, तिची वैश्विक गरज, तिला समजून घेणे जितके महत्वाचे तितकेच बळकट, खंबीर, दीर्घकालीन नाते जुळवून आणण्यासाठी विश्वासाची पायाभरणी महत्वाची मानली जाते.

**जवळिकीशी गाठभेट घडवून आणणाऱ्या पाच निजखूणा-**

जवळीक घट्ट असेल तर नाते आपोआप निरामय होत जाते, मग ते कौटुंबिक असो वा व्यावसायिक असो. या निर्देशांमुळे स्वतःशी आणि इतरांशी कणखर, बळकट नात्यांची वीण कशी घालायची याचे आकलन होते.

**(१) सख्य आणि स्वातंत्र्य यांच्यातील सीमारेषा-**

भावनिक सान्निध्य माणसाला स्वायत्तताही बहाल करते. आपल्या जोडीदाराला अवकाश देताना त्यांना खळखळ वाटत नाही. यामुळे दुरावा वाढेल, नाते तुटेल असे भय त्यांना वाटत नाही. अंतर वाढले तरी शक्य असेल तेव्हा आणि आवश्यक असेल तेव्हा त्यांना परस्परावलंबनाचा आधार घेता येतो.

**उदाहरणार्थ-** अगस्त्य सर्वांशी घट्ट जवळीक विकसित करण्यासाठी प्रसिद्ध आहे. विशेषतः पत्नी- विशाखा वर त्याचा भरोसा आहे. तिच्याशी बोलताना मनमोकळेपणाने आपले विचार/भावना तो मांडतो आणि तिलाही व्यक्तिगत अवकाश, स्वतःचा वेळ (छंद जोपासण्यासाठी) मिळावा याचे कटाक्षाने पालन करतो. म्हणूनच एका व्यवसायात असूनही त्यांना स्पर्धा करावी असे वाटत नाही. नातं भक्कम आणि सबळ असावं यासाठी ते दुतर्फा प्रयत्नशील असतात. हा तोल निरामय ठेवत ते परस्परांचा सहवास उपभोगत असतात. एकमेकांच्या गरजा न सांगताही त्यांना जाणवत असतात.

**(२) निरामय सीमाभिंती आणि सुसंवाद-**

माणसांची सलगी विकसित झाली की परस्परांमधील सीमाभिंतींचा आपोआप आदर राखला जातो. कॉलिन्स आणि फीनी यांनी २००४ साली असे प्रतिपादन केले की खुला संवाद, आडपडदा न राखता दिलखुलास चर्चा अधिक प्रभावीपणे मांडता आली तर वितंडवादाची वेळच येत नाही आणि वादविवाद झालाच तर शांतपणे उत्तरे शोधता येतात. या प्रक्रियेत विधायक नातेबंध संभवतात आणि ते प्रदीर्घ काळ टिकतात. समोरच्याने लक्ष्मणरेखा आखली तर प्रतिक्रिया न देता, काहीही व्यक्तिगत न घेता किंवा नात्यांमधून काढता पाय न घेता जवळीक जपतात.

**उदाहरणार्थ-** श्यामने आपले विचार समोरच्याला स्पष्टपणे सांगितले आणि त्याचेही म्हणणे शांतपणे ऐकून घेतले. त्यामुळे जेव्हा श्याम अडचणीत आला तेव्हा मित्राने आपल्या खिडक्या बंद करून न घेता किंवा नात्यातून काढता पाय न घेता नातं महत्वाचं मानलं आणि ते जीवापाड जपलं. एकमेकांच्या अडचणीच्या प्रसंगी अशी मंडळी हात सोडत नाहीत. कुठलेही झाड सशक्त होते ते केवळ त्याची निगा घेतली जाते त्यामुळेच...मग नाते कोणतेही असो,त्याची काळजी वाहणारी मने जर त्या नात्यासाठी वेळ देऊ शकत नसतील तर? नुसत्या शुभेच्छा आणि इच्छांनी नाती सशक्ततेने निभावली जाऊच शकत नाहीत. डोळे पाणावले असताना सच्चा मित्र जेव्हा आपल्या पापणीवर आलेले अश्रू त्याच्या बोटांनी पुसत म्हणतो मी आहे ना सोबत तू कशाला काळजी करतो? या दोन शब्दांची किमया काही औरच असते.

**(३) आत्मविश्वास आणि स्व-मूल्य -**

बार्थोलोमेव आणि होरोवित्झ यांचे १९९१ चे संशोधन या गोष्टीची पुष्टी करते की स्वतःचे मोल जाणणाऱ्या व्यक्ती आत्मविश्वासाने परिस्थिती हाताळू शकतात. आपल्या क्षमतांवर त्यांचा विश्वास असतो आणि ते आरोग्यपूर्ण नाती विकसित करू शकतात. अशा व्यक्तींमधील सकारात्मकता आपोआप इतरांना त्यांच्याकडे आकर्षित करून घेत असते.

**उदाहरणार्थ-** सारा आणि कार्लोस आपापल्या वाटेने जीवनहेतू साध्य करण्याचा प्रयत्न करीत असतात. एकमेकांच्या यशाचे त्यांना भय वाटत नाही किंवा समोरची व्यक्ती त्यांना विनाकारण धमकावू शकत नाही. शक्य असेल तिथे उलट ते एकमेकांना मदत करतात आणि यशाचे क्षण एकत्र साजरे करतात.

**(४) भावनिक नियंत्रण -**

मिकूलीन्सर आणि शेवर २००७ साली भावनिक नियमनाचा अभ्यास करीत असताना त्यांना असे आढळले की घरोबा असेल तर भावनांवर नियंत्रण मिळविणे सहज संभवते. संवेदनांची कितीही मोठी व्याप्ती असली तरी काही माणसे तोल न ढळू देता त्या सहज हाताळू शकतात.बदलत्या परिस्थितीलाही अशी माणसे शांतपणे सामोरे जाऊ शकतात. ताण आल्यावर त्यावर कशी फुंकर घालायची, याचे त्यांना भान असते. अति तीव्र भावना आणि पराकोटीचे ताण यामध्ये विचारी वर्तणुकीच्या मदतीने ते पूल बांधू शकतात आणि पार जाऊ शकतात.

**उदाहरणार्थ-** जेव्हा सुधीरचे कामामध्ये लक्ष लागत नाही, अतिविचाराने त्याचे डोके दुखायला लागते तेव्हा तो या परिस्थितीशी जुळवून घेण्यासाठी एकतर सरळ रमेश या मित्राशी गप्पा मारत बसतो किंवा व्यायामशाळेत जाऊन शरीराला दमवतो. कोठलेही विघातक कृत्य करण्यापेक्षा, स्वतःचे दरवाजे बंद करून घेण्यापेक्षा त्याला हा मार्ग सुलभ वाटतो. कालांतराने डोके थाऱ्यावर आले की तो हाती असलेल्या कामाला लागतो.

**५) विश्वसनीयता आणि निष्ठा -**

सिम्प्सन आणि ऱ्होल्स यांनीही १९९४ साली संशोधनाद्वारे असे मत व्यक्त केले की सख्य, जिवलग मैत्र असलेल्या व्यक्ती अधिक विश्वासार्ह असतात. त्यांचे समर्पण, निष्ठा वादातीत असतात. तेथे शंकेला वाव नसतो. गरजेच्या वेळी त्यांच्यावर निःसंकोच भरवसा ठेवता येतो आणि विसंबून राहता येते. हा नात्यांमधील ठामपणा त्यांना निष्ठावान बनवितो. तेथे फसविले जाण्याची शक्यता नसते.

**उदाहरणार्थ-** दिव्या नेहेमी बोलते तसेच करते. तिच्या मित्रांना आणि कुटुंबियांना तिच्यावर डोळे मिटून विश्वास ठेवता येतो. दिव्या प्रामाणिक आहे, तिला स्वतःच्या मर्यादा ठाऊक आहेत. नात्यांमधील विश्वासाची ती जीवापाड जपणूक करते.

**जवळीकीचे फायदे-**

१) सलगी सुरक्षित असली की माणसे अधिक स्थिर बनतात आणि त्यांचे सुखद बनते. देवाणघेवाणीमध्ये अशा व्यक्ती समसमान आणि समृद्ध असतात. एकमेकांना आधार आणि प्रेम देतात. त्यांचे संभाषण खुले, परिणामकारक असते, जोडीदारावर प्रगाढ विश्वास असतो आणि वादविवाद समजुतीने सोडविण्याकडे त्यांचा कल असतो. अशांशी जुळले की जवळीक अर्थपूर्ण आणि सखोल होते.

**२) संवेदनांची देखभाल-** जाणिवा ताब्यात ठेवता आल्या की आल्या प्रसंगाला सामोरे जाणे तितकेसे कठीण उरत नाही. मिकूलीन्सर आणि शेवर यांचे संशोधन या गोष्टीची पूर्ती करते की नात्यांमध्ये सुरक्षित वाटले की जवळीक वाढते. नुक्तेच जन्मलेले बाळ आईच्या घट्ट कुशीत जेव्हा निर्धास्त झोपते, तेव्हा ती जवळीक वेगळीच आणि सुखद असते. मी आहे नं हे आई आपल्या स्वरातून, स्पर्शातून बाळाला सुचवीत असते आणि बाळ तिच्यावर विसंबून झोपी जाते. बाळ रडले तरी आईच्या सान्निध्यात लगेच शांत होते. घट्ट मिठीतून भीतीवर जशी मात करता येते तसेच तणावांना दूर राखता येते. संवेदना काबूत असल्या की आयुष्यातील अपरिहार्य पडझड सांभाळता येते आणि आव्हाने सहज पेलता येतात.

**३) स्व-प्रतिष्ठेची जपणूक -**

आपले मूल्य एकदा निर्धारित करता आले की प्रवाह सलग आणि विनाव्यत्यय वाहायला लागतात. स्वतः कडे बघण्याचा दृष्टिकोन सकारात्मक करता आला की क्षमतांवरचा विश्वास आपोआप वाढतो. मग जीवनहेतूंचा पाठलाग अवघड वाटत नाही. अपयशाच्या भीतीपासून सुटका झाली की जोखमी घेणे शक्य होते. बार्थोलोमेव आणि होरोवित्झ आपल्या शोधनिबंधात हे सोदाहरण सिद्ध करतात.

**४) सकारात्मक मानसिक आरोग्य-**

चिंताग्रस्तता आणि खिन्नमनस्कता यावर कारेमान आणि विंगेर्होइट्स यांनी २०१२ झाली प्रदीर्घ संशोधन केले आणि असं मत मांडलं की भावनिक आधार मिळाला, नाती स्थिर झाली की माणसं डोळे मिटून विश्वास ठेवायाला सुरुवात करतात. आणि मग या व्याधी हळूहळू काढता पाय घेतात. मानसशास्त्रीय दृष्ट्या माणसे कणखर होतात आणि रोगजन्य विकृतींवर मात करू शकतात. ताण निवळतात आणि मन शांत होते.

**५) वादांवर प्रभावी तोडगे-**

अपरिहार्य होणाऱ्या छोट्या-मोठ्या लढायांमध्ये माणसे विधायक दृष्टिकोन ठेवून समस्या-निवारणाचे मार्ग निवडतात हे गॉट्ट्मन यांनी १९९९ साली सिद्ध केले. हाताळणीमध्ये समतोल विचारसरणी, समस्या सोडविताना इतरांचा सन्मान जपणे आणि प्रभावी, दीर्घकालीन तोडगे काढण्यावर भर देणे अशी माणसांची मनोधारणा येथे आढळते.

**६) सामाजिक कौशल्ये-**

सुरक्षा ज्यांना जाणवते अशी मंडळी निर्धास्तपणे समाजात मिसळतात आणि अनुकंपेचे दर्शन घडवितात असं श्रोफे यांनी २००५ साली सिद्ध केलं. त्यांच्यामते अशा व्यक्ती इतरांच्या भावना पटकन समजून घेऊ शकतात आणि त्यांना साजेसा प्रतिसादही देऊ शकतात. त्यामुळे संबंध सुधारतात आणि माणसे आणखी जवळ येतात.

**७) कार्यस्थळावरील व्यवहारांमध्ये यशप्राप्ती-**

जवळीक साधण्याची हातोटी ज्यांना प्राप्त आहे अशा व्यक्ती कार्यस्थळावर मिळून मिसळून जातात. त्यामुळे त्यांच्या कामाची गुणवत्ता अधिक आढळते, संघभावनेत त्यांचा मोलाचा वाटा असतो, आणि कामाच्या बाबतीत त्यांची वृत्ती समाधानी असते.

**८) प्रभावी पालकत्व-**

सकारात्मक पालकत्व एक प्रकारची सुरक्षा बहाल करते. आर्थिक, सामाजिक, कौटुंबिक. त्यामध्ये वाढ वेगाने संभवते आणि अशा बालकांचा समाजातील स्वीकार लक्षणीय असतो. या पैलूवर १९७८ पासून जगभर संशोधन सुरु आहे. पालक संवेदनशील असल्याने मुलांच्या गरजांकडे ते दक्षतेने बघतात आणि म्हणून मुलांची सर्वांगीण वाढ होत जाते. या विविध लाभांपासून जवळीकीचे आपल्या आयुष्यावरील महत्वपूर्ण प्रभाव दिसून येतात, परिणामस्वरूपी सर्वंकष व्यक्तिगत तसेच व्यावसायिक यश संभवते.

**सहा समस्या-**

१) बाल्यावस्थेतील अनुत्तरित आघात
२) नकारार्थी नातेसंबंध
३) नाकारले जाण्याची अनाकलनीय भीती
४) सकारात्मक आदर्शांचा अभाव
५) मानसिक स्वास्थ्याचे त्रास
६) कधी कधी ताणतणावांचा सामना

यावर उपाययोजना आहेत, त्यांच्याबद्दल आणि इतरही मौलिक संशोधनाचा आढावा पुढील लेखात!

---

# श्रावणी सोमवारची शिवामूठ जवस



आजीचा बटवा
नारायण कारंजकर
भ्र. ९४२३७५८४०१



असली आलस्य भागारोगी म्हणजे जवसामुळे आपल्या शरीरातील आळस दूर होतो, असे म्हणतात. चौथ्या श्रावणी सोमवारी श्री महादेवाच्या पिंडीवर जवसाची शिवामूठ अर्पण करतात. तांदूळ, तीळ, मुगानंतर आज जवसाचे आयुर्वेदातील महत्त्व स्पष्ट करीत आहे. केवळ जवसाची चटणी खाणे किंवा माहित असणे एवढेच पुरेसे नाही. जवसाचे माहात्म्य फार मोठे आहे. जवसापासून तेल निघते म्हणून जवसाचा गळिताचे धान्य म्हणून तेलबिया म्हणून उल्लेख केला जातो. जवसाला मराठीत जवस, आळशी, हिंदीत आलसी, तिसी, गुजरातीत अलसी, कन्नडमध्ये अनसी, आलसी तर संस्कृतमध्ये जवस, अलसी, अनसिका, हेमवती, मंदगंधा, मलीना, तैलोत्तमा, तीलपुष्पी आदि नावानी ओळखले जाते.

जवसाचे मधुर, स्निग्ध, कडू, बलकर, पाककाळी, तिखट, गुरूवातकर, कफकारक, उष्ण, वृष्टी आदि गुणधर्म आहेत. जवस शुक्ररोग, रक्तदोष, पित्तनाशक आहे. जवस वात, कफ यावर हितकर आहे. जवसात २८.८ कार्बोज, २०.३ प्रोटीन, फॅट ३१.१ टक्के वजन कॅलरी असतात. जवसामध्ये जवसामध्ये प्रोटीन, खनिजे, फायबर असे उपयुक्त घटक असतात. जवसामध्ये ओमेगा ३ या सारखे फॅटी ॲसिडचे प्रमाण आढळते. निरोगी आयुष्यासाठी जवस फायदेशीर असतात. जवसाचा दररोज आहारात समावेश करावा. आरोग्याच्या समस्या दूर होतात. जवस खा, बारीक व्हा, वजन कमी करा, असे म्हटले जाते. जवसामुळे पचनक्रिया सुधारते. भूक नियंत्रित राहते. जवस कच्चे खाण्याऐवजी भाजून खावे.

**जवसाचे औषधी उपयोगः-**

झोप येत नसल्यास जवसाचे व एरंड बियांचे तेल समभानग एकत्र काशाच्या पात्रात काशाच्याच पात्राने खलून त्याने तळपाय चोळावे. झोप लवकर येते. बद म्हणजे गळू पिकण्यासाठी जवसाच्या पिठात दुध हळदीची पूड घालावी. किंवा पाण्यात जवसाचे पीठ, हळद घालून चांगले शिजवावे. हे मिश्रण सोसवेल इतके गरम असताना गाठीवर बसवावे. याप्रमाणे ५-६ वेळा प्रत्येक वेळी गरम करून बसवावे. हे पोटीस बांधल्यावर त्यावर विड्याचे पान बांधावे. गळू लवकर पिकून फुटतो. अग्निदग्ध व्रणावर जवसाचे तेल व चुन्याची निवळी एकत्र करून लावावे. मूत्रदाहावर जवसाचा फांट करून प्यावा. खोकल्यावर जवसाचा फांट देतात. (फांट म्हणजे जवसाच्या पिठात पाणी घालून चांगले कढवावे व गाळून घेणे.) जवसाचे तेल फार उष्ण असते. त्यामुळे ते जपूनच वावरावे.

ऱ्हद्य विकारात जवस लाभदायक ठरतात. कर्करोग, रक्तदाब जवसामुळे कमी होतो. मधूमेह, ॲनिमिया यामध्ये जवस गुणकारी आहे. सांधेदुखी, गुडघेदुखी, वजन कमी करण्यासाठी जवस गुणकारी आहेत. जवसाचा अतिवापर टाळावा. कफज्वरात जवसाच्या पिठाचे पोटीस करून छाती शेकावी. कफ पातळ होऊन सुटतो. कफ पडल्याने बरे वाटते. जवसाचे क्षुप २ ते ३ फूट उंचीचे असते. पाने छोटी व धुरकट वर्णाची असतात. जवसाच्या शेंगा छोटया व लाल रंगाच्या असतात. बिया लहान व टणक असतात.

जवसाची पाने क्षार व बीज म्हणजे जवस औषधासाठी वापरतात. सांधेदुखीवर, सांधे जड झाल्यावर मीठ, हळद घालून केलेले जवसाचे पोटीस बांधतात. मधुमेहात जवसाचा काढा देतात. पोटात जंत झाल्यावर जवसाचे तेल लावतात. वजन वाढण्यासाठी जवसाच्या पानांची भाजी खावी. त्वचा, केसाच्या आजारावर जवस गुणकारी आहे. जवाचे लाडू गुणकारी आहेत.


**काढा तया करण्याची पध्दतः-**

एक पट औषधात १६ पट पाणी घालून हे मिश्रण अष्टमांश होईपर्यत आठवावे. नंतर गाळून घ्यावे. तयार झालेला द्रव पदार्थ म्हणजे काढा तो ५ ते ६ तास टिकतो. आपल्या स्वयंपाक घरात कितीतरी बहुगुणी वनौषधी असतात. त्यांचे गुणधर्म व औषधी उपयोग जाणून घेऊन वेळप्रसंगी औषधी उपचार किरकोळ आजारांवर केले पाहिजेत.

स्वयंपाक घर, आपली परसबाग, घराच्या परिसरातील, शेतातील, पडिक जमीनीतील, माळरानावरील, डोंगरदर्यातील किती तरी वनौषधी वापरल्या जातील. काल्या वनस्पती लवकर गुण देतात. वाळलेल्या वनस्पती लवकर गुण देत नाहीत. त्यामुळे आपल्या घराच्या गच्चीवर, घराजवळील जागेत अशा गुणकारी औषधी वनस्पती लावल्या पाहिजेत. त्या जोपासल्या पाहिजेत. तसेच त्यांचा औषधी उपयोगही केला पाहिजे. अतिपरिचयात अवज्ञा असल्याने आपण अशा वनौषधी अधिकच दुर्लक्षित करतो. पुढे या सदरात आजीच्या बटव्यात काय काय असावे? स्वयंपाक घरातील औषधी वनस्पती, शाळेच्या आवारात, शेतात, शेताच्या बांधावर, रस्त्याच्या कडेला कोणत्या वनस्पती लावाव्यात, तसेच स्मृतिवने, उद्याने यात कोणत्या वनस्पती लावाव्यातया विषयी माहिती, लेखांक प्रसिध्द होतील. ते फक्त वाचून बाजूल न ठेवता, त्याची कात्रणे संग्रही ठेवावीत. माता भगिनींनी भजन झाल्यावर अशा उपयुक्त वनौषधींची चर्चा करावी. ज्ञान आदान- प्रदान करावे. वाढदिवसानिमीत्त सत्कार समारंभानिमत्त उपयुक्त वनस्पतींची रोप दिली व ती सत्कारमूर्तींनी योग्यरित्या जगविली तर आपणा सर्वांच्या जगण्यासाठी ते मोलाचे ठरेल.

---

# सागरकिनारे



राखी पौर्णिमेला सागराची पूजा करून कोळी बांधव समुद्राला नारळ अर्पण करतात. ज्यावेळी कोकणात नारळी पौर्णिमा साजरी केली जाते त्या दिवशी रक्षाबंधनाचा सण असतो. आकाशाच्या मंडपाखाली सागरलाटांचे नर्तन सुरू असते. असं म्हणतात, सागर आपली मर्यादा कधीही ओलांडत नाही; पण त्सुनामीच्या रूपाने त्याने आपली मर्यादा ओलांडली. तो गावात शिरला. घराघरांत शिरला. माणसाच्या जगण्यात शिरला अन् अनेकांच्या संसाराची, देहाची लक्तरं करून ती त्यानं इतस्ततः भिरकावली. माणसाच्या अनिर्बंध वागण्यावर, क्षुब्ध झालेल्या सागराने दिलेले हे उत्तर आहे.

एरवी तो आपल्याच मस्तीत असतो; आपल्याच नादात असतो. भारताच्या दक्षिण किनाऱ्यावर मात्र तो भारत मातेच्या चरणी लीन होतो. भारत मातेचे चरण प्रक्षाळतो. युगानुयुगे आपले अस्तित्व अबाधित राखून असलेल्या या सागराने हाती वरमाला घेऊन उभ्या असलेल्या कन्याकुमारीचे निरागस शालीन रूप पाहिले. विवेकानंदांच्या साधनेचा तो साक्षीदार आहे. सागर आपल्या आदिदैवतांच्या चरित्रात महत्त्वाचे स्थान मिळवून आहे. रावणाने सीतेला लंकेत नेऊन ठेवले. कपिकुलभूषण असलेल्या हनुमंताने सागर उल्लंघून लंकेत जाऊन सीतामाईचा शोध घेतला. सेतूबंधन, राम-रावण युद्ध आणि सीतेची मुक्तता हे सगळं घडत असताना विशाल सागर तटस्थ वृत्तीने सारे पाहात होता. कोटीच्या कोटी उड्डाणे करून सागर ओलांडणाऱ्या हनुमंताला सागर अडवू शकला नाही. सेतूबंधन थांबवू शकला नाही. रामचरित्रात महत्त्वाची भूमिका निभावणारा सागर श्रीकृष्णाच्या चरित्रातही अबाधित आहे. श्रीकृष्णाने द्वारका उभी केली ती सागरतीरी. श्रीकृष्णाने त्याची तीच सोन्याची द्वारका सागरात बुडवली. आजही त्या द्वारकेचे अवशेष सागरतळाशी आढळतात. सागर अतिशय उदार आहे. नद्या-ओढे-नाल्याचे घाण जीवन संगतीला घेऊन शेवटी सागराच्या कुशीत विसावतात. नद्यांकाठी मानवी जीवनाचे मळे फुलतात. नव्या संस्कृती जन्माला येतात. प्राचीन अवशेष जतन केले जातात. नद्या तिच्या काठच्या संस्कृतीचे भरण पोषण करतात. कुठली नदी कुठल्या संस्कृतीचा वारसा घेऊन आली. तिच्या तीरी कुठली संस्कृती नांदत होती, याच्याशी सागराला काही देणे-घेणे नाही. नदी त्याच्यात सामावली की ती त्याची होते. तिच्या भूतकाळाशी त्याचा काही संबंधच नसतो. तो तिला आपल्यासारखे करतो. सागरात प्रवेश करीपर्यंत मधुर असलेले नदीचे पाणी सागरात शिरताच सागराच्या पाण्यासारखे खारट होते कदाचित; सागरात शिरताना ज्या डोंगरात त्या नदीने जन्म घेतला त्या डोंगराची आठवण येऊन नदीला अश्रू आवरत नसतील. तिच्या डोळ्यातल्या अश्रूंनी सागराचं पाणी खारट होत असेल. अशा असंख्य नद्या सागरात स्वतःला समर्पित करतात, अशा असंख्य नद्यांचे अश्रू सागरात मिळाल्यावर सागर खारट होणारच नं. सागर त्यांचे अश्रू पिऊन अन् खारट होत असावा.

सागराचं अस्तित्व दुरूनही आपल्याला जाणवते. त्याची घनगंभीर गाज दूरवर ऐकायला जाते. अहोरात्र लाटांचा खेळ सुरू असतो; त्या कधीच थकत नाहीत. धावत येऊन किनाऱ्यावर स्वतःला लोटून किनाऱ्याच्या वाळूत विरून जातात. लाटांचा खेळ पाहत काळ वेगाने पुढे सरकत असतो. लाटांचा खेळ सुरूच असतो. एक लाट किनाऱ्यावर येऊन विरत नाही तर तिच्यापेक्षा मोठी लाट धावत येते अन् किनाऱ्यावर आदळते. हिंद महासागराच्या किनाऱ्यावर पांढरी आणि काळी वाळू आढळते. गंगेचा जलप्रवाह आणि यमुनेचा काळा प्रवाह स्पष्ट दिसतात. कृष्णाने कालियाला यमुनेच्या डोहात शरण आणले; त्या प्रसंगाने यमुनेचे जल काळे झाले म्हणतात कदाचित. असेलही तसे. राम-कृष्ण आपल्या जगण्यात इतकी एकजीव झाली आहेत की, त्यांच्या कहाण्या त्याच्या अलौकिकत्वाचे प्रतीक असलेले चमत्कार यावर आपण विश्वास ठेवतो. कारण आपल्या रक्तात ते वाहत असतात. श्रीराम आणि श्रीकृष्ण ईश्वरी अंश होते, नव्हे ते ईश्वरच होते. पण मनुष्य जन्माला आल्यानंतर मानवी सुख-दुःख त्यांच्या वाट्याला आली; ती त्यांनी भोगली. त्यांच्या कहाण्या झाल्या. त्या कहाण्या आपल्या प्रेरणा झाल्या. श्रीराम-श्रीकृष्ण आपल्या रक्तात भिनले, तसे सावरकर आपल्या धमण्यांमध्ये आहेत. सावरकरांनी सागरात घेतलेली उडी आपण आपल्या मेंदूत कोरलेली आहे. स्वच्छतागृहाच्या अरुंद खिडकीतून सागरात उडी घेताना त्यांचं अंग सोलवटून निघाले असणार! समुद्राचे खारे पाणी त्या जखमांवर किती यातनादायी ठरले असेल; तो उसळता सागर साक्षी आहे. सावरकरांच्या साहसी उडीला. सागर भारतीयांच्या मनात व्यापून राहिला आहे. मुंबईला तो आपली सोबत करतो. मद्रासला तो आहेच सोबतीला. कन्याकुमारीला तर कन्याकुमारीचा पाठीराखा होऊन खळाळतो आहे. गोव्याच्या सागराची गाज मंगेशीच्या; शांतादुर्गेच्या आरतीच्या आवाजात मिसळते. कोकणात तर सागरकिनारा थेट काही घरांच्या मागच्या अंगणाला भिडला आहे.

कोणातल्या एरवी एकाकी असणाऱ्या घरांमध्ये मुला-माणसांचे हसण्या-बोलण्याचे आवाज भरून राहतात. सागराच्या तळाशी रत्नाच्या राशी आहेत असं म्हणतात. याच्या तळाशी माणिक पाचू असतील-नसतील, पण प्रवाळ मोती अनेक औषधी वनस्पतीचा साठा या रत्नाकरापाशी नक्कीच आहे. अनेक जलचर याच्या आश्रयाला आले आहेत. सगळे सुखेनैव राहतात. तो तुमच्या वाटेला जात नाही; मात्र त्याच्या वाटेला जाणाऱ्याला सोडत नाही. किनाऱ्यावर फेकतो. सागराला आर्काण आहे ते चंद्राचं म्हणून पौर्णिमेला सागराला भरते येते. लाटांच्या हातांनी तो चंद्राला स्पर्श करू पाहतो. सूर्योदय-सूर्यास्त बघावा तो सागरकिनारी उभे राहून. रात्रीचा अंधार हळूहळू विरत जातो. पहाटेच्या प्रहरी सूर्य क्षितिजावर येण्याआधी अरुणप्रभा क्षितिजावर उमलते. हळूहळू भट्टीत तापलेल्या रसरशीत लालबुंद ताम्रगोलासारखा सूर्याचा तांबडाजर्द गोल पूर्व क्षितिजावर येतो. सूर्यकिरणाच्या रंगछटांचे विलोभनीय जाळे सागरजलावर पसरते. सूर्योदयाला उत्फुल्ल नव्या पहाटेच्या, नव्या दिवसाच्या, नव्या आशांची झालर असते. हाच सूर्य जेव्हा अस्ताला जातो तेव्हा नकळत हातातून काहीतरी मोलाचं निसटून गेल्याची हुरहूर मनाला लागते. कन्याकुमारीला सूर्य अस्ताला जाताना सूर्याचे बिंब हळूहळू सागराच्या जलात उतरत जाते. सागर लाटांवरचा किरणांचा पिसारा हळूहळू मिटत जातो तो तेजोनिधी भास्कर, संथ शांतपणे पश्चिमेला सागराच्या खोल खोल पाण्यात विरत जातो. काही काळ फिकट सोनेरी रंगछटा मागे रेंगाळते. महाबळेश्वरचा सूर्यास्त मेघांची आवरणं स्वतःभोवती लपेटून घेत हलकेच पश्चिमेच्या बाहुपाशात निवांत होतो. अलौकिक असामान्य तेजाचा अस्तही त्याच्या प्रतिष्ठेला शोभणारा असतो. सागरकिनारी सूर्यास्त पाहताना अस्तही देखणा असतो, याची प्रचीती येते.

ज्योती पुजारी

समाजभान
प्रवीण दीक्षित
निवृत्त पोलिस महासंचालक

# प्रत्येकाने जबाबदारी ओळखावी

**महिलांवरील अत्याचारांचे वाढते प्रमाण बघता शासन विविध कायदेशीर बदल करत, काही यंत्रणा राबवत प्रयत्नशील असतेच. अत्याचाराने ग्रस्त महिला तसेच मुलांच्या संरक्षणासाठी अनेक योजना आहेत. मात्र, त्याचा म्हणावा इतका प्रचार न झाल्यामुळे अनेक गरजू वंचित राहतात. कोलकात्यातील ताज्या घटनेमुळे जनक्षोभ उसळणे स्वाभाविक आहे. म्हणूनच गुन्हेगारांना शिक्षेपर्यंत पोहोचविण्यासाठी समाजाने एकत्र येण्याची गरज आहे.**



कोलकात्यातील आर. जी. कार वैद्यकीय महाविद्यालयात महिला निवासी डॉक्टरवर झालेल्या पाशवी बलात्काराच्या तसेच तिच्या हत्येच्या घटनेचे तीव्र पडसाद उमटत असताना अशा घटनांचे सत्र त्वरित थांबवण्यासाठी प्रयत्नरत होणे गरजेचे आहे. याचे कारण म्हणजे अगदी लहान मुलीपासून वृद्ध महिलेपर्यंत प्रत्येक वयोगटातील महिलांवर अत्याचार होण्याचे प्रसंग वारंवार अनुभवास मिळतात.

केवळ बलात्कारच नव्हे, तर महिला नानाविध प्रकारे अत्याचाराच्या बळी ठरताना दिसतात. उदाहरणार्थ, मुलींच्या भ्रूणहत्या, इंटरनेटचा वापर करून लहान मुलींचा होणारा व्यापार, मुलींची छेडछाड, महिलांसंबंधीची दुष्कृत्ये, मुलींचे अगदी लहान वयामध्ये होणारे विवाह, हुंड्यांसाठी मुलींची होणारी छळवणूक, घरगुती हिंसाचार, कामाच्या ठिकाणी त्यांना होणारा त्रास, मानसिक छळ करून आत्महत्या करण्यास प्रवृत्त करणे, मानसिकदृष्ट्या अपंग करणे, विधवा महिलांना सोसाव्या लागणाऱ्या आर्थिक हालअपेष्टा, वृद्ध महिलांची होणारी उपेक्षा आणि आता नवीन परिस्थितीमध्ये महिलांसंबंधी होणारे मोठ्या प्रमाणावरील आर्थिक आणि सायबर गुन्हे अशा विविध स्वरूपात महिलांवरील अत्याचार वारंवार समोर येतात. त्याखेरीज मी तुमच्याच धर्मातील, जातीतील आहे, असे सांगून त्यांची फसवणूक करणे आणि नंतर अत्याचार करून जगणे नकोसे करण्याचे प्रकारही सध्या मोठ्या प्रमाणात नजरेस येत आहे.

विशेषत: या गुन्ह्यांमध्ये अनुसूचित जाती-जमातीतीलमहिलांना मोठ्या प्रमाणात लक्ष्य केले जात असल्याचे समोर येते. अशा अपराधांमध्ये श्रीमंत वा गरीब, सुस्थिती वा आर्थिकदृष्ट्या निम्नगट, वय, धर्म, जात अशा सर्व वर्गातील, स्तरातील महिलांना प्रचंड त्रास सहन करावा लागतो. मात्र, घरच्यांच्या वा समाजाच्या दबावामुळे, लोकांकडून होणाऱ्या प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष टीकेमुळे, लज्जेमुळे आपल्यावर झालेला अन्याय, अत्याचार त्या उघड करू शकत नाहीत. अलिकडच्या घटनेप्रमाणे प्राणघातक हल्ले आणि लैंगिक अत्याचार तर त्यांना असह्य वेदनांच्या आणि मरणाच्या दारातच पोहोचवतात. काही महिला आयुष्यभर आपल्यावरील अत्याचाराची व्यथा सहन करीत राहतात. मात्र, अशा प्रकारे गुन्हे वेळच्या वेळी नोंदवले न जाण्यामुळे तसेच गुन्हेगारांना शिक्षा न झाल्यामुळे उंचावलेल्या मनोबलानिशी गुन्हेगार उजळ माथ्याने फिरत राहतात.

इतकेच नव्हे, तर भविष्यात वारंवार असे अपराध करण्यास धजावतात. ही परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी गेल्या १० वर्षांमध्ये मोदी सरकारने प्रशासनाचे ध्येय ठरवले आणि विविध मार्गाने महिलांना संरक्षण देण्याचा प्रयत्न सुरू केला. सुरक्षितता वाढवणे आणि सन्मानाने काम करण्यास मदत करणे या हेतूने सरकार राबवत असणारे बरेच उपाय आहेत. दुर्दैवाची बाब म्हणजे त्याचा म्हणावा तितका प्रचार होत नाही वा या योजनांची माहिती समाजातील सर्व गटांपर्यंत पोहोचत नाही. ही त्रुटी दूर केली तर कायद्याचे हात अनेक गुन्हेगारांपर्यंत पोहोचतील आणि वचक निर्माण होऊन महिलांना सुरक्षित वातावरण प्राप्त होऊ शकेल. म्हणूनच अशा योजना, सरकारकडून होणारी मदत, अडचणीच्या वेळा साह्यभूत ठरणारी अ‍ॅप्स वा अन्य यंत्रणांची जाण प्रत्येक महिलेनेच नव्हे, तर समाजातील प्रत्येक घटकाने ठेवायला हवी.

१ जुलै २०२४ पासून संसदेने मान्य केल्याप्रमाणे संपूर्ण देशामध्ये तीन नवीन फौजदारी कायदे लागू करण्यात आले आहेत तसेच भारतीय न्यायसंहितेमध्ये महिला आणि लहान मुलांविरुद्ध होणाऱ्या लैंगिक गुन्ह्यांविरुद्ध एक पूर्ण वेगळा विभाग दिला गेला आहे. या विभागात पूर्वीच्या 'पॉक्सो' कायद्याप्रमाणेच कडक तरतुदी करण्यात आल्या आहेत. त्यानुसार १२ वर्षांखालील मुलींवर दुष्कृत्य झाले असल्यास गुन्हेगारांना जन्मठेप किंवा मृत्युदंडाच्या शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. सामूहिक बलात्काराच्या गुन्ह्यांसाठी २० वर्षांच्या तुरुंगवासाची वा जन्मठेपेची शिक्षा सुचवली आहे. याखेरीज एखाद्या महिलेला फसवून शारीरिक लगट करण्याच्या वा लग्नाचे खोटे आश्वासन देऊन फसवण्याच्या गुन्ह्यासाठी ही मोठी शिक्षा सुचवली गेली आहे.

इतके दिवस एखाद्या महिलेला अशा प्रकारे फसवले असेल आणि हे लक्षात आल्यानंतर तिने न्यायालयात दाद मागितली तर न्यायालये, हा संमतीने झालेला प्रकार असल्याचे म्हणू शकायचे. साहजिकच त्याला बलात्कार न मानण्याचा आणि संबंधिताला शिक्षा न होण्याचा प्रकार बघायला मिळायचा. आत्तापर्यंत याचा फायदा घेऊन अनेक गुन्हेगार कोणतीही शिक्षा न होता मोकाट सुटले आहेत. आता मात्र कायद्यातील नव्या तरतुदींमुळे अशा फसवणुकीला आळा बसणे शक्य होणार आहे.

२०१२ मध्ये निर्भयावरील अमानुष अत्याचाराने, पाशवी बलात्काराने देश हादरला होता. अशा घटनांना प्रतिबंध घालण्यासाठी भारत सरकारने महिला आणि बालसुरक्षेच्या अखत्यारित काही महत्त्वपूर्ण तरतुदी सुचवण्यासाठी 'निर्भया फंड' सुरू केला. यामध्ये भारत सरकारच्या गृह मंत्रालयाने १९ फेब्रुवारी २०१९ रोजी विश्लेषण करणारे एक खास सॉफ्टवेअर सर्व राज्य सरकारांना दिले असून या 'इन्व्हेस्टिगेशन ट्रॅकिंग सिस्टिम फॉर सेन्शुअल ऑफेन्सेस' नामक अ‍ॅपमुळे लैंगिक अत्याचार करणाऱ्यांचा पाठपुरावा करणे आणि वेळच्या वेळी तपास पूर्ण करून गुन्हेगाराला योग्य ती शिक्षा करणे शक्य होत आहे.

खेरीज महिलांविरुद्ध आक्षेपार्ह जाहिराती, प्रचार वा लज्जा उत्पन्न करणाऱ्या गोष्टींना चाप लावण्यासाठी भारत सरकारने आणखी बरेच उपाय योजले आहेत. त्याचबरोबर महिलांविरुद्धचे गुन्हे सिद्ध करण्यासाठी न्याय सहायक पुरावा एकत्र करण्यासाठी एक विशेष कीट तयार करण्यात आले आहे. हे कीट तयार करताना तपास करणाऱ्या पोलिस अधिकाऱ्यांना, कोर्टामध्ये असे खटले चालवणाऱ्यांना, डॉक्टर आदींना गुन्ह्याची व्यवस्थित कल्पना यावी या हेतूने विचार करण्यात आला आहे. आता महिलांसाठी काम करणाऱ्या विविध संस्थांमध्ये तसेच 'नॅशनल पोलिस अ‍ॅकादमी' (हैद्राबाद), 'ब्युरो ऑफ पोलिस रिसर्च अँड डेव्हलपमेंट' यांनी चालवलेली 'लोकनायक जयप्रकाश नारायण फॉरेन्सिक सायन्स' नामक संस्था, 'नॅशनल फॉरेन्सिक सायन्स विद्यापीठ' अशा ठिकाणी यासंबंधीचे प्रशिक्षण देण्याचे काम होत असून आज हजारो पोलिस अधिकारी, वैद्यकीय तज्ज्ञ, स्वयंसेवकांना त्याची माहिती देण्यात येत आहे.

गुन्ह्याचा तपास अधिक वेगाने आणि नेमकेपणाने होण्यास याचा नक्कीच सकारात्मक परिणाम झालेला दिसून येईल. भारत सरकार लोकजागृतीसाठीही बरेच काम करत आहे. याअंतर्गत विविध माध्यमातून प्रसिद्धी देऊन महिलांच्या संरक्षणासाठी कायदे समोर आणण्यासाठी, सर्वसामान्यांना ते ज्ञात होण्यासाठी कार्यक्रम राबविले जात आहेत. कार्यशाळा, प्रशिक्षण, व्याख्याने, वेगवेगळ्या माध्यमातून केल्या जाणाऱ्या जाहिरातींचा अवलंब केला जात आहे. अत्याचाराला बळी पडलेल्या पीडितांसाठी एक खास उपाय करण्यात आला आहे. 'वन स्टॉप सेंटर' नावाने ओळखल्या जाणाऱ्या या कार्यक्रमांतर्गत अशा महिलांना मानसिक, सामाजिक, आरोग्यविषयक अशी विविधांगी मदत पुरविण्याचे काम केले जाते.

खेरीज 'स्व धार' योजनेंतर्गत पीडित महिलांना निवाऱ्याची व्यवस्था पुरवण्यात येते. तिथे आपत्तीत, अडचणीत वा अवघड परिस्थितीतून जाणाऱ्या महिलांची राहण्याची सोय होऊ शकते. महिला आणि बालकांच्या विकासासाठी काम करणारा विभाग यात प्रमुख भूमिका बजावतो. महिलांवरील अत्याचार पूर्णपणे थांबणे, असे गुन्हे करण्यास धजावू पाहणाऱ्यांना कठोर शासन करणे यासाठी शासनाच्या पातळीवरून असे अनेक उपाय योजले जातात. महिलांना कायद्याचे संरक्षण मिळवून देण्यासाठी सध्याच्या कायद्यांमध्ये बदल करून गुन्हेगारांसाठी ते अधिक कडक करण्याचे प्रयत्नही वारंवार होतात.

खेरीज ११२ ही रिस्पॉन्स सपोर्ट सिस्टिमही सक्रियतेने कार्यरत आहे. 'वन नेशन, वन इमर्जन्सी नंबर फॅसिलिटी' तत्त्वाने ही योजना सरकार राबवते. याअंतर्गत महिलांवर होणाऱ्या अत्याचाराबरोबरच आग लागणे, वैद्यकीय मदत लागणे अशा कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीसाठी या क्रमांकावर पीडित फोन करू शकतात. '११२' या अ‍ॅपमार्फतही ही सेवा उपलब्ध होऊ शकते. म्हणजेच हे अ‍ॅप स्मार्टफोनमध्ये असेल तर केवळ टॅप करूनही गरजेच्या वेळी पोलिसांची त्वरेने मदत मिळू शकते.

संपूर्ण देशाचा विचार केला तर याला मिळणारा सरासरी प्रतिक्रिया वेळ जुलै २०२३ पर्यंत २० मिनिटांचा होता. मात्र आता तो आणखी कमी करून सात ते आठ मिनिटांवर आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत. ११.२३ लाख लोकांनी '११२ इंडिया अ‍ॅप' डाऊनलोड केल्याचे दिसते. त्यामुळेच आपल्यापैकी प्रत्येकाने सरकारच्या अशा योजनांचा लाभ करून घ्यावा आणि गुन्ह्यांचे प्रमाण कमी करण्याबरोबरच गुन्हेगारांना कठोर शासन मिळवून देण्यासाठी प्रत्येकाने पुढे यावे. यामुळेच गुन्हेगारांना चाप बसू शकेल.

पर्यावरण
मिलिंद बेंडाळे

# रसायनांनी वेढलेली शरीरे

**शरीरात सतत जमा होत असलेल्या जटिल रसायनांचा थेट परिणाम आपल्या पुनरुत्पादक क्षमतेवर होतो. पुरुषांमधील पुनरुत्पादनाची प्रक्रिया काही प्रमाणात शुक्राणूंची संख्या आणि त्याची गतिशीलता यावर अवलंबून असते. मनुष्यच नाही, तर सर्वच प्राण्यांच्या जननक्षमतेवर रसायनांचा परिणाम झाला आहे. या सगळ्याशी पर्यावरणामध्ये सातत्याने होत असलेल्या बदलांचा जवळून संबंध आहे. या गंभीर आणि कुतूहलजनक वास्तवाचा मागोवा.**



नदी किंवा तलावातील मासे असोत, समुद्रातील अवाढव्य ब्लू व्हेल असो, जंगलाचा राजा सिंह असो, कासव-बेडूक किंवा दूरच्या सैबेरियातील स्थलांतरित पक्षी, ध्रुवीय प्रदेशातील अस्वल असो किंवा मग आपण मानव; सर्वांमध्ये एक समस्या समान आहे आणि ती म्हणजे घटता प्रजनन दर. गेल्या काही दशकांमध्ये विविध संशोधनांमधून दिसून आले आहे की, मानवासह प्राण्यांच्या प्रजनन क्षमतेत मोठ्या प्रमाणात घट झाली आहे. कारण अंतःस्रावी संप्रेरकांवर परिणाम करणारी हानिकारक रसायने आता हवा, पाणी, माती आणि अगदी अन्नसाखळीसारख्या निसर्गातील प्रत्येक घटकात पसरत आहेत. त्यामुळे मानव आणि वन्य प्राण्यांच्या आरोग्यावरही परिणाम होत आहे. प्रदूषित हवा, पाणी आणि अन्न याद्वारे माणूस अवांच्छित रसायनांसाठी डम्पिंग ग्राऊंड बनत आहे.

आपण नकळत अनेक प्रकारच्या हानिकारक रसायनांच्या तलावात पोहत असतो, ज्याचा स्रोत म्हणजे आपल्या दैनंदिन जीवनात वापरण्यात येणारी रसायने. यामध्ये प्रामुख्याने प्लॅस्टिक, पॅकेजिंग, सौंदर्यप्रसाधने, औषधे आणि दैनंदिन वापरातल्या वस्तूंमधून निघणारी रसायने यांचा समावेश होतो. याशिवाय अन्न, पाणी आणि हवेचे रासायनिक प्रदूषण हादेखील एक मोठा स्रोत आहे; ज्याचा आपण कुठेही असलो तरी सतत सामना करत आहोत. यामुळे शरीरातील चयापचय प्रभावित होते. त्याचा परिणाम मुख्यत्वे गर्भवती महिलांवर होतो आणि कर्करोग, लठ्ठपणा, हृदयाशी संबंधित आजार होतात.

गर्भाचा सामान्य विकास आणि मुख्यतः मज्जासंस्था विस्कळीत होते. याचे मोठे आव्हान आज समस्त मानवजातीपुढे आहे. दैनंदिन दिनचर्येकडे बारकाईने पाहिल्यास आपण सकाळी दात घासण्यापासून रात्री झोपेपर्यंत रसायनांचा वापर करत राहतो. त्यात वैयक्तिक वापराच्या वस्तू, जसे की सौंदर्यप्रसाधने, औषधे, प्लॅस्टिकमध्ये पॅक केलेले दूध, फळे, भाजीपाला, कॅन केलेले अन्न, मेलेनिनची भांडी, एकच किंवा वारंवार वापरण्यात येणारे प्लॅस्टिकचे ग्लास, चमचे, कपडे, फर्निचर, कार्पेट्स, घरातील रंग, चामड्याच्या चप्पल, शूज आदींचा समावेश होतो. घरातील आणि बाहेरची प्रदूषित हवा हे सर्व विषारी रसायनांचे कॉकटेल बनवते. आपण त्याच्या सतत संपर्कात असतो. जाणूनबुजून किंवा नकळत आपण रसायनांच्या व्यसनाधीन झालो आहोत. विषारी रसायनांचे कॉकटेल आपल्या अंतःस्रावी प्रणालीमध्ये व्यत्यय आणून शरीरावर अनेक स्तरांवर घातक परिणाम करते.

मानवी शरीराची अंतःस्रावी प्रणाली ही आठ मोठ्या आणि सात लहान ग्रंथींची एक जटिल प्रणाली आहे. ती थेट रक्तामध्ये कमीत कमी ५० प्रकारचे हार्मोन्स स्रवते. ती संबंधित अवयवाच्या कार्यावर नियंत्रण ठेवते किंवा संपूर्ण चयापचय संतुलित ठेवण्यास मदत करते. कोणत्याही सजीवाच्या शरीरात होणाऱ्या सर्व जैवरासायनिक प्रक्रियांना चयापचय म्हणतात. ते शरीराच्या सुरळीत कार्याचे सूचक आहे. यापैकी मुख्य म्हणजे पिट्यूटरी, थायरॉईड, एड्रेनल, स्वादुपिंड. शरीराचा योग्य विकास, ऊर्जेच्या गरजांचे व्यवस्थापन, पुनरुत्पादन, वर्तन आणि बाह्य वातावरणाची संवेदनशीलता इत्यादी कार्यांचे नियंत्रण हार्मोन्सद्वारे केले जाते. पिट्यूटरी ग्रंथीला मुख्य ग्रंथीदेखील म्हणतात. ती इतर सर्व अंतःस्रावी ग्रंथींना कधी आणि किती संप्रेरक स्रवायचे हे सांगते.

आपल्या सभोवतालच्या विषारी रसायनांच्या वाढत्या श्रेणीचा हार्मोन्सद्वारे शरीराच्या सुरळीत कार्यावर परिणाम होतो. या सर्व रसायनांमध्ये, विशेषतः हार्मोन्सवर परिणाम करणारा गट अंतःस्रावी विघटनशील रसायने (ईडीसी) म्हणून ओळखला जातो. आपल्या दैनंदिन जीवनात रसायनांचा हस्तक्षेप इतका वाढला आहे की, आतापर्यंत अंतःस्रावी प्रणालीवर परिणाम करणारी हजाराहून अधिक रसायने ज्ञात आहेत. ही रसायने मानवी शरीरात तीन मुख्य मार्गांनी प्रवेश करतात. वायू प्रदूषणाच्या स्वरूपात ती फुफ्फुसात आणि रक्तापर्यंत पोहोचतात.

अन्न प्रदूषणाच्या रूपात पचनसंस्था, यकृत आणि मूत्रपिंडावरही त्याचा परिणाम होतो. काही रसायने त्वचा आणि डोळ्यांद्वारे शरीरात प्रवेश करतात. या रसायनांचा सर्वात मोठा भाग अन्नातून येतो. दुसरा सर्वात मोठा भाग अन्नाच्या संपर्कात येणाऱ्या वस्तूंमधून येतो. विशेषतः पॅकेज्ड खाद्यपदार्थांमधून. सर्वात सामान्य उदाहरणे म्हणजे प्लॅस्टिकच्या डब्यांमध्ये पॅक केलेले दूध किंवा इपॉक्सी राळेच्या गुळगुळीत लेपाने लेपीत केलेले चहा आणि कॉफीचे कप.

सध्याच्या काळात मोठ्या प्रमाणावर वापरल्या जाणाऱ्या नॅनो मटेरिअल्सचाही आपल्या शरीराला रसायनांची प्रयोगशाळा बनवण्यात हातभार लावला जात आहे. पाणी शुद्ध आणि निर्जंतूक करण्यासाठी वापरण्यात येणारे पडदा आणि नॅनोमटेरिअल्स असलेले मॅट्रिक्स. आपण विषाने वेढलेले आहोत, आपल्याला दररोज आढळणारी काही सामान्य रसायने म्हणजे 'बीपीए' किंवा ज्याचा वापर पुन्हा वापरता येण्याजोग्या प्लॅस्टिकच्या बाटल्या, खाद्यपदार्थ, कागदी कप, पीसीडी (पॉली कार्बोनेट डाई) यांच्या कोटिंगमध्ये केला जातो. ते मजबूत, पारदर्शक बनवण्यासाठी वापरले जातात. उष्णता सहन करणारे प्लॅस्टिक मुलांच्या खेळण्यांपासून फ्लोअर मॅट्सपर्यंत सर्व गोष्टींमध्ये आढळतात. ते सौंदर्यप्रसाधनांमध्ये संरक्षक म्हणून वापरले जातात. यामध्ये पॅराबेन्स, काही कीटकनाशके उदा. अ‍ॅट्राझिन आणि प्लॅस्टिक जाळण्यातून मुक्त होणारे डायऑक्सिन्स यांचा समावेश होतो. हे सर्व अनेकदा विशिष्ट हार्मोनच्या रासायनिक रचनेसारखे असतात आणि शरीरात त्या हार्मोनच्या जागी काम करू लागतात. त्यामुळे त्या हार्मोनची संपूर्ण यंत्रणा अनियंत्रित होते. उदाहरणार्थ, पुरुष संप्रेरक एंड्रोजन तयार करण्याच्या प्रक्रियेवर परिणाम करतात.

गेल्या काही वर्षांमध्ये घरगुती वस्तूंचा सर्रास वापर आणि विविधतेमुळे, रासायनिक दूषिततेचा एक नवीन प्रकार उदयास आला आहे. त्याला 'फॉरएव्हर केमिकल' म्हणतात. 'पीएफएस'सारखी रसायने दैनंदिन वापरल्या जाणाऱ्या वस्तूंना अधिक टिकाऊ बनवण्यासाठी जोडली जातात. मोठ्या आचेवरही ती जळत नाहीत आणि पाण्याने ओली होत नाहीत. आज पावसाच्या पाण्यापासून भूपृष्ठावरील पाणी आणि भूजल प्रदूषित झाले आहे. आपण नकळत पाण्याच्या प्रत्येक घोटात रसायने पीत आहोत.

अलिकडच्या वर्षांमध्ये पारंपरिक प्लॅस्टिकच्या संसर्गाव्यतिरिक्त, संसर्गाचा एक नवीन प्रकार आढळला आहे. प्रदीर्घ काळानंतर प्लॅस्टिक मायक्रोप्लॅस्टिकमध्ये रूपांतरित होते आणि हे सूक्ष्मकण सागरी अन्नाद्वारे किनारपट्टीच्या लोकांपर्यंत आणि समुद्री मिठाद्वारे जवळजवळ प्रत्येक व्यक्तीपर्यंत अन्नसाखळीचा भाग बनत आहेत. अगदी गर्भ आणि नाळेमध्येही मायक्रोप्लॅस्टिक्स सापडले आहेत.

एका संशोधनानुसार, २०११ पर्यंत गेल्या चार दशकांमध्ये शुक्राणूंच्या संख्येत सरासरी ५२ टक्के घट झाली आहे. दुसऱ्या अभ्यासात १९७३ ते २०१८ दरम्यान शुक्राणूंच्या संख्येत सरासरी वार्षिक १.२ टक्के घट झाल्याचे आढळून आले आहे. नवीन शतकात घटीचा वार्षिक दर दुप्पट (२.६ टक्क्यांपेक्षा) जास्त झाला. सरासरी शुक्राणूंची संख्या १०.४ कोटी मिलिलिटरवरून ४.९ कोटी झाली. एका संशोधनानुसार स्त्रियांमध्ये आता मासिक पाळी सुमारे नऊ महिने आधी सुरू होत आहे. ती शरीरातील रसायनांच्या वाढीमुळे प्रजनन प्रक्रियेत आमूलाग्र बदल दर्शवते. याशिवाय, गर्भधारणेदरम्यान प्रदूषित वातावरणामुळे गर्भ आणि मुलांमध्ये मोठ्या प्रमाणात न्यूरोलॉजिकल आणि विकासात्मक विकारांशी थेट संबंध आढळून आला आहे. मानवी शरीरावर सततचा रासायनिक दबाव हा पर्यावरणाच्या इतर घटकांचा एकत्रित परिणाम समजला पाहिजे. त्यात या रसायनांची भूमिका सर्वात प्रभावी मानली जाऊ शकते. उदाहरणार्थ, व्यापक लठ्ठपणा आणि मधुमेह (टाईप २) च्या विकासावर जीवनशैली आणि आहाराचा मोठा प्रभाव असतो; परंतु हार्मोन्सवर परिणाम करणारे पदार्थदेखील समान प्रभाव पाडतात. याबाबत जनजागृती वाढविण्याची गरज आहे.

घातक रसायनांबाबत ग्राहकांमध्ये हळूहळू जागरूकता निर्माण झाली आहे. परिणामी उत्पादक गटांनाही या रसायनांना पर्याय शोधणे भाग पडले आहे; परंतु ते पुरेसे नाही. उत्पादनाचा एक भाग म्हणून कोणत्याही नवीन रसायनाचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन करण्यापूर्वी एक संपूर्ण जीवनचक्र मूल्यांकन प्रोटोकॉल लागू करणे आवश्यक आहे. अन्यथा, वर चर्चा केलेल्या सर्व रसायनांचे धोके त्यांच्या प्राथमिक वापरात उत्कृष्ट असल्याचे सिद्ध होईल. पर्यावरणाच्या इतर सर्व घटकांसाठी ही एक आपत्ती असल्याचे सिद्ध झाले.

डीडीटी हे त्या काळातील सर्वात प्रभावी कीटकनाशक होते; परंतु प्राथमिक वापराच्या पलीकडे गेले तसे ते अन्नसाखळीचा एक भाग बनले आणि विनाशाचे कारण ठरले. अशा परिस्थितीत निर्भयपणे वाढणाऱ्या मानवनिर्मित रसायनांवर प्रभावी देखरेख यंत्रणेसह योग्य जनजागृतीचे वातावरण निर्माण करण्याची गरज आहे. (लेखक वन्यजीव आणि पर्यटनविषयक अभ्यासक आहेत.)